अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । घाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

दैनिक राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक १३५ । गुरूवार २६ फेब्रुवारी २०२६

। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 । www.rashtrasahyadri.com

## भीमाशंकर मंदिराच्या सभामंडपाची नोंद गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये होणार



पुणे : पुढील वर्षी होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर भीमाशंकर येथील मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात येत असून, सुमारे पावणे तीन हजार चौरस फुटांच्या सभा मंडपाचे काम केवळ चार महिन्यांत पारंपरिक तंत्रज्ञानाचा वापर करून पूर्ण करण्यात येणार आहे. देशात पहिल्यांदाच अशा स्वरूपाचे जीर्णोद्धाराचे काम पुरातत्त्व विभागामार्फत करण्यात येत असून, दगडातील हे बांधकाम गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये समाविष्ट करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने पुढाकार घेतला आहे. त्यासाठी लवकरच सल्लागाराची नेमणूक करण्यात येणार असून, गिनीज वर्ल्ड रेकॉर्डचे पदाधिकारीही याला अनुकूल असल्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी सांगितले.

# भरधाव वेगाने घात केला... गणपती दर्शनाची आस अधुरी राहिली..!

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** गणपती दर्शनाच्या प्रवासातून सुरू झालेली ही कहाणी आज हजारो मनांना हेलावून टाकत आहे. श्रीरामपूर शहरातील चव्हाण कुटुंब – जे संतोषी वडापाव चालवून आपल्या कष्टाने कुटुंब सांभाळतात – ते खंडाळ्याच्या गणपती मंदिराकडे निघाले होते. शहरापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या या मंदिरापर्यंत जाण्यासाठी कार भरधाव नेण्याची गरज काय? हा प्रश्न आज संवेदनशील नागरिक उपस्थित करत आहेत, पण त्याचे उत्तर मात्र एका भीषण अपघाताने मिळाले. समोरून येणाऱ्या ट्रकच्या धडकेत या कुटुंबातील चार जणांचा दुर्दैवी अंत झाला, तर लहान मुलांसह तिघे मृत्यूशी झुंज देत आहेत. हा केवळ अपघात नाही, तर एका सामान्य कुटुंबाच्या सुख-दुःखाच्या जीवनकथेचा करुण शेवट आहे.

**कष्टकरी कुटुंबातील चार जणांचा मृत्यू; चिमुकल्या मुलासह तिघांची मृत्यूची झुंज सुरू**

अशोक आणि रमेश चव्हाण हे दोन भाऊ आपल्या कुटुंबासह स्विफ्ट कारने दर्शनाला निघाले. दुपारी सव्वा चारच्या सुमारास संगमनेर रस्त्यावर एसटी कार्यशाळेजवळ भरधाव ट्रक (क्रमांक: एचआर ६७ ई ३००२) समोरासमोर आदळला. क्षणार्धात कारचे तुकडे उडाले. प्रशांत रमेश चव्हाण (वय २४), एक तरुण ज्याच्या स्वप्नांना अजून पंख मिळाले नव्हते; सिद्धार्थ सुनील चव्हाण (वय १६), शाळकरी वयातच जग सोडून गेलेला; ऐश्वर्या अशोक चव्हाण (वय २६), कुटुंबाची लाडकी; आणि संगीता अनिल चव्हाण (वय ४०), जिच्या खांद्यावर कुटुंबाची जबाबदारी होती – हे चौघे जागीच किंवा उपचारादरम्यान दगावले. ट्रकचा चालक ट्रक सोडून पळून गेला, मागे फक्त दुःख आणि रडारड सोडून. अजूनही साखर कामगार रुग्णालय आणि प्रवरा ग्रामीण रुग्णालयात सारिका अनिल चव्हाण (वय ३०), रुद्र अशोक चव्हाण (वय ६) आणि ऋत्वी अशोक चव्हाण (वय साडेतीन) हे तिघे मृत्यूशी लढत आहेत. लहान रुद्र आणि ऋत्वीच्या निरागस चेहऱ्यांना पाहून कोणाचेही मन हेलावेल. ते कुटुंबातील एकमेव आशेचे किरण आहेत, पण त्यांच्या आई-वडिलांच्या आठवणींनी त्यांचे बालपण कायमचे कलुषित झाले आहे. आम्ही फक्त दर्शनाला जात होतो, देवाच्या दारातून मृत्यूची दारे उघडतील असे वाटले नव्हते, अशी व्यथा कुटुंबातील शोकाकुल सदस्य व्यक्त करतात. हा अपघात फक्त वेगवान वाहनचलनाचा परिणाम नाही, तर (पान ४ वर)



## महत्त्वाचे..

**डिझेल खरेदीत हस्तक्षेप खपवून घेणार नाही : परिवहनमंत्री सरनाईक**

मुंबई : एसटी महामंडळाच्या डिझेल खरेदीसंदर्भातील निविदा प्रक्रियेत कोणताही हस्तक्षेप सहन केला जाणार नाही, असा कडक इशारा परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिला. काही कंपन्यांकडून माध्यमांमध्ये चुकीच्या बातम्या पसरवून निविदा प्रक्रिया प्रभावित करण्याचा प्रयत्न होत असल्याचे निदर्शनास आले असून, अशा प्रयत्नांना अजिबात भीक घातली जाणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मंत्री सरनाईक म्हणाले, सध्या एसटी महामंडळाला दररोज सरासरी १० लाख ८७ हजार लिटर डिझेलची गरज भासते. हे डिझेल प्रामुख्याने इंडियन ऑइल कार्पोरेशन लिमिटेड आणि भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेड या कंपन्यांकडून खरेदी केले जाते. घाऊक ग्राहक म्हणून एसटीला या कंपन्याकडून प्रति लिटर २ रुपये ७० पैसे सवलत देत असत , संबंधित कंपनीची बैठक घेऊन या सवलती मध्ये ३० पैसे वाढवून घेतले. त्यामुळे महामंडळाचे वर्षाकाठी १० ते १२ कोटीची बचत होऊ लागली.

## राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना खुशखबर...

# महागाई भत्ता तीन टक्क्यांनी वाढला

### जुलै २०२५ पासूनची थकबाकीही मिळणार...

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

मुंबई : राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना दिनांक १ जुलै, २०२५ पासून ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनसंरचनेतील मूळ वेतनावरील अनुज्ञेय महागाई भत्याचा दर ५५% वरुन ५८% करण्याचा निर्णय आज राज्य शासनाने घेतला. सदरची वाढ दि. १ फेब्रुवारी, २०२६ पासून रोखीने मिळणार असून, दि. १ जुलै ते ऑक्टोबर, २०२५ थकबाकी मार्च, २०२६ च्या वेतनात मिळणार आहे. उर्वरित कालावधीतील थकबाकीचा निर्णय स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येणार आहे.



केंद्र शासनाप्रमाणे महागाई भत्ता वाढ राज्यात देण्याचे राज्य शासनाचे प्रचलित धोरण असल्यामुळे, राज्य शासकीय अधिकारी-कर्मचारी व सेवानिवृत्तांना देखील केंद्र शासनाप्रमाणे दि. १ जुलै, २०२५ पासून ३% महागाई भत्ता वाढ थकबाकीसह देण्याचा निर्णय राज्य शासनाने विनाविलंब घ्यावा, अशी आग्रही मागणी अधिकारी महासंघाने शासनाकडे निवेदनांद्वारे वारंवार करुन पाठपुरावा देखील केला होता.

राज्य शासनाच्या अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांना देखील सदरची वाढ पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यात आल्याची बाब महासंघाने राज्य शासनाच्या निदर्शनास आणली होती. अधिकारी महासंघाच्या मागणीला प्रतिसाद देऊन महागाई भत्ता वाढीचा निर्णय घेतल्याबद्दल महासंघाने राज्य शासनाचे आभार मानले आहेत.

# तीन पावसाळे उलटूनही घरकुल लाभार्थ्यांना घर मिळेना

### गरिबांचे पैसे कुठे गेले? विजय वडेट्टीवार यांचा सवाल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**मुंबई :** राज्यातील घरकुल योजनेतील घरं मंजूर होऊनही गेल्या तीन वर्षांपासून गरिबांना मिळाली नाही. या योजनेसाठी हक्काचा निधी मिळालेला नाही. या गंभीर मुद्द्यावरून आज विधानसभेच्या प्रश्नोत्तराच्या तासात विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी आक्रमक पवित्रा घेत सरकारला धारेवर धरले. तीन पावसाळे झाले, लोकं कुठे राहत असतील याचा विचार करा. सरकार म्हणून जनाची नाही तर किमान मनाची तरी ठेवा,अशा शब्दांत वडेट्टीवार यांनी संताप व्यक्त केला. (पान ४ वर)

**सावकारी पाशामुळे शेतकऱ्यांनी किडन्या विकल्या**

महाराष्ट्रात सावकारी पाशात अडकलेल्या शेतकऱ्यांना किडनी विकण्याची वेळ आली आहे.राज्यातील शेतकऱ्यांच्या भीषण परिस्थितीवर विधानसभेचे कॉंग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी आज सरकारला धारेवर धरले. चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्याने सावकाराचे कर्ज फेडण्यासाठी किडनी विकण्याचा धक्कादायक प्रकरण समोर आले आहे. लक्षवेधी प्रश्नाच्या माध्यमातून राज्यात सावकारांचे राज्य सुरू असल्याचा आरोप वडेट्टीवार यांनी केला. चंद्रपूर जिल्ह्यातील रोशन कुडे या शेतकऱ्याकडून एका लाखाच्या कर्जासाठी ७४ लाख सावकाराने वसूल केले. शेवटी ट्रॅक्टर आणि शेती जाऊनही कर्ज फिटत नसल्याने शेतकऱ्यांवर किडनी विकण्याची वेळ आली.

# महाराष्ट्रात स्त्री भ्रूणहत्येचे थैमान

### विधानसभेत गाजला 'लेक लाडकी'चा मुद्दा; डॉ. नितीन राऊत यांनी सरकारवर कडक ताशेरे ओढले

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** महाराष्ट्र विधानसभेत आज स्त्री भ्रूणहत्येच्या मुद्द्यावरून वातावरण चांगलेच तापले. राज्यात गेल्या काही काळात तब्बल ५४ हजार मुलींची गर्भातच हत्या झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. यावर बोलताना माजी मंत्री आमदार डॉ. नितीन राऊत यांनी सरकारवर कडक ताशेरे ओढले. एकीकडे आपण 'लेक लाडकी' सारख्या योजना राबवतो, मात्र दुसरीकडे इतक्या मोठ्या प्रमाणात भ्रूणहत्या होत असतील, तर प्रशासनाचा वचक कुठे आहे? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

सरकार पाच-सहा हजार रुपयांच्या लाभाच्या योजनांची आकडेवारी सांगून सर्व काही आलबेल असल्याचे चित्र रंगवत आहे. मात्र, 'एनएफएचएस'च्या अहवालानुसार २४ जिल्ह्यांमध्ये 'लेक नकोशी' असल्याचे वास्तव समोर आले आहे. प्रति १००० मुलांमागे मुलींचे प्रमाण ८९४ ते ९९२ च्या दरम्यान असणे हे महाराष्ट्रासाठी भूषणावह नाही, असेही डॉ.राऊत यांनी नमूद केले.

या गंभीर विषयावर बोलताना डॉ. राऊत यांनी ११ फेब्रुवारी २०२६ रोजी सामाजिक संघटनांनी दिलेल्या निवेदनावर सरकारने अद्याप कोणतीही ठोस कृती का केली नाही, असा प्रश्नही विचारला. आता सरकार यावर काय पावले उचलणार, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

**प्रशासकीय वरदहस्ताने बेकायदेशीर केंद्रे सुरू?**

**विधानसभेत लक्षवेधी सूचनेद्वारे बोलताना कॉंग्रेसचे जेष्ठ नेते डॉ. नितीन राऊत यांनी सरकारला धारेवर धरले. ते म्हणाले की, राज्यात बेकायदेशीर गर्भलिंग निदान केंद्रे सर्रास सुरू आहेत. शहरी आणि निमशहरी भागात प्रशासकीय यंत्रणेच्या आशीर्वादानेच हे रॅकेट फोफावत आहे. दर तीन महिन्यांनी तपासणी होत असल्याचे सरकार सांगते, मग खासगी सोनोग्राफी केंद्रातून हे रॅकेट चालतेच कसे? असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला.**

# विधानपरिषदेच्या ९ जागा होणार रिक्त!

### उद्धव ठाकरे, गोपीचंद पडळकर, अमोल मिटकरी यांचा समावेश



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** राज्यसभा निवडणूकीनंतर विधानपरिषदेच्या नऊ जागांसाठी निवडणूक होत आहे. शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे, शिवसेना नेत्या नीलम गोऱ्हे, राष्ट्रवादीचे अमोल मिटकरी, शशिकांत शिंदे, कॉंग्रेसचे राजेश राठोड, भाजपचे प्रवीण दटके, गोपीचंद पडळकर,

रणजितसिंह मोहिते पाटील व रमेश कराड हे सदस्य निवृत्त होत आहेत. आमदार होण्याच्या प्रतीक्षेत असलेल्या नेत्यांनी आता आपापल्या पक्षश्रेष्ठींकडे विधान परिषदेवर वर्णी लागण्यासाठी मोर्चे बांधणारी सुरू केली आहे.

राज्यसभेच्या ७ जागासाठी येत्या १६ मार्चला निवडणूक होत आहे. या निवडणुकीत संख्या बळा नूसार ६ जागा महायुतीला तर एक जागा महाविकास आघाडीच्या वाट्याला येणार आहे. तर भाजपला चार जागा मिळणार आहेत. राष्ट्रवादी अजित पवार आणि शिंदेसेनेला प्रत्येकी एक जागा मिळणार असल्याचे दिसते.

महाविकास आघाडीत एका जागेवरून चढाओढ दिसून येत असून. ठाकरेसेना, कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी शरद पवार यांच्या आघाडीत एका जागेवरून घासाघिस सुरू आहे. तर राज्यसभा निवडणुकीनंतर लगेच मे महिन्यात विधान परिषदेच्या ९ जागा रिक्त होणार आहेत. त्यामुळे या विधान परिषदेची (पान ४ वर)

**निवृत्त होणारे ९ विधानपरिषद सदस्य**

- **उद्धव ठाकरे स्वत:– शिवसेना**
- **नीलम गोऱ्हे – शिवसेना**
- **अमोल मिटकरी – राष्ट्रवादी**
- **शशिकांत शिंदे – राष्ट्रवादी**
- **राजेश राठोड – कॉंग्रेस**
- **प्रवीण दटके – भाजपा**
- **गोपीचंद पडळकर – भाजपा**
- **रणजितसिंह मोहिते पाटील – भाजपा**
- **रमेश कराड – भाजपा**

## अल्पवयीन मुलांना लक्ष्य करणाऱ्या डिजिटल जाहिरातींवर बंदी घालणार का : दरेकर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** सोशल मीडिया वापरावर वयोमर्यादा निश्चित करणे आणि अल्पवयीन मुलांना लक्ष्य करणाऱ्या डिजिटल जाहिरातींवर बंदी घालण्याबाबत शासन धोरण तयार करणार का ? असा सवाल भाजपा गटनेते आमदार प्रवीण दरेकर यांनी आज विधानपरिषदेच्या सभागृहात लक्षवेधीच्या चर्चेत सहभागी होत उपस्थित केला. दरेकर यांच्या प्रश्नाला सांस्कृतिक कार्य आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांनी सकारात्मक उत्तर दिले.

बुधवारी अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या तिसऱ्या दिवशी विधानपरिषदेचे सदस्य निरंजन डावखरे यांनी मुलांच्या मानसिक, शैक्षणिक व सामाजिक आरोग्यावर घातक परिणाम करणाऱ्या मोबाईलवरील ऑनलाईन गेम्स तात्काळ बंद करावेत याबाबतची लक्षवेधी मांडली. (पान ४ वर)

# हजारो कुटुंबांच्या जीवनावर टांगती तलवार!

## पाटबंधारे विभाग अतिक्रमण मोहीम : बेघर होण्याच्या भीतीने श्रीरामपूरकर रस्त्यावर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** श्रीरामपूर शहरातील प्रवरा कालवा शेजारील अतिक्रमण काढण्याच्या पाटबंधारे विभागाच्या निर्णयाने हजारो गरीब, दलित आणि कामगार कुटुंबांच्या जीवनावर गदा येण्याची भीती निर्माण झाली आहे. १९८० पासून या परिसरात वास्तव्य करणाऱ्या या कुटुंबांना विभागाने नोटीस बजावली असून, उद्या शेवटची मुदत आहे. या अमानवी निर्णयाच्या निषेधार्थ बहुजन समाज पार्टीच्या पदाधिकाऱ्यांसह नागरिकांनी महात्मा गांधी चौकात उपोषण सुरू केले आहे. हे उपोषण केवळ आंदोलन नाही, तर दशकांच्या मेहनतीने उभारलेल्या घरांच्या रक्षणासाठीची हृदयद्रावक हाक आहे.

**उपोषणकर्त्यांची व्यथा ऐकण्याकडे शासन प्रशासनाकडून दुर्लक्ष**

या कुटुंबांची कहाणी मन हेलावून टाकणारी आहे. ४५ ते ६० वर्षांपासून येथे राहणारे हे लोक मजुरी, छोटे व्यवसाय करून कुटुंब चालवतात. त्यांची मुले याच परिसरात शिकतात, त्यांचा उदरनिर्वाह याच मातीवर अवलंबून आहे. अचानकपणे घर काढण्याच्या आदेशाने ते रस्त्यावर येण्याच्या उंबरठ्यावर उभे आहेत. आम्ही काय गुन्हा केला? आम्हाला बेघर करून शासन काय साध्य करणार? अशी व्यथा उपोषणकर्ते व्यक्त करतात. (पान ४ वर)



**■ विखे पाटलांच्या घरासमोर आत्मदहन करू**

कचराबाई भाऊसाहेब सातदिवे, प्रकाश अहिरे, आशिष मोरे, रोहित कांबळे, सतीश हिवराळे आणि राजू खरात यांसारख्या नेत्यांनी या अन्यायाविरोधात आवाज उठवला. ते म्हणतात, हा निर्णय तात्काळ मागे घ्या, अन्यथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या घरासमोर आत्मदहन करू. ही धमकी नव्हे, तर निराशेची पराकाष्ठा आहे.

**■ लोकप्रतिनिधींनी फिरवली पाठ!**

दुर्दैवाने, आज दिवसभर सुरू असलेल्या या आंदोलनाकडे प्रमुख नेत्यांनी दुर्लक्ष केले. नगरसेविका मंजुश्री मुरकुटे, त्यांचे पती सिद्धार्थ, नगरसेवक संजय गांगड, तिलक डुंगरवाल, शिवसेनेचे प्रकाश चित्ते आणि रिपब्लिकन पक्षाचे सुरेंद्र थोरात, रमादेवी धिवर व स्थानिक नगरसेवकांशिवाय कोणीही फिरकले नाही. हे चित्र लोकप्रतिनिधींच्या जबाबदारीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करते.

## संपादकीय

# हिंदुत्वातील अंतर्गत संघर्षाचा नवी 'यादवी'

उत्तर प्रदेशातील राजकीय वातावरण सध्या तापलेले आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि ज्योतिर्मठाचे शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांच्यातील संघर्षाने एक नवे रूप धारण केले आहे. हा संघर्ष केवळ दोन व्यक्तींमधील नाही, तर हिंदुत्वाच्या मूलभूत तत्त्वांवर आधारित राजकीय आणि धार्मिक अधिकाराच्या संघर्षाचा आहे. प्रयागराजमधील माघ मेळ्यातील अपमानापासून सुरू झालेला हा वाद आता बाल लैंगिक अत्याचार (पॉक्सो) प्रकरणापर्यंत पोहोचला आहे. या संपादकीयात या संघर्षाचा आढावा घेताना दोन्ही बाजूंचा विचार करून त्याचे राजकीय परिणाम समजावून घेण्याचा प्रयत्न करू.

या संघर्षाची सुरुवात २०२४ मध्ये अयोध्येतील राम मंदिराच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यापासून झाली. शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद यांनी अपूर्ण मंदिराच्या उद्घाटनाला विरोध करत ते हिंदू धर्माच्या तत्त्वांविरुद्ध असल्याचे म्हटले होते. त्यांनी सोहळ्यात सहभागी होण्यास नकार दिला. हा विरोध भाजप आणि योगी सरकारसाठी धक्कादायक होता, कारण राम मंदिर ही भाजपची प्रमुख राजकीय उपलब्धी आहे. त्यानंतर प्रयागराजमधील माघ मेळ्यात शंकराचार्य आणि त्यांच्या शिष्यांना स्नानास बंदी घालण्यात आली आणि त्यांना हुसकावून लावण्यात आले. या घटनेने शंकराचार्यांच्या समर्थकांमध्ये संताप निर्माण झाला. त्यांनी उत्तर प्रदेश प्रशासनाकडून माफीची मागणी केली आणि गो संरक्षणाचा मुद्दा उपस्थित करत गाईला राष्ट्रमाता घोषित करण्याची मागणी केली.

शंकराचार्यांनी या अपमानाच्या विरोधात मोठे आंदोलन पुकारले. त्यांनी सरकारला ४० दिवसांची मुदत दिली होती, जी मार्च २०२६ मध्ये संपत आहे. लखनऊमध्ये ११ मार्च रोजी धर्म संसद बोलावण्याची घोषणा केली आहे. या आंदोलनाला अनेक साधू-संत आणि सनातन प्रेमींनी पाठिंबा दिला आहे. त्यांच्या मते, हे आंदोलन हिंदू समाजाच्या एकजुटीचे प्रतीक आहे. सोशल मीडियावरून ते योगी आणि मोदी सरकारला सनातन विरोधी ठरवत आहेत. ''योगी सरकार हिंदुत्वाच्या नावाने सत्ता उपभोगते, पण गो संरक्षणात अपयशी ठरले आहे,'' अशी टीका ते करतात. या आंदोलनाची तयारी जोरात सुरू असून, ते अधिक उग्र होण्याची शक्यता आहे.

दुसरीकडे, योगी सरकारने या आव्हानाला आक्रमकपणे सामोरे जाण्याचे ठरवले आहे. प्रथम त्यांनी शंकराचार्यांच्या पदवीवर प्रश्न उपस्थित केला. ''तुम्ही शंकराचार्य आहात हे सिद्ध करा,'' अशी नोटीस जारी केली. ही कृती धार्मिक नेत्याच्या अधिकाराला आव्हान देणारी होती. आता या संघर्षाने अधिक गंभीर वळण घेतले आहे. प्रयागराज कोर्टाने शंकराचार्य आणि त्यांचे शिष्य मुकुंदानंद ब्रह्मचारी यांच्याविरुद्ध पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले. ही कारवाई अशुतोष ब्रह्मचारी महाराज यांच्या याचिकेवर आधारित आहे. अशुतोष हे जगद्गुरू रामभद्राचार्य यांचे शिष्य आहेत, जे योगी आदित्यनाथ यांच्याशी निकटचे आहेत. पोक्सो प्रकरणाच्या दोन्ही बाजू पाहता, याचिकाकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, माघ मेळ्यात शंकराचार्यांच्या गुरुकुलात दोन अल्पवयीन मुलांचा (१४ आणि १७ वर्षांचा) लैंगिक शोषण झाले. याचिकेत म्हटले आहे की, हे शोषण गुरुकुलाच्या नावाखाली झाले. कोर्टाने पुरावे आणि पीडितांच्या जबानीची तपासणी करून गुन्हा दाखल करण्याचे निर्देश दिले. या आरोपांनी धार्मिक नेत्याच्या प्रतिमेला धक्का बसला आहे. याचिकाकर्ता अशुतोष ब्रह्मचारी यांचा इतिहासही विवादास्पद आहे; त्यांनी यापूर्वीही अनेक खटले दाखल केले आहेत. मात्र, कोर्टाने हे आरोप गंभीर मानून कारवाई केली आहे.

शंकराचार्यांच्या बाजूने मात्र हे आरोप पूर्णपणे खोटे आणि राजकीय षडयंत्राचा भाग असल्याचे म्हटले जात आहे. त्यांनी म्हटले आहे की, ''हे आरोप मला गो संरक्षणाच्या मुद्द्यावरून चूप करण्यासाठी रचले गेले आहेत. पीडित मुले कधीच आमच्या गुरुकुलात आली नाहीत.'' त्यांनी प्रयागराज पोलिस आयुक्त आणि अशुतोष यांच्या फोटोंचा उल्लेख करत प्रशासन आणि याचिकाकर्त्यांमध्ये संगनमत असल्याचा आरोप केला. त्यांनी अलाहाबाद हायकोर्टात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला आहे. त्यांच्या समर्थकांनी याचिकाकर्त्याची पार्श्वभूमी खोदून काढली असून, तो अट्टल गुन्हेगार असल्याचे सांगितले आहे. अखिलेश यादव यांसारख्या राजकीय नेत्यांनी हे प्रकरण राजकीय प्रेरित असल्याचे म्हटले आहे. ''असे आधारहीन आरोप करून धार्मिक नेत्याची बदनामी करणे हे चुकीचे आहे,'' असे अखिलेश म्हणाले.

हा संघर्ष हिंदुत्ववादी राजकारणात नवे वळण आणत आहे. योगी आदित्यनाथ हे हिंदुत्वाचे प्रतीक म्हणून ओळखले जातात. त्यांच्या सरकारने राम मंदिर, गो संरक्षण आणि धार्मिक सुधारांवर भर दिला आहे. मात्र, शंकराचार्यांच्या विरोधाने भाजपची प्रतिमा डागाळली आहे. हिंदू समाजात फूट पडण्याची शक्यता आहे. एकीकडे साधू-संत योगींना समर्थन देत आहेत, तर दुसरीकडे अविमुक्तेश्वरानंद यांनाही पाठिंबा मिळत आहे. प्रवीण तोगडिया यांसारखे नेते मध्यस्थीची मागणी करत आहेत. केंद्र सरकारने अद्याप हस्तक्षेप केलेला नाही, पण हे प्रकरण राष्ट्रीय पातळीवर गेल्यास मोदी सरकारसाठी अडचणीचे ठरू शकते. शंकराचार्य हे पारंपरिक धार्मिक नेते आहेत, ज्यांचा प्रभाव हिंदू समाजावर मोठा आहे. योगी सरकारला असे आव्हान सहन होत नाही. दुसरी बाजू म्हणजे वैयक्तिक महत्वाकांक्षा. शंकराचार्यांच्या आश्रमातील विलासी सुविधांवर टीका होत आहे – बहुमजली इमारत, स्विमिंग पूल, गुप्त खोल्या इ. हे साधूच्या जीवनशैलीशी विसंगत आहे. मात्र, हे आरोपही राजकीय असू शकतात. या प्रकरणात निष्पक्ष तपास आवश्यक आहे. पोक्सो कायद्यांतर्गत आरोप गंभीर आहेत, पण ते सिद्ध होईपर्यंत निर्दोष मानले जावे. शंकराचार्यांनी सीसीटीव्ही फुटेज तपासण्याची मागणी केली आहे, जी योग्य आहे. सरकारनेही धार्मिक नेत्यांशी संवाद साधून हे प्रकरण सोडवावे. अन्यथा, हिंदुत्ववादी मतदारांमध्ये असंतोष वाढेल. हा संघर्ष हिंदू समाजासाठी नुकसानकारक आहे. दोन्ही बाजूंनी संयम बाळगून तोडगा काढावा, अन्यथा देशाच्या राजकारणावर त्याचे दूरगामी परिणाम होतील.

# सौर व्यावसायिकांचा महावितरणच्या नव्या नियमांविरोधात तीव्र निषेध

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** महावितरण कडून सौर ग्राहकांवर लागू करण्यात आलेल्या नवीन कॅपॅसिटी कॅपिंग नियमामुळे राज्यातील सुमारे ५०/६० % निवासी सौर ग्राहकांवर परिणाम होणार असल्याचा आरोप राहुरी येथील सौर व्यावसायिकांनी केला आहे. तालुक्यातील राहुरी तालुका सोलर असिसिएशन च्या वतीने आज महावितरणचे उप कार्यकारी अभियंता विरेश बारसे यांना दिले.यावेळी महेश कुलकर्णी, अक्षय बोरावके, अवधूत कुलकर्णी, वैभव वराळे, नंदकिशोर तारडे, विवेक खाडे, अक्षय तनपुरे, अक्षय



पटारे, श्रीराज सोनवणे, अविनाश शिंदे, योगेश उंडे, विशाल सरोदे, योगेश म्हसे, सुमेध कुलकर्णी,सागर ताकटे आदि सोलर विक्रेते उपस्थित होते. पंतप्रधान (पी.एम )सूर्यघर योजनेअंतर्गत १३ फेब्रुवारीपासून सरासरी वीज वापरावर आधारित सौर क्षमता मर्यादित करण्याचा निर्णय घेतल्याने अनेक ग्राहकांच्या मंजुरी अडकल्या आहेत. विशेषतः नवीन घर, हौसिंग सोसायटी तसेच कमी वापर असलेल्या ग्राहकांना कमी क्षमतेची मंजुरी मिळत असल्यामुळे त्यांच्या सौर प्रकल्पांवर परिणाम होत आहे.सदर निर्णय एम. ई. आर. सी. नियमन व विद्युत कायदा २००३ शी विसंगत असल्याचा आरोप करत हा निर्णय तात्काळ मागे घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. महाराष्ट्र हा पंतप्रधान पी.एम.सूर्यघर योजनेत अग्रस्थानी असून नव्या नियमामुळे राज्यातील सौर उद्योग, रोजगार व गुंतवणुकीवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली.राहुरी येथील विविध सौर कंपन्यांच्या प्रतिनिधींनी एकत्र येत निवेदन सादर करून शासनाने त्वरित दखल घ्यावी, अशी मागणी केली आहे.

# आमची टीप पोलिसांना देतो का?' म्हणत तरुणावर हल्ला; चौघांवर गुन्हा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** तू आमची टीप पोलिसांना देतो का? असे म्हणत एका तरुणावर दगड व लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना राहुरी तालुक्यातील कानडगाव येथे २१ फेब्रुवारी रोजी दुपारी घडली. या प्रकरणी चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महेश रामनाथ लोंढे (वय २५, रा. कानडगाव) हा आपल्या मित्रासह घरी जात असताना कानडगाव येथील अहिल्यादेवी होळकर चौक येथे आरोपींनी त्यांना अडवले. फिर्यादीनुसार, आरोपी राजमोहम्मद बशीर सय्यद याने तू आमच्या टिपा पोलिसांना देतो का? असे म्हणत महेश लोंढे यास दगड व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यानंतर इतर आरोपींनाही घटनास्थळी बोलावून घेण्यात आले. आरोपींनी महेश लोंढे यांच्या गळ्यावर चाकू लावून धमकावल्याचेही फिर्यादीत नमूद आहे. त्यावेळी मित्र सुरज अशोक घोडके याने चाकू हिसकावण्याचा प्रयत्न करत असताना तो चाकू महेश यांच्या मनगटाजवळ लागला. त्यानंतर दोघांनाही शिवीगाळ करत मारहाण करण्यात आली तसेच जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. या प्रकरणी राजमोहम्मद बशीर सय्यद, साहिल शकिल सय्यद, शकिल इस्माईल सय्यद व शाहिन शकिल सय्यद (सर्व रा. कानडगाव, ता. राहुरी) यांच्याविरुद्ध गुन्हा रजिस्टर क्रमांक १७१/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ११५ (२), ११८ (१), ३५१ (२), ३५२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे करीत आहेत.

# पाणीपट्टी वाढी संदर्भात नगरपरिषद कार्यालयावर धरणे आंदोलन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** तालुक्यातील देवळाली प्रवरा नगर परिषदेच्या सर्वसाधारण सभेमध्ये पाणीपट्टी १ हजार ८०० रुपयांवरून थेट ३ हजार रुपये इतकी वाढ करण्याचा बेकायदेशीर, अन्यायकारक व नागरिक विरोधी निर्णय तात्काळ रद्द करण्यात यावा, यासाठी नगर परिषद प्रशासनाला निवेदन देण्यात आले.

देवळाली प्रवरा नगर परिषदेच्या सर्वसाधारण सभेमध्ये घेतलेला पाणीपट्टी दर १ हजार ८०० रुपयांवरून थेट ३ हजार रुपये करण्याचा निर्णय हा सर्वसामान्य नागरिकांची आर्थिक कोंडी लक्षात न घेता, लोकशाही मूल्यांना तिलांजली देत व जनतेला न पेलवणारा आर्थिक बोजा टाकला असून, तो पूर्णतः अन्यायकारक, अव्यवहार्य व निषेधार्ह आहे. असे नगरसेविका सुनीता सुरेंद्र थोरात



यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

# पाणीपुरवठा विभागाचा भोंगळ कारभार;

## मिल्लत नगरमध्ये दोन दिवस पाणी ठप्प

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** शहरातील मिल्लत नगर भागात पाणीपुरवठा विभागाच्या हलगर्जीपणामुळे सलग दोन दिवस पाणीपुरवठा ठप्प झाल्याने नागरिकांचे हाल झाले. सेक्टर एकमधील वॉल दुरुस्ती करताना संबंधित वॉल बंदच राहिल्याने सोमवारी व मंगळवारी संपूर्ण परिसरात पाणी पोहोचले नाही. ऐन रमजान महिन्यात पाणी न आल्याने नागरिकांत संताप व्यक्त झाला.

तक्रारीनंतर पाणीपुरवठा विभागाचे अभियंता निलेश बकाल यांनी तपासणी केली असता वॉल बंद असल्याचे निदर्शनास आले. मंगळवारी पुन्हा दुरुस्ती करूनही सुरुवातीला पाणी आले नाही. ज्येष्ठ पत्रकार सलीमखान पठाण यांनी नगराध्यक्ष करण ससाने व मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप यांना माहिती दिल्यानंतर कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. स्थानिक नगरसेवक अफरोज शहा यांनीही पाहणी केली.

दरम्यान, नगराध्यक्ष ससाने यांच्या निर्देशानुसार काही भागात टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात आला. पाईपलाईनमधील तांत्रिक दोष दूर करून नियमित पाणीपुरवठा करावा व जबाबदारांवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# संजीवनी पॉलिटेक्निकच्या पहिल्या ऑटोनॉमस बॅचचा उत्कृष्ट निकाल

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** संजीवनी पॉलिटेक्निकच्या पहिल्या ऑटोनॉमस बॅचचा निकाल उत्कृष्ट लागला असून विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. संस्थेने दिलेल्या माहितीनुसार कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी व इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग शाखेतील कीर्ती सोमनाथ शिंदे व वर्षा दादासाहेब भुजाडे यांनी ९६.७१ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला.

या पॉलिटेक्निकला ऑल इंडिया कौन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेशन (एआयसीटीई), नवी दिल्ली यांची मान्यता प्राप्त असून महाराष्ट्रातील विनाअनुदानित वर्गवारीतील पहिले



ऑटोनॉमस पॉलिटेक्निक ठरण्याचा मान संस्थेला मिळाला आहे. उत्कृष्ट शैक्षणिक गुणवत्ता, अद्ययावत अभ्यासक्रम आणि परिणामकारक मूल्यमापन पद्धतीच्या जोरावर संस्थेने तांत्रिक शिक्षण क्षेत्रात नवा आदर्श निर्माण केला आहे.

प्रथम वर्ष प्रथम सत्रात कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी शाखेतील साक्षी संतोष शिंदे हिने ९६.५७ टक्के गुणांसह द्वितीय, तर समीक्षा दत्तू शिंदे हिने ९५ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळविला. इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगमध्ये समर्थ बाळासाहेब मुळे (९४.८६ टक्के) द्वितीय तर ज्ञानेश्वरी राहुल जाधव (९३ टक्के) तृतीय ठरली.

मेकॅनिकल इंजिनिअरिंग शाखेत शालिनी मधुकर कडू (९३.८६ टक्के) प्रथम, साहिल रामदास वाणी (९२.५७ टक्के) द्वितीय आणि आकांक्षा नवनाथ पळसकर (९२.४३ टक्के) तृतीय ठरले. मेकॅट्रॉनिक्स विभागात देविका संतोष घोंगणे (९३.५७ टक्के) प्रथम, शालुकुमारी भुतकुनकुमार शाह (९३.४३ टक्के) द्वितीय व समीक्षा शिवाजी शेळके (९३ टक्के) तृतीय क्रमांकावर राहिल्या.

# ओम होन जेईई परीक्षेत कोकण विभागात द्वितीय

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**कोपरगाव :** तालुक्यातील चांदेकसारे येथील डॉ अनिल होन व अमृता होन हे वैद्यकीय सेवेसाठी दापोली येथे स्थायिक झाले आहे. त्यांचे चिरंजीव ओम अनिल होन यांनी नुकतीच जेईई परीक्षा उत्तीर्ण करत मोठे संपादन केले. ९९.५४ टक्के गुण मिळवत कोकण विभागातून द्वितीय क्रमांक मिळवण्याचा मान त्यांना मिळाला. सरस्वती विद्यामंदिर जळगाव, दापोली व चांदेकसारेची मान यामुळे उंचावली आहे. एस एस सी बोर्ड परीक्षेत देखील त्यांनी भरघोष यश संपादन केले होते. त्यावेळी त्यांना ९९.७०% गुण मिळाले. आई वडील शिक्षक व मित्र परिवाराचे मार्गदर्शन मिळाले व जिद्द चिकाटी आणि अभ्यासात सातत्य ठेवले असल्यानेच आपल्याला हे यश मिळाले असल्याचे ओम यांनी सांगितले.

# आगीत बाधित कुटुंबाला पत्रकार संघाचा मायेचा आधार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर खुर्द :** तालुक्यातील पिंपळगाव माथा येथील भरमखास वाडीत राहणाऱ्या आदिवासी कुटुंबातील सावळेराम रामभाऊ मेंगाळ यांच्या घराला महाशिवरात्रीच्या दिवशी दुपारी अचानक आग लागून संपूर्ण संसार जळून खाक झाला. या दुर्घटनेत घरातील अन्नधान्य, कपडे व जीवनावश्यक वस्तूंचे मोठे नुकसान झाले असून कुटुंब उघड्यावर आले आहे.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ संगमनेर शाखेच्या वतीने मेंगाळ कुटुंबाला गृहउपयोगी वस्तू, कपडे व आवश्यक साहित्य देऊन मायेचा आधार देण्यात आला.



यावेळी संघटनेचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वास आरोटे, तालुका अध्यक्ष संजय गोपाळे, समन्वयक संजय फुलसुंदर तसेच पिंपळगाव देपा येथील सरपंच भांगरे आदी उपस्थित होते.

डॉ. आरोटे यांनी सांगितले की, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ वर्षभर सामाजिक बांधिलकी जपत पत्रकार, विद्यार्थी व दीनदुबळ्यांच्या मदतीसाठी विविध उपक्रम राबवत असतो. कोणाच्या सुखात सहभागी होता आले नाही तरी दुःखात नक्कीच उभे राहणे हीच संघटनेची भूमिका आहे, असे ते म्हणाले.

या मदत कार्यासाठी डॉ. कुटे, अभियंता सानप, राजन दादा युवा मंच, अभियंता रजनीकांत कवडे, अभियंता सोमनाथ गोडसे आदींचे सहकार्य लाभले.

# वळण येथे श्री गाडगे महाराजांची १५० वी जयंती उत्साहात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** राहुरी तालुक्यातील वळण येथे श्री गाडगे महाराज प्राथमिक आणि माध्यमिक आश्रम शाळेत श्री संत गाडगे महाराज यांच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जयंती कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेतील सेवानिवृत्त ज्येष्ठ मुख्याध्यापक जमशेद मणियार यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाला संस्थेचे खजिनदार तथा वळण शाखेचे संचालक अशोक पाटील, माजी सरपंच बाबासाहेब खुळे, तंटामुक्ती अध्यक्ष एकनाथ खुळे, पत्रकार प्रभाकर मकासरे, वसंतराव आढाव, गोविंद फुणगे, पोलीस पाटील सोमनाथ डमाळे हे उपस्थित होते.



याप्रसंगी संस्थेत अनेक वर्ष सेवा देणारे सेवानिवृत्त मुख्याध्यापक संपत जाधव, रामचंद्र वाघोळे, श्रीरंग रंधे, रघुनाथ राळेभात, गजानन खर्चे, साहेबराव सावंत, दत्तात्रय फटांगरे, दिनकर पठारे, योगेंद्रसिंह परदेशी, भागवत सरतापे, प्रकाश सुपेकर, आनंद बहिरट, जगन्नाथ सूर्यवंशी, विठ्ठल येवले सर्व महानुभाव पंथांच्या अनुयायांना श्री गाडगे महाराज मिशन मुंबई या संस्थेच्या वतीने सन्मानपत्र आणि फुलाचे रोप देऊन सन्मानित करण्यात आले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री संत गाडगे महाराज आश्रम शाळेचे माध्यमिक मुख्याध्यापक मिलिंद गुजरे, प्राथमिक मुख्याध्यापक गोवर्धन माळी, सर्व शिक्षक, अधीक्षक, अधिक्षीका, कर्मचारी बंधू भगिनी यांनी मोलाचे या कार्यक्रमासाठी मोलाचे सहकार्य केले.

**रमजानुल मुबारक २०२६**
**रोजा नंबर ०८**

# तुम्हीं( स्वतः ) रोजा (उपवास ) करा ते तुमच्या साठी अधिक फायद्याचे आहेत , जर तुम्हीं हें समजलात तर

उन्हामध्ये रोजे शारीरिक व मानसिक दृष्टीने खडतर परीक्षा घेणार, अध्यात्मिक फायदे मोजण्या पलीकडे आहेत, त्याबरोबर आरोग्य दायी फायदे तर अनेक हें जगातील अनेक देशात संशोधनातून सिद्ध केलेत. , रोजे ( उपवास ) होणार कसे??. प्रश्न -भरपूर असतात व असणार सुद्धा. उत्साहीं बंधूनी चंद्र कोर बघून वजन बघितली असतील - शारीरिक तपासणी, शुगर रेकॉर्ड, ब्लड प्रेशर, चरबी तपासून, थायरॉईड रिपोर्ट, विविध रिपोर्ट तपासून घेतले असतील, मल्टिनेशन कंपनीचे वजन( ुशळसहीं ऄशर्वीलळपस )कमी करण्याचं १००% गॅरंटी देणारे प्रॉडक्ट, दहा पंधरा वर्षांपासून भारतात पयाड आलेलं डाएटिंग, डाएट च, वेगवेगळे आहार तज्ञ वेगवेगळ्या प्रकारचे डाएट देतात कोणी दोन वेळा भरपूर जेवा मध्ये काहीच खाऊ नका, तर काही आहार तज्ञ सांगतात, दिवसभर ज्या कॅलरी (उषमांक ) लागतात, ते मोजून थेवढे दिवसभर थोडं थोडं खा. असें भरपूर मजेशीर प्रयोग चालू असतात,त्यातूनच व्यवहार इस्पित. बुद्धी मान व्यवसायिक चैन सिस्टिम च्या अनेक स्किम्स... यातून साध्य काय?? रिझल्ट काय??. अनेकानां पडलेलं प्रश्न -कोडं उत्तर शोधता शोधता..शेवटी माथ्यावर हात मारणं...

आज जमाना फास्टफूड , इन्स्टंट चविष्ट खाण्याचा, त्याचं नुकसान कायिक पटीनें,( फॅट्स) चरबीचे अति प्रमाण, चवी साठी मिठाचं जास्त प्रमाण, शिजवण्याची पद्धती वेगळ्याच, त्यात सिनथेटिक केमिकॅल चे प्रमाण जास्त, असें म्हणतात, चवी साठी घातलेल अझीनो मोटो कुत्र्याच्या चरबी व हाडानी बनवलेले असतं. आरोग्यासाठी घातक, अर्थात आपल्याच शरीरावर, हृदय रोग, मधुमेह (डायबेटिस,) वजन वाढत, वजनांमुळे गुढ्यावर दवाब येऊन संधिवातचा , कमरेचा व मनके, हाड्या त्रास, वजन वाढलं मधुमेह, ब्लड प्रेशर, पुष्कळ आजरांना स्वतः आमंत्रण देतात, जमाना इंटरनेट चा,आय टी करियर करणाऱ्या इंजिनीरचं १४ तास कॉम्प्युटर समोरच सतत काम - मिटिंग , बॉस वारंवार मीटिंग साठी कॉल करतोय, नवीनच खूळपट काढ्न प्रॉब्लेमस उकरून काढतोय, असे अनेक प्रॉबलेम, नवीन फंडा वर्क फॉर हॉम -घरामध्ये काम करणाऱ्या खढ इंजिनीर घरी असून देखील पारखे, घरातील एका बंदिस्त खोलीत आडवं -तिडवं शरीर करून -खुर्चीवर काम , त्यांना सतत काहींना इन्स्टंट चटपटीत खायची सवय, त्यांची गरज असती नाईलाज असतो म्हणून जरा जास्तच फास्टफूड खातात. बहुतेक खढ इंजिनीर आपल्या कामाच्या व्यस्ततेमुळे गले लठ्ठ झालेले आपण बघतो, कारण फास्टफूड व शारीरिक हालचाल हा विषय च नाहीं. काम पुर्ण न झाल्याने येणार मानसिक आजार डिप्रेशन, लवकरच येणारे अलझायमर आजार..


दैनंदिन कामाच्या व्यस्तते मुळे अपायकारक पद्धतीने केलेले अन्न पदार्थ खातोय, खुरमुरीत -चटपटीत -सटरबटर - जंक फूड खायची सवय लागलेली असते . आत्ताची भूक कशी घालवायची एवढंच डोक्यात असतं, कसलेही पदार्थ खाऊन स्वतःचे आरोग्य धोक्यात घालून आजार लावून घेतो, या सगळ्याचा दुष्परिणाम म्हणजे पचन संस्था बघडलेली असते. वारंवार बिघलेली असते म्हणून, लरव लहेश्रशीींशऍश्र चे प्रमाण वाढल्या मुळे हृदय रोगाची शक्यता वाढलेली. अमेरिकेत सतत २५ वर्ष झालेल्या विविध संशोधनातून हें सिद्ध झालं की उपवासातुन शरीर सर्वात अगोदर ऑटो (ऑटो )म्हणजे स्वतः फेजी ( षरसू, )म्हणजे खाने.. अर्थातच स्वतः च स्वतःच्या खराब पेशी खाऊन टाकणं. म्हणजे आपलं शरीर नैसर्गिक रित्या आपल्या शरीरातील खराब बॅड उत्ती (डी एन अ ) पेशी हळू हळू खाऊन नवीन आरोग्यदायी पेशी तयार करत. याला ऑटो फेजी म्हणतात, यामुळे आपल्या शरीरातील कॅन्सर सारख्या पेशी हीं खाऊन टाकून नवीन पेशी तय्यार करते. अँटी इम्म्युन, अँटी कॅन्सर, अँटी दिसेस सेल तय्यार होतात.इम्युन सिस्टिमचे कार्य सुधारून कॅन्सर सेल फॉरमेशन थांबते फ्री रेडिकल चे दयामेज कमी करून इन्फलेमेटरी कंडिशन नियमित करते.सहा तासाच्या उपवासात शरीर सर्वात अगोदर ग्लुकोज ( शुगर )चा वापर करते म्हणून शरीरातील इन्सुलिन चे प्रमाण कमी होतं. आठ ८ते बारा (१२) तसाच्या रोजा मुळे इन्सुलिन लेव्हल कमी होणं सुरू होऊन शरीरातील फॅट बर्निंग, ( जलन ) चालू होऊन आपली शुगर कमी होते. १२ -१६ तासाच्या उपवास मध्ये इन्सुलिन रेजीजस्तन कमी होत जावून शरीरातील पेशी मसलस मधील चरबी जळून त्याला व्यस्थीत आकार येण्यास सुरुवात होऊन शुगर कमी होतं त्यामुळे मधुमेह खास टायप एक मधुमेही आजार कंट्रोल मध्ये राहतं. पुढे इन्सुलिन बरोबरच सॉल्ट ची मात्रा कमी कमी होऊन चरबी चे प्रमाण कमी होऊन बॅड कॉलेस्टरोल चे प्रमाण कमी होत जावून ब्लड प्रेशर, रक्तदाब कमी होऊन हृदय रोग कमी होतात, ब्याड कोलेस्टरोल (लरव लहेश्रशीींशऍश्र ) चे प्रमाण कमी होऊन हृदयाची क्षमता वाढते, स्ट्रेक्र,( कार्डीयक )हृदय रोग धोका कमी होण्यास मदत होते. ब्रेन दिरॉइड न्युरोट्रॉफीक फॅक्टर इ्छक्र प्रोटीन वाढून मेंदूची गती वाढून अलझायमर, डिप्रेशन अपुळरपीं सारखे विकार कमी होतात.. सर्वात जास्त फायदा फाट्टी लिव्हर अर्थात याकृत ला फायदा होतो.

पचन संस्था ( वळसशीींळींशॅींशा ) व्यवस्थित होण्यास मदत होते, बहुतेक संशोधकानी विविध प्रयोग करून बघितलं तर त्यांच्या लक्षात आले, १२-१४ तासाचे रोजा (उपवास )ठेवल्यास पचन संस्थेला काही प्रमाणात अराम भेटून त्यामुळे शरीरात नैसर्गिक पणे आदिपोनेक्टिन हार्मोन्स चे प्रमाण जास्त होते, आणि हेच केऑपशी हार्मोन्स अन्नातील पौष्टिक घटक पचविण्यास मदत करते.मेटाबॉलिझम ची गती वाढते. त्यामुळे कॅलरी बर्न करण्यास संधी मिळते.लाँगीटीव्हिटी वाढ होतें, रोजा नें शरीराचे नैसर्गिक डेटॉक्स होतें.

जपान मध्ये एक नवीनच संशोधन जपान च्या शरीर शास्त्र चे संशोधक योशिनोरो ओसुनी ''अणढज ऋएत्रज्ञ'' चा '' ऑटो फेजी ''सिद्धांत मांडला, '' ऑटो फॅगो ''हा ग्रीक शब्द म्हणजेच ''स्वतः ला खाऊन टाकणं '' सतत उपाशी पोटी राहिल्याने शरीरातील नॉर्मल पेशी ह्या शरीरातील अतिरिक्त वाढलेल्या चरबी ( षरीी )ना स्वतः खाऊन टाकून नष्ट करतात, यालाच ऑटो फेगो म्हणतात. आपल्या शरीरातील घातक अपाय कारक पेशी लशश्रश्र ज्यामध्ये कॅन्सर सारख्या हीं कदाचित असू शकतात, तर अशा पेशी ही नष्ट होतात. ही प्रक्रिया रामजानुल मुबारक रोज्या (सतत उपवास करण्यामुळे )मध्ये घडून येत असते. संशोधन तर आजच्या युगात झालं परंतु याचे फायदे अल्लाह( परमेश्वर भगवंत ) नें प्रेषित मुहम्मद स्व. यांनी १४५० वर्षां पूर्वीच सांगितलं होतं.

मानवी कल्याण कारी संशोधन करणाऱ्या जपान च्या योशिनोरी ओसुनी यांना २०१६ मध्ये नोबेल पारितोषिक देवून गौरव करण्यात आलं. ते गरजेचं हीं होतं. म्हणून साथी नों आपल्या कामाचं योग्य नियोजन करून आज आयती संधी आलेलीच आहेत म्हणून लगातार तीस रोजा ( उपवास ) करण्याची संधी आलेली आहेत सतत रोजे ठेवून आपलं इस्पित वजन कमीत कमी करून, आरोग्याचे बरेच फायदे होतात . महिना भर तर संधी आहेत कारण मनुष्य हा सामूहिक गोष्टी नां जास्त प्राधान्य देत असतो, आशियाई मंडळी तर एक दुसऱ्याला बघून अनुकरण करतो, एकमेकांना बघून पुढे पुढे जाण्याची ओढ स्पर्धा शर्यत लागलेली असते तर आजच्या रमजान च्या रोजा (उपवासा) ची स्पर्धेत भाग पार्टीसिपीट करून आपल्या शारीरिक क्षमता वाढविण्याच्या स्पर्धेत हीं बाजी मारणं किती फायद्याचं राहील.

नियोजन वर्षेभरासाठी केलं, आठवड्यात एक रोजा (उपवास) ठेवून, आपल्या भारतीय समाजात सोमवार, मंगळवार, गुरुवार, शुक्रवार, शनिवार, एकादशी शिवरात्री चतुर्थी आपल्या श्रद्धा असलेल्या देवी देवता नुसार एक उपवासाच्या पद्धती आहेतच तर त्याचं व्यवस्थित नियोजन करून वजन कमी करून पुन्हा वाढणार नाहीत याची वर्षभर काळजी घेतली तर वजना बरोबर असंख्य आरोग्यदायी फायदे होतील .



**डॉ. सलीम शेख**
बैतुशशिफा मल्टिस्पेशालिटी दवाखाना.
श्रीरामपूर, जि. अहमदनगर
मो. ९२७१६४००१४

पैगंबर मुहम्मद स्व. हें स्वतः वर्षभर प्रत्येक महिन्यात सोमवार व गुरुवार चा व महिन्यातील १३ व १४ वा रोजा (उपवास )करीत असत.काही बंधू हीं पैगंबर मुहम्मद स्व च्या सुन्न त चा आदर्श म्हणून असेच (रोजे उपवास ) ठेवतात. दिव्य कुरआन सांगते, ''पण तुम्ही स्वतः रोजा (उपवास ) करा ते तुमच्या साठी फायदेचे राहील, जर तुम्ही हें समजलात तर ''

# निराधार महिलेला घरात घुसून मारहाण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** नेवासा तालुक्यातील रामडोह येथे एका निराधार महिलेला विनयभंगानंतर घरात घुसून मारहाण केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. संबंधित महिलेने दिलेल्या तक्रारीनुसार, सुरुवातीला छेडछाड व विनयभंगाची घटना घडल्याने तिने छर्शींरीर झेश्रळलश डींरींळेप येथे गुन्हा दाखल केला. मात्र फिर्याद दिल्याच्या रागातून आरोपींनी पुन्हा घरावर हल्ला केल्याचा आरोप आहे. मनीषा सागर लकारे (वय ३०) या मासेमारी व्यवसाय करणाऱ्या महिलेने गावातील काही व्यक्तींविरुद्ध तक्रार दिल्यानंतर संबंधित आरोपींनी काही महिलांसह हातात काठ्या व कोयते घेऊन तिच्या घरात घुसून मारहाण केली. या घटनेत फिर्यादी महिला, तिचे वृद्ध आई-वडील तसेच दहावीमध्ये शिक्षण घेणारी मुलगी जखमी झाली. मारहाणीमुळे विद्यार्थिनीचे सुरू असलेले मंडळाचे पेपरही बुडाल्याचे सांगण्यात आले. गेल्या आठ-दहा दिवसांत चार तक्रारी देऊनही पोलिसांकडून ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप महिलेने केला आहे. आरोपींकडून धमक्या मिळत

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# साखर कारखानदारीला सरकारचा आधार आवश्यक : बाळासाहेब थोरात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : साखर कारखानदारीमधून राज्य व केंद्र सरकारला दरवर्षी हजारो कोटी रुपयांचा महसूल मिळतो. अर्थव्यवस्थेला बळकटी देणाऱ्या या सहकारी क्षेत्राला अडचणीच्या काळात शासनाने ठोस आधार देणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन बाळासाहेब थोरात यांनी केले. सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखानाच्या सन २०२५-२६ गळीत हंगाम सांगता समारंभात ते बोलत होते.




अध्यक्षस्थानी डॉ. सुधीर तांबे होते. थोरात म्हणाले, साखर उद्योगाला सरासरी दहा वर्षांतून एकदा आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. अशा काळात कर्जाचे पुनर्गठन, कमी व्याजदराने कर्जपुरवठा, साखरेची आधारभूत किंमत सुमारे चार हजार रुपये निश्चित करणे, इथेनॉलला अधिक दर देणे तसेच विविध प्रोत्साहनपर योजना राबविणे आवश्यक आहे. पेट्रोलला पर्याय ठरणाऱ्या इथेनॉल उत्पादनाला चालना दिल्यास उद्योग अधिक सक्षम होईल, असे त्यांनी नमूद केले.

यंदा राज्यात जादा पावसामुळे उसाचे टनेज घटले, तर कारखान्यांची संख्या व गाळप क्षमता वाढल्याने ऊस मिळविण्यासाठी स्पर्धा निर्माण झाली. अशा परिस्थितीतही कारखान्याने अवघ्या ११० दिवसांत ११.४० टक्के साखर उतारा देत ७ लाख ६५ हजार मेट्रिक टन गाळप पूर्ण केले, अशी माहिती त्यांनी दिली.

निळवंडे धरण व कालव्यांची कामे पूर्ण झाल्याने सिंचनाला चालना मिळाली असून या पाण्याचा लाभ सर्व वंचित शेतकऱ्यांना मिळावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. ऊस लागवड वाढविण्यासोबत एकरी उत्पादन वाढविण्यासाठी शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करावा, असे आवाहन त्यांनी केले. डॉ. सुधीर तांबे यांनी सहकार क्षेत्रामुळे ग्रामीण भागात समृद्धी आल्याचे सांगत सहकार जपण्याची गरज अधोरेखित केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर यांनी केले.

### कामगारांना १० टक्के वेतनवाढ

कारखान्याने राज्यस्तरीय करारानुसार सर्व कर्मचाऱ्यांना १० टक्के वेतनवाढ जाहीर केली.

### क्रीडा स्पर्धांतील विजेत्यांचा गौरव

अमृत सांस्कृतिक मंडळाच्या सहकार्याने आयोजित क्रीडा स्पर्धांतील विजेत्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

# लहुजी सेनेच्या पाठपुराव्यानंतर बलात्कार प्रकरणात कारवाई

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : श्रीरामपूर तालुक्यातील वडाळा महादेव गावात एका महिलेवर बलात्काराची गंभीर घटना घडल्याची बाब समोर आल्यानंतर परिसरात खळबळ उडाली. या प्रकरणाची दखल घेत पोलिस प्रशासनाने तातडीने गुन्हा नोंदवून तपास सुरू केला. संबंधित महिलेला न्याय मिळवून देण्यासाठी विविध स्तरांवर प्रयत्न करण्यात आले असून, दोषींवर कारवाई होण्याच्या दिशेने प्रक्रिया सुरू आहे. या प्रकरणात पीडित महिलेला न्याय मिळवून देण्यासाठी भारतीय लहुजी सेना संघटनेने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब बागुल आणि राष्ट्रीय सचिव हनीफ पठाण यांनी पीडितेच्या बाजूने ठामपणे उभे राहत कायदेशीर सल्ला दिला. त्यांनी प्रशासनाकडे सातत्यपूर्ण पाठपुरावा करून तपासाला गती मिळवून दिली. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी पोलिस अधिकाऱ्यांशी संपर्क साधून प्रकरणाचा सखोल तपास करण्याची मागणी केली. त्यांच्या प्रयत्नांमुळे तपास प्रक्रियेला वेग आला आणि पीडितेला आवश्यक मदत मिळाली.या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. महिलांवर होणाऱ्या अत्याचारांविरोधात समाजाने एकजुटीने आवाज उठवणे गरजेचे आहे, असे मत व्यक्त होत आहे. संघटनेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले की, महिलांवर होणाऱ्या अन्यायाविरोधात आम्ही कायम ठाम राहू. अन्यायग्रस्तांना न्याय मिळवून देणे ही आमची सामाजिक जबाबदारी आहे. अशा घटनांमुळे ग्रामीण भागातील महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

# विद्यार्थ्यांनी रोजगार शोधण्यापेक्षा निर्माण करण्यावर भर द्यावा : डॉ. सुस्मिता विखे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनगाव** : विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागात सात्रळ येथील लोकनेते डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात रिचार्जेबल एसीडीसी एलईडी बल्ब मॅन्युफॅक्चरिंग या विषयावरील विद्यापीठस्तरीय एकदिवसीय कार्यशाळा उत्साहात पार पडली. भौतिकशास्त्र विभाग, विद्यार्थी विकास मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि इंडियन असोसिएशन ऑफ फिजिक्स टीचर्स यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या उपयोजित कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी स्वतः रिचार्जेबल एलईडी बल्ब तयार करून कौशल्याधारित शिक्षणाचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. प्रास्ताविकात भौतिकशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. निलेश कान्हे यांनी कार्यशाळेचे उद्दिष्ट स्पष्ट केले. प्रभारी प्राचार्य डॉ. सोपान शिंगोटे यांनी उपस्थित साधनव्यक्ती व विद्यार्थ्यांचे स्वागत केले. संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुष्मिता राधाकृष्ण विखे पाटील,




अतांत्रिक महाविद्यालयाचे संचालक व प्राचार्य प्रो. (डॉ.) प्रदीप दिघे तसेच इंडियन असोसिएशन ऑफ फिजिक्स टीचर्सचे प्रतिनिधी प्रो. डॉ. कैलास सपनार प्रमुख उपस्थित होते.

डॉ. सुष्मिता विखे यांनी विद्यार्थ्यांनी आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करत स्वतःचा व्यवसाय उभारावा, विक्री कौशल्य आत्मसात करावे व रोजगारनिर्मितीचे धडे घ्यावेत, असे आवाहन केले. प्रो. (डॉ.) प्रदीप दिघे यांनी संशोधनातून नवकल्पना विकसित होतात आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये कौशल्याची मोठी क्षमता असल्याचे नमूद केले. कार्यशाळेत श्री शिर्डी साई रुरल संस्थेचे डॉ. सत्यजित पोतदार यांनी एलईडी : सस्टेनेबल लाईटनिंग सोल्युशन या विषयावर मार्गदर्शन केले, तर पद्मश्री विठ्ठल विखे महाविद्यालय, प्रवरानगर-लोणीचे बी. एम. पेहरे यांनी 'प्रॅक्टिकल अस्पेक्ट ऑफ रिचार्जेबल एसीडीसी एलईडी बल्ब मॅन्युफॅक्चरिंग' या विषयावर प्रात्यक्षिकासह प्रशिक्षण दिले. द्वितीय सत्रात विद्यार्थ्यांनी स्वतःचे बल्ब तयार केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. दीप्ती आगरकर व प्रा. डॉ. सुष्मा उंडे यांनी केले, तर आभार प्रा. आकाश खैरे यांनी मानले. विद्यापीठ गीताने उद्घाटन व राष्ट्रगीताने समारोप करण्यात आला.

# तेली समाज विकास महामंडळ तात्काळ स्थापन करा; अन्यथा राज्यभर आंदोलन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज आर्थिक विकास महामंडळाची घोषणा २०२४ पूर्वी करण्यात आली होती. मात्र अद्याप स्वतंत्र महामंडळाची स्थापना न झाल्याने तेली समाजात नाराजी व्यक्त होत आहे. दोन महिन्यांत 'तेली समाज विकास महामंडळ' कार्यान्वित न झाल्यास महाराष्ट्रभर आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा अहिल्यानगर जिल्हा तेली समाज व महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभा यांच्या वतीने देण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महामंडळ स्थापन करण्याची घोषणा केली होती.

मात्र दोन वर्षे उलटूनही कार्यवाही न झाल्याने समाजबांधवांत तीव्र असंतोष आहे. निवेदनात तेली समाज आर्थिक अडचणीत सापडल्याचे नमूद करण्यात आले आहे. युवक-युवतींसाठी



शैक्षणिक कर्ज, व्यवसायासाठी भांडवल, स्वयंरोजगाराच्या संधी आणि शासनाच्या योजनांचा लाभ मिळण्यासाठी स्वतंत्र महामंडळ आवश्यक असल्याचे सांगण्यात आले. संबंधित मागण्यांचे निवेदन तालुका तहसीलदारांकडे सादर करण्यात आले. यावेळी समाजातील ज्येष्ठ मार्गदर्शक, पदाधिकारी व कोपरगाव, संगमनेर, अकोले, नेवासा परिसरातील मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते.

# मुळाच्या माका महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बालाजी देडगाव** : मूळ एज्युकेशन सोसायटी संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, माका येथे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. मंगळवार, दि. २४ फेब्रुवारी रोजी सकाळी आयोजित या कार्यक्रमास विद्यार्थी, शिक्षक व मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष उदयन गडाख होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून सोनई येथील सहाय्यक पोलिस निरीक्षक अनिल मोरे उपस्थित होते.



प्रारंभी दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्राचार्य भानुदास चोपडे यांनी प्रास्ताविकात महाविद्यालयाच्या शैक्षणिक, क्रीडा व सांस्कृतिक प्रगतीचा आढावा घेतला. विविध स्पर्धांमध्ये यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचे त्यांनी कौतुक केले. प्रमुख पाहुणे अनिल मोरे यांनी विद्यार्थ्यांनी कष्ट, प्रामाणिकपणा व शिस्त यांचा अवलंब करून आदर्श नागरिक बनावे, असे आवाहन केले. शिक्षणामुळे व्यक्तिमत्त्व विकास होऊन समाजात मानाचे स्थान प्राप्त होते, असे त्यांनी नमूद केले. अध्यक्षीय भाषणात गडाख यांनी ध्येय निश्चित करून सातत्याने प्रयत्न करण्याचा सल्ला दिला.

समारंभात गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शनानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

# डीएनए बारकोडिंग ही सजीवांची अचूक ओळख पटविणारी प्रभावी पद्धत : डॉ. कल्याणकर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : डीएनए बारकोडिंग ही सजीवांची अचूक व शास्त्रीय ओळख पटविणारी प्रभावी पद्धत आहे. या प्रक्रियेत सजीवांच्या ऊतकनमुन्यातून डीएनए वेगळा करून विशिष्ट जनुक भागाची झउठ तंत्राद्वारे वाढ केली जाते आणि त्यानंतर त्याचे अनुक्रमण केले जाते. प्राप्त अनुक्रम आंतरराष्ट्रीय डेटाबेसशी तुलना करून संबंधित प्रजातीची खात्रीशीर ओळख निश्चित केली जाते. असे प्रतिपादन 'पॉल हेबर्ट सेंटर फॉर डीएनए बारकोडिंग आणि बायोडायव्हर्सिटी स्टडीज' केंद्राचे समन्वयक डॉ. अमोल कल्याणकर यांनी केले. या कार्यशाळेचे अध्यक्षीय स्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव सरोदे यांनी भूषविले.



त्यांनी पुढे नमूद केले की, प्राण्यांसाठी उजख जनुक, तर वनस्पतींसाठी ीललङ आणि जनुकांचा वापर केला जातो. या तंत्रामुळे जैवविविधतेचे संवर्धन, नवीन प्रजातींचा शोध, अन्नभेसळ प्रतिबंध आणि वन्यजीव संरक्षण यांसारख्या क्षेत्रांत महत्त्वपूर्ण योगदान मिळते. ते रयत शिक्षण संस्थेचे श्री सद्गुरु गंगागीर महाराज सायन्स, गौतम आर्ट्स अँड संजीवनी कॉमर्स कॉलेज, कोपरगाव येथील प्राणिशास्त्र विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (खट-उ) यांच्या संयुक्त विद्यमाने 'डीएनए बारकोडिंग' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेत बोलत होते.

शंकर मुटकुळे यांनी, एआय लॅबमध्ये सहभागी विद्यार्थ्यांना संगणकावर विविध सॉफ्टवेअरच्या सहाय्याने मॉलिक्युलर डेटा ॲनालिसिस कसे करावे याचे प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले. त्यांनी डीएनए सिक्वेन्स डेटा संगणकात अपलोड करणे, त्याचे अलाईनमेंट करणे, त्रुटी तपासणी करणे तसेच फायलोजेनेटिक विश्लेषणासाठी आवश्यक टप्प्यांचे सविस्तर प्रात्यक्षिक दाखविले. अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. माधव सरोदे यांनी डीएनए बारकोडिंग या तंत्रज्ञानाचे संशोधन क्षेत्रातील वाढते महत्त्व स्पष्ट करताना की, डीएनए बारकोडिंग ही सजीवांची अचूक व विश्वासार्ह ओळख पटविणारी आधुनिक वैज्ञानिक पद्धत असून जैवविविधतेच्या अभ्यासासाठी ती अत्यंत उपयुक्त ठरत आहे. पारंपरिक वर्गीकरण पद्धतींसोबत जनुकीय विश्लेषणाची जोड मिळाल्यामुळे संशोधन अधिक अचूक आणि वस्तुनिष्ठ झाले आहे.

कार्यशाळेचे प्रास्ताविक व स्वागत प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ. विलास जीवतोडे यांनी केले, सदर कार्यशाळेसाठी नासिक, अ.नगर, छ.संभाजीनगर जिल्ह्यातील प्राणीशास्त्र, वनस्पतीशास्त्र, जैवतंत्रज्ञान, औषधनिर्माणशास्त्र विभागातील प्राध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते. तर आभार प्रा. अंकिता प्रसाद यांनी मानले. तर सूत्रसंचालन संस्कृती सरोदे हिने केले.

## द•ख•ल

### त्रिमूर्ती महाविद्यालयात संत गाडगेबाबा जयंती साजरी



**नेवासा** : नेवासाफाटा येथील त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित त्रिमूर्ती कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये विविध उपक्रमांनी संत गाडगेबाबा यांची जयंती साजरी करण्यात आली. आज संत गाडगेबाबांची जयंती स्वच्छता अभियान, समाजसेवा उपक्रम आणि प्रबोधन कार्यक्रमांद्वारे साजरी केली जाते. त्यांचे विचार आजही समाजाला योग्य दिशा देणारे आहेत असे मनोगत विद्यार्थ्यांसह प्रमुख अतिथींनी यावेळी बोलताना केले. यावेळी उपस्थित महाविद्यालयाच्या उपप्राचार्या बर्गे, प्रा.खेडकर, प्रा.बोरुडे, प्रा.अनिकेत आरसुळे, प्रा.आवारे, प्रा.भवर, प्रा.वैरागर, प्रा.देवतरसे, प्रा.औटी, प्रा.देवकर, प्रा.गायकवाड, प्रा.थोरात, प्रा.देवकर, प्रा.वंजारे, प्रा.कोल्हे, प्रा.कराडे, प्रा.भोसले, प्रा. ढाकिफळे उपस्थित होते.

### वाकणवस्ती शाळेच्या विद्यार्थ्यांना टिफीन व बॅगचे वाटप



**श्रीरामपूर** : तालुक्यातील उक्कलगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाकणवस्ती येथील शाळेतील ८८ मुलांना टिफीन व बॅगचे वाटप करण्यात आले.श्रीरामपूर येथील एका नामंकित कंपनीच्या सीएसआर निधीतून मुलांना टिफीन व बॅग वाटपाचा कार्यक्रम पार पडला.या कंपनीचे सर्वेसर्वा सचिन माने,मुयरेश माने यांच्या विशेष संकल्पनेतून व एम.बी.जगताप यांच्या मार्गदर्शनाने मंगळवारी विद्यार्थ्यांना टिफीन व बॅगचे वितरण केले.यावेळी उपस्थित मान्यवरांचे शाल व श्रीफळ देवून सत्कार करण्यात आला.याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष गोरख थोरात, मार्केटिंग ऑफिसर प्रविण मरकड,सेल्स ऑफिसर गणेश गायकवाड, आंबीचे दुध उत्पादक शेतकरी अशोक जाधव,अनिल टाकसाळ,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रावसाहेब शिंदे, उपाध्यक्ष सोमनाथ मोरे, अभिजित कोळसे, प्रविण थोरात आदी पालकवर्ग उपस्थित होते.

### आधारसाठी नागरिकांची पायपीट थांबवा : शिंदे



**श्रीरामपूर** : शहर व तालुक्यातील १८ वर्षांवरील नागरिकांसाठी स्वतंत्र 'आधार नोंदणी केंद्र' तात्काळ सुरू करावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्या प्रतिभा शिंदे यांनी केली आहे. प्रांताधिकारी किरण सावंत पाटील, जिल्हाधिकारी कार्यालय सेतू समिती तसेच मंत्रालयातील प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान विभाग, मुंबई यांना दिलेल्या निवेदनातून त्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले. आधार कार्ड हे विविध शासकीय योजना, बँक खाते, डीबीटी अनुदान, शैक्षणिक प्रवेश यासाठी अत्यावश्यक झाले आहे. मात्र श्रीरामपूरमध्ये १८ वर्षांवरील नव्या नोंदणीची सुविधा नसल्याने नागरिकांना अहिल्यानगर, राहुरी, नेवासा किंवा राहाता येथे जावे लागत आहे. तहसील किंवा प्रांत कार्यालयात विशेष आधार नोंदणी केंद्र सुरू करून नागरिकांची पायपीट थांबवावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

### अल्पवयीन मुलीला पळवून नेणाऱ्या आरोपीच्या पोलिसांनी मुसक्या आवळल्या

**आश्वी** : संगमनेर तालुक्यातील आश्वी पोलीस स्टेशन हद्दीतून एका अल्पवयीन मुलीला चारचाकी वाहनातून पळवून नेण्याचा प्रयत्न पोलिसांनी शिताफीने हाणून पाडला. वेगवान कारवाई करत आरोपीचा पाठलाग करून वडगावपान परिसरातून त्याला ताब्यात घेत मुलीची सुखरूप सुटका करण्यात आली. सोमवारी सकाळी साडेनऊच्या सुमारास मुलीचे अपहरण होत असल्याची माहिती सहायक पोलीस निरीक्षक सुदाम शिरसाट यांना मिळाली.

त्यांनी तात्काळ पोलीस हेड कॉन्स्टेबल महेश आहेर व सचिन सातपुते यांच्यासह आरोपीच्या मागावर धाव घेतली. दरम्यान, संगमनेर तालुका पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक प्रवीण साळुंखे यांनाही सतर्क करण्यात आले. संयुक्त कारवाईत आरोपी सतीश शेळके (रा. पोटा, जि. हिंगोली) याला अटक करण्यात आली. या प्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम १३७(२), ८७ तसेच पोक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून न्यायालयाने आरोपीस दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**जाहीर प्रगटन**

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांक : जन्म-मृत्यु एसआर/२५३/२०२५
नेवासा दिनांक ०६/०२/२०२६

अर्जदार श्री/श्रीम-आसिफ रशीद सय्यद रा.पुनतगाव ता. नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन अर्जदार श्री/श्रीम/कु.जायदा रशीद सय्यद, कुकाणा, यांचा महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे.

सदरच्या अर्जात खालील प्रमाणे जन्म नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.

अ.क्र.-१, जन्म नोंद घेण्यात येणाऱ्या व्यक्तीचे नाव-जायदा रशीद सय्यद, गावाचे नाव-कुकाणा, जन्म दिनांक-०१/०४/१९८०

करिता या जाहिर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे। कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणे बाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटनाच्या तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा, मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबंधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

**तहसिलदार**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

**जाहीर प्रगटन**

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांक : जन्म-मृत्यु एसआर/२५/२०२६
नेवासा दिनांक ०५/०२/२०२६

अर्जदार श्री/श्रीम-हवालदार युसूफ बन्नूभाई रा.खेडले परमानंद ता. नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन अर्जदार श्री/श्रीम/कु.हवालदार युसूफ बन्नूभाई रा.खेडले परमानंद ता. नेवासा यांचा महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्मु नोंद गावी जन्म मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे.

सदरच्या अर्जात खालील प्रमाणे जन्म नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.

अ.क्र.-१, जन्म नोंद घेण्यात येणाऱ्या व्यक्तीचे नाव-हवालदार युसूफ बन्नूभाई, गावाचे नाव-खेडले परमानंद, जन्म दिनांक-०१/०७/१९७५

करिता या जाहिर प्रगटनाद्वारेसुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे। कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणे बाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटनाच्या तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा, मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबंधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

**तहसिलदार**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

**जाहीर प्रगटन**

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांक : जन्म-मृत्यु एसआर/३३/२०२६
नेवासा दिनांक १०/०२/२०२६

अर्जदार श्री/श्रीम-रविंद्र संपत जाधव रा. शिरेगाव ता. नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन अर्जदार श्री/श्रीम/कु. स्वरुपा रविंद्र जाधव यांचा महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे.

सदरच्या अर्जात खालील प्रमाणे मृत्यु नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.

अ.क्र.-१, जन्म नोंद घेण्यात येणाऱ्या व्यक्तीचे नाव-स्वरुपा रविंद्र जाधव, गावाचे नाव-शिरेगाव, जन्म दिनांक-०३/१०/२००८

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे। कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गाची जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणे बाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटनाच्या तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा, मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबंधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

**तहसिलदार**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

**जाहीर प्रगटन**

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांक : जन्म-मृत्यु एसआर/२१/२०२६
नेवासा दिनांक ०५/०२/२०२६

अर्जदार श्री/श्रीम-ज्ञानेश्वर आण्णासाहेब कोलते रा. बहिरवाडी ता. नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन अर्जदार यांनी कै.अंबाबाई (हौसाबाई) ज्ञानदेव कोलते यांचा महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये मृत्यु नोंद गावी जन्म मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे.

सदरच्या अर्जात खालील प्रमाणे मृत्यू नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.

अ.क्र.-१, मृत्यू नोंद घेण्यात येणाऱ्या व्यक्तीचे नाव-कै.अंबाबाई (हौसाबाई) ज्ञानदेव कोलते, गावाचे नाव-बहिरवाडी, मृत्यू दिनांक-०१/११/२०२२

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे। कलम १३(३) अन्वये मृत्यु नोंद गाची जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणे बाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटनाच्या तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा, मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबंधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

**तहसिलदार**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

नेमलेली तारीख १८/०३/२०२६
निशाणी-५

ॲड. संजय बी. लवांडे
सावेडी, अहमदनगर

**जाहीर नोटीस**

अहमदनगर येथील मे. दिवाणी न्यायाधिश साहेब, वरीष्ठ स्तर, अहमदनगर यांचे कोर्टात.
सिव्हील चौकशी अर्ज नंबर- ४९/२०२६
**अर्जदार**
१) दगडाबाई दशरथ चव्हाण
२) दशरथ मगन चव्हाण
दोघे रा.इंदिरानगर, नाव्हा, ता. शिरुर, जि. पुणे.ह.मु. खंडाळा, ता.जि. अहिल्यानगर
**सामनेवाले**-कोणीही नाही

ज्या अर्थी अर्जदार नंबर १ व २ हे पती पत्नी असून, अर्जदार याचा मुलगा नामे अरुण दशरथ चव्हाण हा दि.१०/०६/२०२५ रोजी ससून हॉस्पीटल, पुणे येथे मयत झालेला असून, त्यास अर्जदार नंबर १ व २ हे आई वडिल असे एकमेव कायदेशिर वारसदार आहे. अर्जदार यांचे शिवाय अन्य दुसरे कोणीही मयतास वारस नाहीत. त्यामुळे मयत अरुण दशरथ चव्हाण याचे नांवे असलेल्या खालील नमुद परीशिष्टातील मिळकतीस नांव लावण्याकरीता अर्जदाराचे नांवाने वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्जदार हे मयताचे एकमेव कायदेशिर वारसदार असल्याबाबतचे वारसप्रमाणपत्र मिळणेकरीता प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात दाखल केलेला आहे. मयत मयत अरुण दशरथ चव्हाण याने त्याचे हयातीमध्ये अर्जदाराचे माहितीप्रमाणे कोणतेही मृत्युपत्र, बक्षीसपत्र अगर व्यवस्थापत्र करुन ठेवलेले नव्हते व नाही.

**परीशिष्ट**

मिळकतीचे वर्णन :- मौजे खंडाळा ता. जि. अहिल्यानगर येथील शेतजमिन मिळकत गट नंबर १४६/४ क्षेत्र २ हे ०० आर याचा आकार २ रु.०० पैसे. येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत असे.

त्या अर्थी मयत अरुण दशरथ चव्हाण याचे अर्जदार नंबर १ व २ हे. आई वडिल असे कायदेशिर वारसदार नाहीत अगर मयताचे नावावरील वर नमुद मिळकतीस नांव लावण्याकरीता वारसप्रमाणपत्र मिळण्याचा व मागण्याचा अर्जदार यांना कायदेशिर हक्क व अधिकार नाही असे जर कोणाचे म्हणणे असल्यास त्यांनी या जाहीर नोटीस प्रसिध्दीचे दिनांकापासून एक महिन्याचे मुदतीत लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी या न्यायालयात हजर होवून हरकती कळवाव्यात. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास लागलीच सदरहु न्यायालय अर्जदाराचा पुरावा घेवून अर्जदाराचे नांवाने वारसप्रमाणपत्र अदा करतील व मग तदनंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार चालणार नाही.

आज दि. १३/०२/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले असे.
नेमलेली तारीख-१८/०३/२०२६

शिक्का

**बेंच क्लार्क** — **सि.ज.सि.डि. अहमदनगर**
**अधिक्षक** — **सि.ज.सि.डि. अहमदनगर**

# पान १ वरुन

## हजारो कुटुंबांच्या जीवनावर टांगती तलवार!

गेल्या विधानसभा निवडणुकीचा हा राजकीय सूड असल्याची भावना आंदोलकांमध्ये पसरली आहे.शासन आणि प्रशासनाला स्मरण करावेसे वाटते की, अन्न, वस्त्र आणि निवारा हे मूलभूत हक्क आहेत. अतिक्रमण काढण्याच्या नावाखाली हजारो लोकांना बेघर करणे हे अमानुष आहे. त्याऐवजी पुनर्वसनाची व्यवस्था करणे, मानवतावादी दृष्टिकोन ठेवणे हीच शासनाची नैतिक जबाबदारी आहे. या निर्णयामुळे निर्माण झालेल्या दहशतीतून नागरिकांना मुक्त करण्यासाठी तातडीने चर्चा आणि तोडगा काढावा. अन्यथा, हे आंदोलन अधिक तीव्र होईल आणि समाजातील असमानतेची खोल दरी आणखी रुंदावेल. श्रीरामपूरकरांच्या या व्यथेकडे दुर्लक्ष करणे म्हणजे न्यायव्यवस्थेची हत्या आहे. शासनाने संवेदनशीलता दाखवून हा निर्णय स्थगित करावा, हीच अपेक्षा.

## भरधाव वेगाने घात केला...
## गणपती दर्शनाची आस अधुरी राहिली..!

रस्त्यावरील सुरक्षेच्या अभावाची जाणीव करून देतो. खंडाळा मंदिर शहराशेजारी पायी चालत जाण्याच्या अंतरावर आहे, तरी भरधाव कार चालवण्याची घाई कशासाठी? संवेदनशील नागरिक हा प्रश्न उपस्थित करत आहेत. कदाचित उत्साह, कदाचित वेळेची बचत पण त्यामुळे एक संपूर्ण कुटुंब उद्ध्वस्त झाले. पोलिस निरीक्षक नितीन देशमुख, सहायक निरीक्षक जाधव, उपनिरीक्षक रोशन निकम आणि प्रादेशिक परिवहन अधिकारी अनंत जोशी यांनी घटनास्थळी धाव घेत जखमींना मदत केली, पण हे पुरेसे आहे का? ट्रक चालकाला शोधण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत, पण या अपघाताने उघड झालेल्या रस्ता सुरक्षेच्या कमतरतेवर शासन आणि प्रशासनाने गांभीर्याने विचार करावा. वेगवान वाहतुकीचे नियम अधिक कठोर करणे, ट्रकसारख्या अवजड वाहनांसाठी विशेष निरीक्षण हे सर्व आवश्यक आहे, जेणेकरून अशी व्यथा इतर कुटुंबांना भोगावी लागू नये. चव्हाण कुटुंबाची ही कहाणी एका अपघाताची नाही, तर सामान्य माणसाच्या जीवनातील नाजूक धाग्यांची आहे. ते कष्टकरी होते, मेहनती होते, आणि देवभक्त होते. आज त्यांच्या नजरेत फक्त शून्य आहे. या घटनेने श्रीरामपूरकरांना धडा दिला: जीवन क्षणभंगुर आहे, आणि रस्त्यावरची एक चूक संपूर्ण कुटुंब उध्वस्त करू शकते. शासनाने या कुटुंबाला न्याय द्यावा, आणि अशा अपघातांना रोखण्यासाठी ठोस पावले उचलावीत, हीच अपेक्षा..!

## विधानपरिषदेच्या ९ जागा होणार रिक्त!

गणित राज्यसभा निवडणुकीत जुळविण्याचा महाविकास आघाडीतील घटक पक्षांचा प्रयत्न आहे. गोपीचंद पडळकर, प्रवीण दटके हे २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत निवडून आले आहेत. त्यामुळे त्यांच्या जागी भाजपातील इतरांना संधी मिळू शकते. त्याशिवाय रणजितसिंह मोहिते पाटील यांना पुन्हा भाजपाकडून संधी मिळण्याची शक्यता कमी आहे. विधान परिषदेच्या ९ जागांमध्ये उद्धव ठाकरे यांचीही जागा रिक्त होणार आहे. त्यामुळे ठाकरे पुन्हा विधान परिषदेत दिसणार का याबाबत अद्याप प्रश्नचिन्ह आहे. परंतु आदित्य ठाकरे यांच्याकडून पक्षाला एका विधान परिषदेच्या जागेचा आग्रह धरण्यात येत आहे. विधानसभेतील संख्याबळ पाहता विधान परिषदेच्या ९ जागांवर मोजक्याच जागा विरोधकांना मिळतील. तर भाजपा-शिंदेसेना आणि राष्ट्रवादी अजित पवार यांचे विधान परिषदेतील संख्याबळ वाढण्याची शक्यता आहे. सध्या विधानसभेत भाजपा १३२, शिंदेसेना ५७,राष्ट्रवादी अजित पवार ४०, उद्धवसेना २०, काँग्रेस १६, शरद पवारांची राष्ट्रवादी १०, सपा २, जनसुराज्य २, युवा स्वाभिमान १, राष्ट्रीय समाज पक्ष १, एमआयएम १, सीपीआय १ असे पक्षीय संख्याबळ आहे.

## तीन पावसाळे उलटूनही
## घरकुल लाभार्थ्यांना घर मिळेना

राज्यात अनेक लाभार्थ्यांना घरकुल योजनेअंतर्गत घरे मंजूर झाली आहेत. मात्र, गेल्या तीन वर्षांपासून या घरांसाठीचा निधी रखडलेला आहे. अनेक लाभार्थ्यांनी घरांची बांधकामे सुरू केली आहेत, परंतु पैसे न मिळाल्याने ही कामे अर्धवट अवस्थेत आहेत. लोक आपली घरे सोडून कुठे राहत असतील याचा विचार सरकार करते का? सरकारकडून सतत लवकरात लवकर निधी देऊ ही उत्तर आहेत. हा 'लवकर' नक्की कधी येणार? असा सवाल वडेट्टीवार यांनी विधानसभेत विचारला. तीन वर्षांपासून निधी रखडल्याने लाभार्थ्यांनी तीन पावसाळे त्यांनी कसे काढले असतील, याची सरकारला जाणीव आहे का? हे अधिवेशन संपेपर्यंत तरी गरिबांच्या खात्यात निधी जमा होणार का? असे प्रश्न वडेट्टीवार यांनी घरकुल योजनेबाबत उपस्थित केले. घरकुल योजनेबाबत विधानसभा अध्यक्षांनी गंभीर दखल घेतली. केंद्र शासनाकडून या उपक्रमासाठी किती निधी येणे अपेक्षित आहे आणि तो कधी उपलब्ध होणार, याचा सविस्तर पाठपुरावा करून हे अधिवेशन संपण्यापूर्वी शासनाने संपूर्ण माहिती सभागृहासमोर सादर करावी, असे निर्देश अध्यक्षांनी दिले आहेत.

## अल्पवयीन मुलांना लक्ष्य करणाऱ्या डिजिटल जाहिरातींवर बंदी घालणार का : दरेकर

लक्षवेधीच्या या चर्चेत सहभागी होत आ. दरेकर म्हणाले की, शालेय विध्यार्थ्यांमध्ये ऑनलाईन गेम खेळण्याचे प्रमाण वाढले आहे. मोबाईल गेमवर बंदी घालण्याची मागणी राज्य शिक्षक परिषदेने केलेली आहे. २९ जानेवारी २०२६ रोजी केंद्रीय आर्थिक पाहणी अहवाल प्रसिध्द झाला. सोशल मीडियाच्या वापरावर वयोमर्यादा निश्चित करणे आणि अल्पवयीनांना लक्ष्य करणाऱ्या डिजिटल जाहिरातींवर बंदी घालण्याची शिफारस आर्थिक पाहणी अहवालात करण्यात आली आहे. या शिफारसींच्या आधारे मंत्री आशिष शेलार यांनी अलीकडेच तज्ज्ञांचा 'टास्क फोर्स' नेमण्याचा निर्णय घेतला. हा टास्क फोर्स मुलांच्या डिजिटल सुरक्षिततेसाठी आणि सोशल मीडिया वापराच्या वयोमर्यादेवर उपाययोजना सुचवणारा आहे. टास्क फोर्स नेमण्याबाबत माहिती तंत्रज्ञान विभागाचे प्रधान सचिव विरेंद्र सिंह यांना मंत्री शेलार लेखी सूचना दिली होती. त्यामुळे सोशल मीडिया वापरावर वयोमर्यादा निश्चित करणे आणि अल्पवयीन मुलांना लक्ष्य करणाऱ्या डिजिटल जाहिरातींवर बंदी घालण्याबाबत शासन धोरण तयार करणार का?
आ. दरेकर यांच्या प्रश्नावर उत्तर देताना सांस्कृतिक कार्य आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार म्हणाले की, कुठलीही जाहिरात अपेक्षित असण्यापेक्षा वेगळी विचित्र, अश्लील, फसवणूक करणारी अशा स्वरूपाची गंभीर गुन्ह्याच्या दिशेने येणारी असेल तर त्यावर बंदी करण्यासाठी आयटी ॲक्ट अंतर्गत प्रावधान आहे. त्याबाबतीत राज्य सरकार आयटी ॲक्ट अंतर्गत असलेल्या प्रावधानात कारवाई करेल.

# मुळा कामगारांकडून निमसे व पवार यांचा सत्कार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई, :** महाराष्ट्रातील साखर उद्योगातील कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांबाबत प्रभावी पाठपुरावा केल्याबद्दल मुळा कारखान्याच्या कामगारांकडून डी. एम. निमसे व अशोक पवार यांचा सत्कार करण्यात आला. शेतकी कार्यालयात आयोजित कार्यक्रमात अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत हा सन्मान सोहळा पार पडला.

मुळा कारखाना राष्ट्रीय साखर कामगार युनियनचे अध्यक्ष अशोकराव पवार व सरचिटणीस डी. एम. निमसे यांनी पुणे येथे साखर आयुक्त डॉ. संजय कोलते यांची भेट घेऊन साखर कामगारांच्या कर्जमाफीच्या प्रश्नाकडे लक्ष वेधले होते. राज्य सरकारकडून शेतकरी कर्जमाफीसाठी प्रयत्न सुरू असताना सहकारी संस्थांमधील कर्मचाऱ्यांना या प्रक्रियेतून वंचित ठेवण्याच्या हालचाली सुरू असल्याचे निदर्शनास आले होते. या पार्श्वभूमीवर साखर कामगारांना कर्जमाफीचा लाभ मिळावा, यासाठी प्रतिनिधी मंडळाने निवेदन सादर केले.

महाराष्ट्र राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळाचे अध्यक्ष तात्यासाहेब काळे, सरचिटणीस राऊ शंकर पाटील, उपाध्यक्ष डी. एम. निमसे, मुळा युनियनचे अध्यक्ष अशोकराव पवार व पदाधिकाऱ्यांच्या वतीने साखर आयुक्तांकडे कामगारांच्या मागण्या मांडण्यात आल्या. साखर कामगारांच्या न्याय्य हक्कांसाठी केलेल्या या प्रयत्नांचे कामगारांतून स्वागत करण्यात आले.

या पार्श्वभूमीवर कारखान्याचे शेतकी अधिकारी विजय फाटके, उपशेतकी अधिकारी चावरे, कामगार संचालक किशोर राजगुरू, बन्सी दरंदले, सुभाष लांडे, गोविंद कोंगे, योगेश भगत, रामकिसन पालवे, मधुकर सुरसे, सहचिटणीस भारत पटारे, कामगार संचालक विश्वास डेरे व शेतकी विभागातील सर्व कर्मचारी यांच्या



उपस्थितीत निमसे व पवार यांचा सत्कार करण्यात आला.कामगारांच्या प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा करून न्याय मिळवून देण्याच्या प्रयत्नांमुळे दोन्ही नेत्यांचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात येत आहे.

# शिक्षकांची थकीत देयके निकाली काढण्याची शिक्षक सेनेची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** तालुक्यातील शिक्षकांची वैद्यकीय प्रतिपूर्ती व इतर देयके एप्रिल २०२५ पासून प्रलंबित असल्यामुळे शिक्षकांना मोठ्या आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. वैद्यकीय कारणांसाठी मोठा खर्च करूनही संबंधित बिलांची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरही आर्थिक तरतुदीअभावी देयके मिळालेली नाहीत.तसेच वरिष्ठ वेतनश्रेणी फरक देयके, पदवीधर शिक्षकांची फरक देयके व इतर विविध प्रकारची फरक देयकेही प्रलंबित असून त्यामुळे शिक्षक वर्गामध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

या पार्श्वभूमीवर शिक्षक सेनेच्या वतीने वरिष्ठ स्तरावर सातत्याने पाठपुरावा करण्यात आला असून, शिक्षक संचालक कार्यालयाकडून या थकीत देयकांसाठी आवश्यक आर्थिक तरतूद प्राप्त झाली आहे. त्यामुळे गंगापूर तालुक्यातील एकही शिक्षक वंचित राहू नये, यासाठी सर्व शिक्षकांची देयके तात्काळ जिल्हा परिषदेकडे पाठविण्यात यावीत व हा प्रश्न त्वरित निकाली काढण्यात यावा, अशी मागणी शिक्षक सेनेच्या वतीने गंगापूर गटशिक्षणाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनावर अनिल काळे, भगवान हिवाळे, उद्धव बोचरे, दिपक साबळे, कैलास गायके, राजेंद्र बोल्डे, सचिन साळुंके, निलेश कहाटे, योगेश दांगुर्डे, जावेद पटेल, भास्कर आढाव, सचिन पाठक,शिवाजी सपकाळ, सुनील भापकर, प्रमोद भोरे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# टाकळीभान बस स्टॅन्डचा प्रश्न सोडविणार : शिवाजी धुमाळ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान :** येथील बस स्टॅन्ड बाबत चा प्रश्न गाजत असून गेल्या दोन वर्षापासून या प्रश्नाचे भिजत घोंगडे पडलेले आहे. या पार्श्वभूमीवर माजी ग्राम. सदस्य व प्रगतशील शेतकरी शिवा दादा धुमाळ यांनी बस स्टॅन्ड बाबत पुढाकार घेऊन हा प्रश्न सोडवण्याबाबतची भूमिका घेतली आहे. याबाबत त्यांनी सांगितले, टाकळीभान येथे सुसज्ज बस स्टॅन्ड व्हावे ही सर्वांचीच इच्छा असून. या गावच्या महत्त्वाच्या प्रश्नाबाबत अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे यांची गावातील शिष्टमंडळाने भेट घेऊन टाकळीभान गावातील पोलीस स्टेशनच्या जागेवर प्रशस्त नवीन बस स्टॅन्ड व्हावे व पोलीस स्टेशन हे टाकळीभान ,नेवासा रोड वरील सार्वजनिक बांधकाम खात्याच्या जागेत व्हावे. यासाठी लवकरच ना. राधाकृष्ण विखे यांना शिष्टमंडळ भेट घेणार असल्याचे माजी ग्रा. सदस्य शिवाजी धुमाळ यांनी सांगितले.

# प्राईड प्री स्कूल येथे शिवजयंती उत्साहात साजरी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान :** येथील प्राईड प्री स्कूल येथे शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी स्कूलच्या विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवराय, सईबाई, माता जिजाऊ, मावळे यांचे सुंदर पोशाख परिधान केले होते. चिमुकल्यांच्या छत्रपती शिवरायांच्या जयघोषाने तेथील वातावरण शिवमय झाले होते.

याप्रसंगी प्राईड अकॅडमीच्या संचालिका मा. सभापती डॉ. वंदनाताई मुरकुटे यांच्या हस्ते छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन करून आरती संपन्न झाली. यावेळी प्राचार्य जयश्री वाडेकर, शिक्षिका सुप्रिया कोकणे, अदिती जंगम, पुनम देठे, ज्योती मिरीकर आदींसह स्टाफ व स्कूलचे विद्यार्थी उपस्थित होते




# निधन वार्ता

## बाळासाहेब गांगले



**नेवासा :** तालुक्यातील कांगोणी येथील शेतकरी बाळासाहेब दगडू गांगले (वय ६५) यांचे नुकतेच निधन झाले.

बाळासाहेब गांगले यांच्या पश्चात पत्नी,एक भाऊ, दोन बहिणी,दोन मुले,तीन मुली सूना,नातवंडे असा परिवार आहे. नेवासा न्यायालयाचे जेष्ठ विधी तज्ञ अँड. एस डी गांगले यांचे ते बंधू होते.

## भिमाबाई कसार



**वडाळा महादेव :** श्रीरामपूर तालुक्यातील वडाळा महादेव येथील वारकरी संप्रदायाच्या भिमाबाई तुळशीराम कसार (वय ९०) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात मुले ३ मुली २ दिर पुतणे सुना नातवंडे जावई असा मोठा परिवार आहे येथील सामाजिक कार्यकर्ते दादासाहेब कसार माजी सैनिक रंजकराव कसार अशोक सहकारी साखर कारखान्याचे संचालक रामभाऊ कसार यांच्या त्या मातोश्री होत.

## मच्छिंद्र राऊत



**वडाळा महादेव :** गंगापुर तालुक्यातील तांदुळवाडी येथील मच्छिंद्र लक्ष्मण राऊत (वय ६६) यांचे हृदयविकाराने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी मुले २ मुली ३ सुना नातवंडे जावई असा मोठा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते भागवत राऊत उत्तम राऊत, पद्मा लिंगायत, राणी जाधव, मिरा दळवी यांच्या त्या मातोश्री होत. वडाळा महादेव येथील सामाजिक कार्यकर्ते उमेश जाधव यांचे ते सासरे होत.

## अविनाश वेताळ



**श्रीरामपूर :** इंदिरानगर येथील भविष्यकार हभप. सोपान वेताळ यांचे चिरंजीव अविनाश सोपान वेताळ (वय ४९) यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, वडील, बहिण, भाऊ, भावजय पुतण्या असा मोठा परिवार आहे.

## अनुसया मांढरे



**रांजणगाव :** भांबर्डे ता शिरूर येथील सौ. अनुसया रामचंद्र मांढरे यांचे दु:खद निधन झाले. त्यांच्या मागे पती, दोन मुले, दोन मुली, दीर, जावा, ननंद, नंदवी, बहीण, पुतने पुतनी ,सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. तसेच लक्षण रामचंद्र मांढरे, दतात्रय रामचंद्र मांढरे, सविता जनार्धन शेलार,शैला रमेश पवार यांच्या त्या आई होत्या.

# एनएमएस परीक्षेत जि.प झोडेगाव शाळेचे दोन विद्यार्थी उत्तीर्ण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्यावतीने इयत्ता आठवीच्या वर्गात शिकणाऱ्या , राष्ट्रीय दुर्बल घटक विद्यार्थ्यासाठी दरवर्षी शिष्यवृत्ती परीक्षा घेण्यात येत असते. याही वर्षी डिसेंबर २०२५ मध्ये एनएमएस परीक्षा घेण्यात आली होती या परीक्षेचा निकाल दिनांक २४ फेब्रुवारी रोजी लागला असून या स्पर्धा परीक्षेमध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा झोडेगाव शाळेचे सहा विद्यार्थी परीक्षेसाठी बसले होते

यापैकी श्रद्धा योगेश भराडे, देवयानी बेडवाल दोन विद्यार्थिनी या परीक्षेत उत्तीर्ण झाल्याबद्दल शाळेचे अध्यक्ष पद्माकर भराडे, उपाध्यक्ष किशोर चौधरी, माजी सरपंच शिवाजी अंबाडे, विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन दादासाहेब अंबाडे , प्रमोद शेजुळ, सतीश शेजुळ ,जीवनसिंग बेडवाल, योगेश भराडे ,चंदन बेडवाल यांनी शाळेत येऊन या दोन उत्तीर्ण विद्यार्थिनींचा सन्मान केला. या दोन मुली स्पर्धा परीक्षेत पास झाल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास दुणावला असून स्पर्धा परीक्षेमध्ये भाग घेण्याचा मानस सर्व विद्यार्थ्यांनी केला आहे .

विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षेची गोडी निर्माण होण्यास मदत होत आहे . या दोन विद्यार्थ्यांनी च्या निवडीबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे .याप्रसंगी शालेय अध्यक्ष ,माजी सरपंच, विविध कार्यकारी सोसायटी चेअरमन, ग्रामस्थ , शाळेचे मुख्याध्यापक अनिल काळे शिक्षक विलास वाघ , हरिश्चंद्र खोसे ,सोनाली कांबळे ,सारिका काकडे, मनीषा ढगे , मंदा जाधव, ईश्वर महेंद्र बाळासाहेब शिंदे आदी उपस्थित होते.



# बेलापूर कंपनीचे विस्थापित कर्मचारी भरपाईच्या प्रतिक्षेत

श्रीरामपूर : बेलापूर कंपनीच्या कामगारांना कारखाना बंद झाल्यापासून आतापर्यंत कुठल्याही प्रकारची भरपाई मिळाली नाही. त्यामुळे कामगार बिकट परिस्थितीत आहेत. यातील काही कामगार मयत झाल्याने त्यांचे कुटूंब विस्थापित झाले आहे. या विषयाची दखल घेऊन संबंधितांनी कामगारांच्या हिताचा निर्णय घेऊन न्याय द्यावा, अशी मागणी विस्थापित कामगारांनी पत्रकाद्वारे केली आहे. याबाबत प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, दि बेलापूर शुगर ॲण्ड अलाईड इंडस्ट्रीज लि. हा कारखाना अशिया खंडातील भारत देशातील पहिला साखर कारखाना आहे. हा कारखाना १९८८ साली बंद करण्यात आला.

# नशिबाची परिक्षा

**गुरुवार दि . २६ फेब्रुवारी २०२६**

## मिलनम डे

| उदय-अस्त | | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १७९<br>२७८<br>३३७ | ७-६ | १५०<br>२४०<br>२०० | जोड<br>७०-४६-३१-<br>५२-६९ |

## कल्याण

| उदय-अस्त | | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|---|
| १४५<br>२३५<br>५५० | ०-३ | १२०<br>६७०<br>३९० | जोड<br>०७-१३-२६<br>८९-३४ |

## मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १५६<br>१२९<br>११० | २-४ | १३०<br>१४९<br>११२ | जोड<br>२०-८४-५१-<br>७९-४३ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

# शुभ लाभ


| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 10/11/2025 to 14/11/2025 | 356 40 479 | 900 92 237 | 279 89 667 | 350 81 137 | 579 10 280 |
| 17/11/2025 to 21/11/2025 | 156 29 135 | 190 05 799 | 460 03 490 | 233 87 269 | 149 43 256 |
| 24/11/2025 to 28/11/2025 | 335 19 900 | 689 35 690 | 247 38 800 | 120 36 150 | 116 81 678 |
| 01/12/2025 to 05/12/2025 | 688 20 488 | 460 00 145 | 128 17 223 | 168 57 377 | 239 45 177 |
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/12/2025 to 19/12/2025 | 120 37 359 | 233 86 169 | 237 27 557 | 378 80 578 | 134 85 500 |
| 22/12/2025 to 26/12/2025 | 220 41 470 | 160 76 466 | 600 67 449 | 680 47 340 | 336 27 368 |
| 29/12/2025 to 02/01/2026 | 259 63 599 | 340 75 348 | 250 71 344 | 136 05 140 | 123 64 699 |
| 05/01/2026 to 09/01/2026 | 477 86 178 | 458 73 580 | 355 34 338 | 239 46 259 | 123 67 188 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |
| 26/01/2026 to 30/01/2026 | *** ** *** | 120 30 118 | 679 23 346 | 134 83 247 | 249 52 138 |
| 02/02/2026 to 06/02/2026 | 129 28 170 | 249 55 780 | 570 20 677 | 377 73 247 | 134 87 458 |
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |

✻ वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये ✻

# संगमनेरातील रस्त्यांना स्व.कासट, स्व.परदेशी व स्व. केसेकर यांची नावे द्यावीत; मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** शहरातील प्रमुख रस्त्यांना स्वर्गीय राधावल्लभ कासट, स्व. कुंदनसिंग परदेशी आणि स्व. कैलास उर्फ आप्पा केसेकर यांची नावे देण्यात यावी, अशी मागणी शिवसेना महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी बुधवारी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी दयानंद गोरे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. शिवसेना महायुती पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, स्व. राधावल्लभ कासट, स्व. कुंदन सिंग परदेशी व स्व. कैलास केसेकर यांचा संगमनेर शहराच्या सामाजिक, शैक्षणिक, व्यापारी आणि सार्वजनिक क्षेत्राच्या विकासात मोलाचा वाटा राहिला आहे. त्यांच्या कार्याचा ठसा आजही शहरातील लोकांच्या मना मध्ये जिवंत आहे. वरील तीनही



नेत्यांनी आपल्या आयुष्यात समाज हितासाठी विविध उपक्रम राबवून शहराच्या जडणघडणीत महत्त्वपूर्ण योगदान देत गेले. त्यांनी अनेक शैक्षणिक संस्था, सामाजिक उपक्रम आणि सार्वजनिक सुविधा स्थापन करून शहराच्या प्रगतीस हातभार लावला आहे .

स्व कासट स्व परदेशी आणि स्व केसेकर यांच्या स्मृती कायम चिरंतन राहाव्यात आणि नव्या पिढीसमोर त्यांच्या कार्याचा आदर्श निर्माण व्हावा, यासाठी शहरातील प्रमुख रस्त्यांना त्यांची नावे देणे आवश्यक आहे, असा आग्रह निवेदनात व्यक्त करण्यात आला आहे. शिवसेना महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या निवेदनावर संबंधित पदाधिकाऱ्यांची सह्या देखील आहेत.आता या मागणी वर नगरपरिषद मुख्याधिकार्या कडून काय निर्णय होतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे यावेळी शिवसेना महा युतीच्या नगरसेविका साक्षी सूर्यवंशी, उपजिल्हाप्रमुख दिपाली उपशहर प्रमुख अजित जाधव ,युवासेनेचे उपजिल्हा प्रमख सौरभ देशमुख, तालुकाप्रमुख सुशील शेवाळे, युवती शहरप्रमुख शिवानी आरगडे पुनम दायमा संगीता पुंड पुनम अनाप मंगल खेडकर भाजपचे माजी शहराध्यक्ष सिताराम मोहरीकर प्रवीण कर्पे भारत गवळी वरद बागुल अभिराज सांगळे, सनी धारणकर, अनिकेत चांगले, पुनम दायमा, लाला दायमा, शशांक नामन, अक्षय वर्पे, ऋषिकेश मुळे विनायक तांबे, सोहम नेवासकर, , सागर भोईर, सिद्धेश शेलार, विशाल इंगंदुल, विनायक ओढतुल्ले, सिद्धार्थ तुरकणे,यांच्यासह महायुती कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

# अहिल्यानगर मनपात वारस हक्क नोकरी प्रमाणपत्र वितरण सोहळा

## १६ कर्मचाऱ्यांना मिळाली नियुक्तीपत्रे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : महानगरपालिकेच्या आस्थापनावरील अधिकारी आणि कर्मचारी संख्येत होत असलेल्या घटेमुळे प्रशासनास कामाचे नियोजन करणे आव्हानात्मक ठरत आहे. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने कामकाजावर त्याचा परिणाम होताना दिसत आहे. या पार्श्वभूमीवर, वारस हक्काने नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांनी महापालिकेचे कामकाज शिकून नागरिकांना उत्कृष्ट सेवा द्यावी,



असे प्रतिपादन महापौर ज्योतीताई गाडे यांनी केले. अहिल्यानगर महानगरपालिकेत वारस हक्क नोकरीचे प्रमाणपत्र वाटप सोहळा महापौर ज्योतीताई गाडे व ॲड. उपमहापौर धनंजय जाधव यांच्या हस्ते पार पडला. या सोहळ्यात एकूण १६ वारस कर्मचाऱ्यांना नियुक्तीपत्रे देण्यात आली. या प्रसंगी स्थायी समितीचे माजी सभापती मनोज कोतकर, नगरसेवक महेश लोंढे, रोहन सानप, अनंत लोखंडे, किशोर कानडे, तसेच महानगरपालिका कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या, महापालिकेच्या वाढत्या कामकाजासाठी वारस कर्मचाऱ्यांनी पुढाकार घ्यावा. नागरिकांच्या सुविधा, तक्रारी आणि प्रशासकीय कामकाजात गती यावी यासाठी नवीन कर्मचाऱ्यांनी जबाबदारीने काम केले पाहिजे.

उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, महापालिकेतील अनुभवी कर्मचाऱ्यांकडून नवीन कर्मचाऱ्यांनी कामकाज शिकून घ्यावे. जुन्या कर्मचाऱ्यांचा अनुभव हा नवीन कर्मचाऱ्यांसाठी मार्गदर्शक ठरेल. सर्वांनी एकजुटीने नगरकरांना उत्कृष्ट सेवा देण्याचे कर्तव्य पार पाडावे.

## दखल

### पोस्कोतील आरोपीला अटक करण्याची मागणी; उपोषणाचा इशारा

**अहिल्यानगर** : नेवासा तालुक्यातील एका गावात अल्पवयीन मुलीवर अत्याचार झाल्याची घटना समोर आली असून या प्रकरणात गुन्हा दाखल होऊनही आरोपी अद्याप मोकाट असल्याचा आरोप पीडित कुटुंबीयांनी केला आहे. संबंधित आरोपी रोहण अशोक बोरुडे (रा. रामडोह, ता. नेवासा) याच्याविरुद्ध नेवासा पोलीस स्टेशनयेथे दि. २७ जानेवारी २०२६ रोजी बाल लैंगिक अपराध संरक्षण कायद्यान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

पीडित मुलीवर शेवगाव ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू असताना तिने तक्रार दिली होती. मात्र अद्याप अटक न झाल्याने आरोपीकडून फिर्याद मागे घेण्यासाठी धमक्या दिल्या जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. आरोपी दोन ते तीन वेळा घरी येऊन दमदाटी करत असल्याचेही कुटुंबीयांचे म्हणणे आहे.

### कोळगाव येथील देवी मंदिरात चोरी; सीसीटीव्ही साहित्य चोरी

**लिंपणगाव** : कोळगाव (ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर) येथे अज्ञात चोरट्यांनी देवीच्या मंदिरात घरफोडी करून सुमारे १८ हजार रुपयांचे साहित्य लंपास केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी बेलवंडी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि. २२ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री ११ ते २३ फेब्रुवारी रोजी पहाटे ४ वाजण्याच्या दरम्यान ही घटना घडली. अज्ञात चोरट्यांनी मंदिर परिसरातील मुख्य गेटचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर देवीच्या पलंगाखाली ठेवलेले एनव्हीआर यंत्र, सीपी प्लस कंपनीचे सीसीटीव्ही साहित्य, २ टीबी क्षमतेची हार्ड डिस्क तसेच पांढऱ्या रंगाचा वीज स्विच असा एकूण अंदाजे १८ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी राजेंद्र गुरव (वय ३९, व्यवसाय – पुजारी, रा. कोळगाव) यांनी फिर्याद दिली आहे. गुन्हा नोंद करण्यात आला आहे. मंदिरातील सीसीटीव्ही यंत्रणाच चोरीस गेल्याने तपासात अडचणी निर्माण झाल्या आहेत. तरीही पोलिसांनी परिसरातील इतर ठिकाणच्या कॅमेऱ्यांचे चित्रफीत तपासण्यास सुरुवात केली असून अज्ञात चोरट्यांचा शोध सुरू आहे.

### रस्ता दुरुस्तीची मागणी, डागडुजीचे काम निकृष्ठ



**ढोरजळगांव** : शेवगाव तालुक्यातील भातकुडगांव फाटा ते दहिगाव रस्त्यावर ठिक ठिकाणी मोठ मोठाली खड्डे पडले असुन या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करण्याची मागणी कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती अनिल मडके यांनी केली आहे. यावेळी मडके बोलताना म्हणाले की भातकुडगांव फाटा ते दहिगाव हा रस्ता नेहमी वर्दळीचा असुन या रस्त्याने परीसरात साखर कारखान्याना ऊस वाहतूक केली जात हा महामार्ग पुढे नेवासा तालुक्याला जोडणारा महामार्ग असुन सध्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या वतीने या रस्त्याची डागडुजी सुरू असुन ती अत्यंत निकृष्ट पध्दतीने करण्यात येत असुन त्यामुळे पुढील काही दिवसात या रस्त्याला पुन्हा मोठाली खड्डे पडुन अपघाताच्या प्रमाणात वाढ होणार असुन शेवगाव पाथर्डी तालुक्याचे माजी आमदार नरेंद्र घुले व चंद्रशेखर घुले पाटील यांच्या कार्यकाळात या रस्त्याचे काम करण्यात आले होते.

या रस्त्याच्या कामाला २० वर्ष उलटूनही गेली आहेत. शेवगाव पाथर्डी तालुक्याच्या लोकप्रतिनिधींनी या रस्त्याच्या कामासाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी अनिल मडके यांनी केली आहे.

### भुयारी पुलाचे काम संथ गतीने सुरु

**पुणतांबा** : रेल्वे खात्या मार्फत पुणतांबा येथे नवीन रेल्वे फाटकाच्या उत्तर बाजूला सुरु असलेल्या भुयारी पुलाचे (अंडरपास ) काम धिम्म्या गतीने सुरु असल्यामुळे पुणतांबा मार्गे श्रीरामपूर व कोपरगाव कडे जाणारे प्रवाशी वर्ग व पुणतांबा ग्रामस्था मध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. भुयारी पुलाचे काम ८ डिसेंबर २०२५ रोजी सुरु झाले आहे अंदाजे २१ मीटर रुंद व ६ मीटर खोली असलेल्या व दोन्ही बाजूला १०० मीटर पेक्षा जास्त लांबीचा रस्ता असलेल्या ह्या पुलाचे सध्या पूर्व बाजूचे खोदाई , पायटिंग तसेच लोखंडी सांगाडा तयार करण्याचे तसेच पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करण्याचे काम प्रगती पथावर आहे. काम सुरु होऊन अडीच महिने झालेले आहेत.

मात्र खोदाई करतांना पाणी लागल्यामुळे काम करण्यास विलंब झाला आहे. अनेक वेळा फाटक बंद झाल्यावर वाहतूकीची कोंडी होत असल्यामुळे प्रवाशी वर्ग त्रस्त होत आहे. त्यामुळे ह्या भुयारी पुलाचे काम जलद गतीने व्हावे अशी मागणी ग्रामस्थ व प्रवाशी वर्गाकडून केली जात आहे

# वाघोलीने सलग तिसऱ्यांदा 'माझी वसुंधरा' अभियानात बाजी मारली

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव** : वाघोली ता.शेवगाव येथील ग्रामपंचायतीने राज्य सरकारच्या 'माझी वसुंधरा' अभियानात सलग तिसऱ्या वर्षी देखील राज्यस्तरावर बाजी मारली असून ग्रामपंचायतीस पर्यावरण क्षेत्रातील योगदानाबद्दल ५०लाख रुपयांचा राज्यस्तरीय उत्तेजनार्थ पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. मुंबई येथे झालेल्या कार्यक्रमात राज्यपाल आचार्य देवव्रत,पर्यावरण मंत्री ना.पंकजा मुंडे यांच्या हस्ते गटविकास अधिकारी सोनल शहा, सरपंच सुश्मिता भालसिंग, उमेश भालसिंग, उपसरपंच कल्पना भालसिंग,हिराबाई शिंगटे, ग्रामसेविका जनाताई फटाले यांनी स्मृतिचिन्ह व मानपत्र स्वरूपातील हा पुरस्कार



स्विकारला.यावेळी उपमुख्यमंत्री ना.सुनेत्रा पवार,राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल,अ.नगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी , अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी मुळीक ,माझी वसुंधरा अभियानाचे नोडल अधिकारी राजेंद्र देसले,जिल्हा समन्वयक रविंद्र ठाणगे आदी प्रमुख उपस्थित होते.

वाघोली ग्रामपंचायतीने गेल्या दहा वर्षामध्ये वृक्षलागवड,वृक्षसंवर्धन, जलसंधारण, याबरोबरच सौरऊर्जा,बायोगॅस या अपारंपरिक उर्जास्त्रोतामध्ये उल्लेखनीय कामगिरी केली असून त्या आधारे लोकसभागातून व श्रमदानातून पर्यावरण क्षेत्रात विशेष योगदान दिले आहे.ग्रामस्वच्छता व जलजीवन मिशन याबरोबरच विविध शासकीय योजनांची यशस्वी अंमलबजावणी करून गावाने जिल्ह्यात व राज्यात अव्वल लौकिक मिळवला आहे.

# नशामुक्त पिढी हीच राष्ट्राची ताकद : डॉ. उद्धव शिंदे



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : आजची युवा पिढी नशेच्या विळख्यात अडकू नये यासाठी वेळेत जनजागृती होणे आवश्यक आहे. व्यसनमुक्त समाज घडविण्यासाठी विद्यार्थी, पालक आणि समाजाने एकत्र येऊन अमली पदार्थांविरोधात ठाम भूमिका घ्यावी, असे आवाहन स्नेहबंध फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांनी केले. स्नेहबंध सोशल फौंडेशन, अहिल्यानगर यांच्या वतीने अमली पदार्थांविरुद्ध लढा व व्यसनमुक्ती धोरणाची सुरुवात करण्यात आली. या जनजागृती मोहिमेचा प्रारंभ भिंगार येथील श्रीमती ॲबट मायादेवी गुरुदित्ताशाह हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज तसेच भिंगार स्पोर्ट्स क्लब येथे करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमास पर्यवेक्षिका कविता शिंदे, शिक्षकवृंद, क्लबचे प्रशिक्षक विठ्ठल काळे व शंकर औरंगे व विद्यार्थी उपस्थित होते. डॉ. उद्धव शिंदे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत अमली पदार्थांच्या सेवनामुळे होणारे शारीरिक, मानसिक व सामाजिक दुष्परिणाम स्पष्ट केले. व्यसनामुळे वैयक्तिक जीवन, कुटुंब व समाज कसा उद्ध्वस्त होतो, याची उदाहरणांसह माहिती देत विद्यार्थ्यांना नशेपासून दूर राहण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी अमली पदार्थविरोधी जनजागृती पोस्टरचे अनावरण करण्यात आले. पोस्टरवर स्वस्थ जीवन, सुंदर भविष्य – नशेपासून दूर रहा, जीवनाला हो म्हणा, अमली पदार्थांना नाही म्हणा, मादक द्रव्याची नशा – अनमोल जीवनाची दुर्दशा अशा प्रभावी घोषणा आहेत.

# व्यायाम, आरोग्य आणि चांगले संस्कार ही यशस्वी जीवनाची त्रिसूत्री : महेश पाटील

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**भेंडा** : विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शैक्षणिक विकासाबरोबरच विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक, क्रीडा, साहित्य, खेळ यांचाही विकास होणे गरजेचे आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांनी व्यायाम, आरोग्य आणि चांगले संस्कार या त्रिसूत्रीचा अंगिकार करावा, असे प्रतिपादन नेवासा येथील पोलीस निरीक्षक महेश पाटील यांनी केले. श्री मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्थेचे, जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालयात दि.२५ फेब्रुवारी रोजी वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त विविध गुणदर्शन कार्यक्रमाच्या उद्घाटन समारंभ प्रसंगी उद्घाटक म्हणून ते बोलत होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षण संस्थेचे सहसचिव रवींद्र मोटे हे होते. व्यासपीठावर शिक्षण संस्थेचे विश्वस्त श्री शिवाजी कोलते , प्राचार्य डॉ. शिरीष लांडगे, गणेश गव्हाणे, बाळासाहेब डोहाळे , अल्ताफ शेख, मेस्माळे, बाळासाहेब उगलमुगले, नामदेव शिंदे, परीक्षक प्राचार्य ओंकार रसाळ आणि मच्छिंद्र पानकर, उपप्राचार्य डॉ. संभाजी काळे, डॉ. काकासाहेब लांडे कार्याध्यक्ष डॉ. अजित गेडाम, सहकार्याध्यक्ष, डॉ. अनुराधा बोठे उपस्थित होते.

महाविद्यालयीन जीवन हे आनंददायी असून विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबत इतर कलागुणांबरोबरच आपले शरीरआणि मन घडवावे असे रविंद्र मोटे यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतातून सांगितले. दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. विद्यार्थ्यांकडून विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण करण्यात आले. यात नृत्य, नाटिका, समूहगान, देशभक्तीपर गीत, शिवकालीन मर्दानी खेळ, टिपरी गीत विनोदी बातमी, तसेच पारंपरिक व आधुनिक कलाविष्कारांचा समावेश होता.

कार्यक्रमासाठी सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. मोहिनी साठे, डॉ. रामदास आरले, राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख डॉ. संजय महेर, शास्त्र शाखाप्रमुख प्रा. केशव चेके, शारीरिक शिक्षण संचालक डॉ. दत्ता वाकचौरे, प्रा. संतोष शेळके रवींद्र पाटील, लक्ष्मण ओहोळे, प्रशांत चव्हाण, अरबाज शेख यांच्यासह सर्व प्राध्यापक शिक्षकेतर सेवक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाने महाविद्यालयात आनंददायी व उत्साही वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाची सांगता पसायदानाने करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. शिरीष लांडगे यांनी केले. सूत्रसंचालन अशोक सागडे आणि प्रा. सुलतान आतार यांनी केले, तर डॉ. अनुराधा बोठे यांनी आभार व्यक्त केले.

# रस्तारोकोनंतर प्रशासनाचे पत्र; मात्र रस्ता तसेच वितरिका अजूनही रखडलीच?

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : कुकडी कालव्याच्या वितरिका क्र.१४ च्या तसेच रस्ता दुरुस्तीच्या मागणीसाठी ग्रामस्थांनी दिलेल्या रास्ता रोकोच्या इशाऱ्यानंतर प्रशासनाने तातडीने पत्र काढत दुरुस्ती प्रक्रियेची माहिती दिली. मात्र पत्रापुरती हालचाल आणि प्रत्यक्ष मैदानात कसलेही काम सुरु झालेच नसल्यामुळे मोठ्या प्रमाणात नाराजी व्यक्त केली जात आहे. श्रीगोंदा तालुक्यातील शेडगाव येथील सरपंच ग्रामस्थांनी मिळून आढळगाव फाटा ते शेडगाव फाटा रस्त्याची तात्काळ दुरुस्थी तसेच कुकडी कालव्याच्या वितरिका क्र.१४ च्या दुरुस्थीसाठी शेडगाव या ठिकाणी १० फेब्रुवारी रोजी रास्ता रोको केला होता त्यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाने पत्र काढत लवकरात लवकर डांबरीकरण करण्याचे लेखी पत्र दिले मात्र त्यावर १५ दिवस उलटूनही कसलेच कामे झाले नाही तर कुकडी वितरिका १४ च्या दुरुस्थी बाबत दिनांक ८ फेब्रुवारी रोजी जलसंपदा विभागाकडून ग्रामपंचायतीला पाठविण्यात आलेल्या पत्रात दुरुस्तीचा प्रस्ताव प्रक्रियेत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. काही भाग वनविभागाच्या अखत्यारित येत असल्याने तांत्रिक बाबींचा उल्लेख करण्यात आला आहे.

तसेच मशीनरी उपलब्ध करून साफसफाई व दुरुस्ती करण्यासाठी वरिष्ठ पातळीवर चर्चा सुरू असल्याचे सांगण्यात आले.मात्र रास्ता रोको मागे घेण्याचे आवाहन करताना प्रशासनाने कामाच्या सुरुवातीबाबत स्पष्ट कालमर्यादा दिलेली नाही. त्यामुळे आंदोलन थांबवा हा संदेश ठळक, पण काम कधी सुरू? हा प्रश्न अनुत्तरितच राहिला आहे. याबाबत सरपंच विजय शेंडे यांनी प्रशासनावर थेट सवाल उपस्थित केला आहे. रस्ता रोकोची घोषणा होताच पत्र आले; पण कालव्यावर तसेच रस्त्यावर दुरुस्तीसाठी यंत्र दिसत नाहीत. आश्वासने हवेत विरलीत का?असा प्रश्न उपस्थित केला आहे तर यामुळे स्थानिक शेतकऱ्यांमध्येही नाराजीचे सूर उमटत आहेत.

**पत्राने काहीच झाले नाही शेतकरी - विजय रसाळ शेतकरी**

पत्राने रस्ता दूरस्थ होत नाही तसेच पाणी येत नाही; दुरुस्ती झाली कीच शेताला दिलासा, अशी प्रतिक्रिया एका शेतकऱ्याने व्यक्त केली.दरम्यान, प्रशासनाकडून प्रत्यक्ष कामाला सुरुवात होईल का, की ही बाब फाईल पुरतीच राहील, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.असे विजय रसाळ यांनी बोलताना सांगितले.

# काशीविश्वेश्वर संस्थानतर्फे भारुडसम्राट हमिद सय्यद यांचा सत्कार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कुकाणा** : नेवासा तालुक्यातील तरवडी येथील श्रीक्षेत्र काशीविश्वेश्वर संस्थान यांच्या वतीने भारुडसम्राट हमिद सय्यद यांचा सत्कार करण्यात आला. महाराष्ट्र शासनाचा २०२४-२५ चा राज्य सांस्कृतिक युवा पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल तसेच जिल्हा अहिल्यानगर राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलाकार मानधन निवड समितीच्या सदस्यपदी निवड झाल्याबद्दल त्यांना गौरविण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे भारूड विधिनाट्य क्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल हमिद सय्यद यांना राज्य सांस्कृतिक युवा पुरस्कार प्रदान करण्यात आला होता. हा पुरस्कार आशिष शेलार यांच्या हस्ते मुंबई येथे प्रदान करण्यात आला. पुरस्काराचे स्वरूप एक लाख रुपये रोख, सन्मानचिन्ह, शाल व सन्मानपत्र असे होते. सत्कार समारंभाच्या अध्यक्षस्थानी संस्थानचे प्रमुख रामनाथ महाराज राजगुरु (काळेगावकर) होते. प्रमुख अतिथी म्हणून प्रसिद्ध कीर्तनकार शिवशाहीर कल्याण महाराज काळे व सेवा सहकारी संस्थेचे माजी अध्यक्ष बाळासाहेब पाटील उपस्थित होते. यावेळी कल्याण महाराज काळे व हमिद सय्यद यांनी मनोगत व्यक्त केले. रामनाथ महाराज राजगुरु यांनी पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास त्रिंबक कन्हेरकर, रामकिसन क्षिरसागर, सोपान नलगे, एकनाथ वडगे, रविंद्र पेटे, सयाजी कन्हेरकर, रावसाहेब तुपे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन शिरीष देशपांडे यांनी केले तर आभार कैलास महाराज राजगुरु यांनी मानले.

# ज्याला नामाचे रहस्य समजले, तोच भवसागर तरून जाईल : हभप नामदेव महाराज

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पारनेर** : ज्याला नामाचे रहस्य समजले, तोच भवसागर तरून जाईल. रामनामत जी ताकत आहें ती कशातच नाही. रोजच्या कामांच्या व्यापात असतानाही, इतर गोष्टी करण्यापेक्षा 'रामराम' म्हणा, तेच आता सर्वात मोठे काम आहे. सतत नामस्मरण केल्याने संसारातील भवश्रम दूर होईल आणि दुःखाचे सुखात रूपांतर सुखात होईल. मृत्यूच्या समयी जेव्हा प्राण जातो तेव्हाच या राम नामाची खरी किंमत कळते. तुकाराम महाराज सांगतात, ज्यांना नामाचे हे रहस्य समजले,तेच भवसागरातून तरून जाईल असे निरूपण हभप रामायनाचार्य नामदेव महाराज लबडे यांनी केले. श्री संत तुकाराम महाराज बिजोत्सवा निमित्त पारनेर तालुक्यातील वडझिरे येथील अखंड हरीनाम



सप्ताहास ५० वर्ष पूर्ण झाल्यामुळे, सुवर्ण महोत्सवी अखंड हरीनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते.

भव्य कीर्तन सोहळ्यातील पहिल्या दिवसाचे भव्य कीर्तन सोहळ्यात पहिल्या दिवसाचे कीर्तनपुष्प हभप रामायणचार्य नामदेव लबडे पंढरपूर यांनी गुंफले. यावेळी हभप नामदेव महाराज लबडे यांनी कामामध्ये कामं काही म्हणा राम राम, जाईल भवश्रम सुख होईल दुःखाचे या अभंगावर सविस्तर निरूपण केलें. यावेळी बोलताना महाराज म्हणाले,जी ताकत देवाच्या नावात आहें तिचं ताकत तुकारामात आहें असे म्हणाले. संसारात परमार्थ असायला हवा असे महाराज म्हणाले. नव्हे नव्हे संसार करता करता परमार्थ करायला हवा. तरच रामनामाचे सार्थक होईल असेही महाराज म्हणाले. मानव देहामध्ये याचं जन्मात देवनाम घ्या. तरच जीवनाचे सार्थक होईल. या कीर्तनाचे श्रवण करण्यासाठी मोठ्या संख्येने भाविकभक्त उपस्थित होते.

# मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे उपक्रम आरोग्यवर्धक : डॉ. नरवडे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**निघोज** : मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट संचालित मळगंगा प्रसादालय येथे शेंगदाणा तेल निर्मिती यंत्राचे उद्घाटन आरोग्य प्रबोधनकार डॉ. नामदेव नरवडे यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी बोलताना ट्रस्टचे उपक्रम समाजाभिमुख व आरोग्यवर्धक असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या प्रारंभी ट्रस्टचे अध्यक्ष वसंत कवाद व उपाध्यक्ष अमृता रसाळ यांनी प्रास्ताविकात संस्थेच्या विविध सामाजिक उपक्रमांची माहिती दिली.

डॉ. नरवडे यांनी आपल्या भाषणात सध्याच्या काळात अन्नपदार्थांतील भेसळ ही गंभीर समस्या बनली असून त्यामुळे विविध आजारांचे प्रमाण वाढत असल्याची खंत व्यक्त केली. तेल, दूध व इतर खाद्यपदार्थांतील भेसळ रोखण्यासाठी स्थानिक पातळीवर शुद्ध उत्पादनाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टने शेंगदाणा



तेल यंत्राच्या माध्यमातून ग्रामस्थांना शुद्ध व आरोग्यदायी तेल उपलब्ध करून देण्याचा उपक्रम हाती घेतला असून त्याचा लाभ परिसरातील नागरिकांना होणार आहे, असे त्यांनी सांगितले. आरोग्याकडे दुर्लक्ष व भेसळयुक्त आहारामुळे कमी वयात गंभीर आजार वाढत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमास ट्रस्टचे पदाधिकारी, विश्वस्त, सल्लागार मंडळ सदस्य, आजी-माजी सरपंच, उपसरपंच तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन सोमनाथ वरखडे यांनी केले, तर सचिव शांताराम कळसकर यांनी आभार मानले.


निशाणी नंबर : ०६
दिनांक : २५/०२/२०२६
नेमलेली तारीख : ०२/०४/२०२६

**जाहीर नोटीस**

ॲड.के.डी.मोटे
नेवासा कोर्ट

नेवासा येथील मे.सिव्हिल जज्ज साहेब, ज्यु.डी.यांचे कोर्टात
वारस चौकशी अर्ज नं.१०/२०२६

**अर्जदार**
१) सविता शंकर सावंत, वय-३६, धंदा-घरकाम
२) संकेत शंकर सावंत, वय-१८, धंदा-शिक्षण
३) साई शंकर सावंत, वय-१५, धंदा-शिक्षण अ.पा.क जनक आई अर्जदार नं.१,
४) शंकुतला नारायण सावंत, वय-६७, धंदा-घरकाम, सर्व रा. मध्यमेश्वर नगर, नेवासा खुर्द, ता. नेवासा, जि.अ.नगर

**सामनेवाले** : कुणीही नाही

**मयत** : शंकर नारायण सावंत, मयत दिनांक २५/०८/२०२५

वरील अर्जदार यांनी सदरचा अर्ज या मे. न्यायालयामध्ये मयतास वारस म्हणून वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता दाखल केलेला असुन मयत शंकर नारायण सावंत हे दि. २५/०८/२०२५ रोजी मयत झालेले आहे. मयत शंकर नारायण सावंत हे दि.२५/०८/२०२५ रोजी ते श्रीरामपुरवरुन बाभळेश्वरकडे चालले असता ते मोटार सायकल चालवित असतांना त्यांचा अपघात होवुन ते गंभीर जखमी झाले व त्यांना प्रवरा मेडीकल हॉस्पिटल लोणी याठिकाणी नेले असता त्यांना मृत्य घोषित केले. परंतु सदर हॉस्पिटलमध्ये पत्नीचे नाव नजरचुकीने सविता ऐवजी सरिता असे लिहिण्यात गेले व त्याचप्रमाणे सदर अपघात हा बाभळेश्वर हद्दीत झाल्यामुळे व मयत शंकर हे त्या हद्दीतच अपघाताचे ठिकाणीच मयत झालेले असल्याने लोणी पोलीस स्टेशन येथे सदर अपघाताची नोंद झाली व सदर मृत्युबाबतची खबर लोणी पोलीस स्टेशन यांनी बाभळेश्वर ग्रामपंचायतीस दिली. त्याप्रमाणे मृत्युचा दाखला बाभळेश्वर ग्रामपंचायत यांनी तयार केला. सदर दाखल्यावर देखील पत्नीचे नाव सरिता असे नमुद करण्यात आलेले आहे. सदरचे नाव हे चुकीचे असुन सदरचे नाव ग्रामपंचायत बाभळेश्वर यांना दुरूस्त करून अर्जदार नं.१ यांनी मागितले असता त्यांनी सिव्हिल कोर्टाचे वारस प्रमाणपत्र आणावे असे सांगितले, त्याशिवाय सदरचे नाव दुरूस्त करता येणार नाही असे सांगितले व तसे पत्र दि.०५/०१/२०२६ रोजी अर्जदार नं.१ यांना दिले, म्हणुन सदरचा अर्ज अर्जदार यांनी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदरील मयत शंकर नारायण सावंत यांचे कायदेशीर वारसा संदर्भात कुणाचेही काही एक म्हणणे किंवा कुणाची काही एक हरकत असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द तारखेपासून ३० दिवसाचे आत अथवा किंवा नेवासा न्यायालयातील पुढील नेमलेली दि.०२/०६/२०२६ या दिवशी स्वतः अगर वकिलांमार्फत सर्व कागदपत्रानिशी उपस्थित रहावे अन्यथा उपस्थित राहण्यास कसुर केल्यास सदरील अर्जाची सुनावणी होवून योग्य तो हुकूम केला जाईल याची नोंद घ्यावी.

नेवासा आज दिनांक २५/०२/२०२६ रोजी माझी सही निशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी नोटीस दिली असे.

दि.२५/०२/२०२६

शिक्का

हुकूमावरुन

**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय, क.स्तर, नेवासा**

**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, क.स्तर, नेवासा**

# जलसंपदा विभागाची १,२२२ कोटींची पाणीपट्टी वसुलीचा आदेश




प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** पुणे विभागातील स्थानिक स्वराज्य संस्था, साखर कारखाने आणि औद्योगिक वसाहतींकडे थकीत असलेली तब्बल १ हजार २२२ कोटी रुपयांची पाणीपट्टी कोणत्याही परिस्थितीत वसूल करावी, असे सक्त आदेश राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले आहेत. संबंधित थकबाकीदार संस्था राजकीयदृष्ट्या कितीही प्रभावशाली असल्या तरी कारवाईत कोणतीही तडजोड करू नये, अशा स्पष्ट सूचनाही त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

राज्याच्या जलसंपदा विभागांतर्गत कार्यरत असलेल्या कृष्णा खोरे विकास महामंडळ अंतर्गत पुणे पाटबंधारे मंडळ कार्यरत आहे. या मंडळामार्फत जिल्ह्यातील दोन महापालिका, सहा औद्योगिक विकास महामंडळे, तीन नगरपालिका व नगरपरिषदा, तसेच सहकारी साखर कारखाने आणि शेतकरी यांना सिंचनासह पिण्यासाठी दरवर्षी सुमारे १८० टीएमसी पाणीपुरवठा केला जातो. या पाणीपुरवठ्याच्या बदल्यात संबंधित संस्थांकडून दरवर्षी पाणीपट्टी आकारली जाते.

मात्र, गेल्या पाच ते सहा वर्षांपासून काही संस्थांनी जाणीवपूर्वक पाणीपट्टीची रक्कम न भरल्यामुळे थकबाकीचा आकडा सातत्याने वाढत गेला आहे. सध्या ही थकबाकी १ हजार २२२ कोटी रुपयांवर पोहोचली असून, त्यात काही महापालिका, नगरपालिका आणि सहकारी साखर कारखान्यांचा समावेश आहे. ही वाढती थकबाकी वसूल करणे हे पुणे पाटबंधारे विभागासमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. सामान्य नागरिकांवर विविध करांचा बोजा टाकणाऱ्या प्रशासनाकडून आता प्रभावशाली संस्थांवर नेमकी कोणती कारवाई केली जाणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**थकबाकी वसुलीबाबत कठोर भूमिका :**
कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थेकडे किंवा इतर संबंधित संस्थेकडे कितीही मोठी रक्कम थकीत असली, तरी ती वसूल करण्यासाठी कठोर पावले उचलावीत, असे निर्देश मंत्र्यांनी अधिकाऱ्यांना दिले आहेत. राजकीय दबावाला बळी न पडता नियमानुसार कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले असून, येत्या काळात थकबाकीदार संस्थांवर दंडात्मक कारवाई होण्याची शक्यता आहे.

## द • ख • ल

## सुरेश वडगावकर यांचा सहस्त्र चंद्रदर्शन सोहळा



**आळंदी :** श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व माजी नगराध्यक्ष सुरेश वडगावकर यांच्या सहस्र चंद्रदर्शन सोहळ्यानिमित्त विविध आध्यात्मिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार (दि.१मार्च) रोजी फ्रुटवाले धर्मशाळा येथे हा बहुप्रतीक्षित सोहळा उत्साहात पार पडणार असून, धार्मिक कार्यक्रमांसोबत समाजोपयोगी उपक्रमांचीही रेलचेल असणार आहे.

सहस्र चंद्रदर्शन सोहळ्याची सुरुवात माऊलींना अभिषेकाने होणार असून त्यानंतर दिंडी प्रदक्षिणा, प्रवचन, सत्संग, किर्तन आणि अभंगवाणी यांचे आयोजन करण्यात आले आहे. आध्यात्मिक वातावरणात भक्तीचा सुरेल दरवळ अनुभवता यावा, यासाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे. तसेच आरोग्य शिबिर, रक्तदान शिबिर, वृक्षारोपण, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप आणि ग्रंथतुला यांसारखे सामाजिक उपक्रमही राबविण्यात येणार आहेत.

या कार्यक्रमास खासदार डॉ.अमोल कोल्हे, आमदार बाबाजी काळे, माजी आमदार दिलीप मोहिते, नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे यांच्यासह पंढरपूर, आळंदी व देहू संस्थानांचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. समाजातील विविध क्षेत्रांतील मान्यवरही या सोहळ्यास हजेरी लावणार असल्याची माहिती आयोजक अजित वडगावकर यांनी दिली. सहस्र चंद्रदर्शन सोहळ्याच्या निमित्ताने आध्यात्मिक उन्नतीसोबत सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश देण्यात येणार असून, आळंदीकरांसाठी हा सोहळा प्रेरणादायी ठरणार आहे.

## वानवडी पुणे येथे ५१ विद्यार्थ्यांची मोफत नेत्र तपासणी

**पुणे :** (शिक्षण विभाग) व यांच्या संयुक्त विद्यमाने , वानवडी येथे मंगळवारी (ता. २४) विद्यार्थ्यांसाठी मोफत दृष्टीदोष तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात एकूण ५१ विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी १४ विद्यार्थ्यांना त्यांच्या डोळ्यांच्या नंबरनुसार मोफत चष्मे देण्यात येणार असून ७ विद्यार्थ्यांवर पुढील तपासणीनंतर मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. तसेच विद्यार्थ्यांना डोळ्यांची काळजी व दृष्टीसंवर्धनाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.गटशिक्षणाधिकारी हेमंतकुमार खाडे यांनी एक चष्मा केवळ दृष्टी सुधारत नाही, तर विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवतो, असे सांगितले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी शाळेच्या प्राचार्या कश्मीरी शाहेदा, रुग्णालयाचे समन्वयक शशिकांत भिसे तसेच विशेष शिक्षक सुवर्णा पुंडे, गोपाल शिवशरण, बबिता चव्हाण, संतोष देशमुख, ज्योती वाल्हेकर, सहीर सय्यद, दिशा शेवाळे, बाळू चव्हाण, निजामुद्दीन चिस्ती व सुनीता गिरी यांनी विशेष परिश्रम घेतले.या उपक्रमाबद्दल नागरिकांकडून समाधान व्यक्त करण्यात आले.




## सोमवारपासून वडाळा महादेव येथे त्रिदिनी धार्मिक सोहळा

**वडाळा महादेव :** येथील श्री क्षेत्र रेणुका देवी आश्रमात दि. २ ते ४ मार्चदरम्यान त्रिदिनी समाधी पूजन, दिंडी स्वागत, भजन-प्रवचन व महाप्रसादाचा धार्मिक सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

सोमवारी (दि. २) हुताशनी पौर्णिमेनिमित्त आश्रमाचे संस्थापक मौनयोगी सद्गुरू रेवणनाथ महाराज यांची ८० वी जयंती साजरी होणार असून गायत्री व देविदास केंद्रे तसेच शोभा व कृष्णा केंद्रे यांच्या हस्ते पादुका व समाधी पूजन, महाआरती व खिचडी प्रसाद होईल.

मंगळवारी (दि. ३) नाथषष्ठीनिमित्त मुळगाव ते पैठण पायी दिंडी (१२ वे वर्ष) स्वागत सोहळा पार पडेल. ह.भ.प. साधनाताई मुळे यांचे प्रवचन होणार असून सरपंच श्री व सौ सचिन पवार व श्री व सौ प्रवीण फरगडे यांच्या हस्ते महाआरती होईल.

बुधवारी (दि. ४) काकडवाडी ते पैठण दिंडी (४८ वे वर्ष) स्वागत होऊन ह.भ.प. दत्तात्रय बहिरट महाराज यांचे प्रवचन होईल. विविध मान्यवरांच्या हस्ते महाआरती व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## लोणी-प्रवरानगर येथे 'अहिल्यानगर ग्रंथोत्सव २०२५'

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर :** जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर व सिंधुताई एकनाथराव विखे पाटील सार्वजनिक वाचनालय, लोणी बु. यांच्या संयुक्त विद्यमाने 'अहिल्यानगर ग्रंथोत्सव २०२५'चे आयोजन दि. २८ फेब्रुवारी व १ मार्च २०२६ रोजी करण्यात आले आहे. हा ग्रंथोत्सव

पद्मश्री विखे पाटील आर्ट सायन्स अँड कॉमर्स कॉलेज येथील मा. खासदार बाळासाहेब विखे पाटील बहुउद्देशीय सभागृहात होणार असल्याची माहिती जिल्हा ग्रंथालय अधिकारी यांनी दिली.

उद्घाटन समारंभ राम शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली तर ना. राधाकृष्ण विखे यांच्या हस्ते दि. २८ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता होणार आहे. कार्यक्रमास विविध लोकप्रतिनिधी व मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या प्रसंगी ग्रंथपालन प्रमाणपत्र परीक्षेत यशस्वी विद्यार्थ्यांचा, साहित्यिकांचा व उत्कृष्ट वाचकांचा गौरव करण्यात येणार आहे. तसेच मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निबंध स्पर्धेचे पारितोषिक वितरण व आर आर आर एल एफ पोर्टलवर १०० टक्के ऑनलाईन नोंदणी करणाऱ्या तालुका ग्रंथालयांना प्रशस्तीपत्र देण्यात येणार आहे. शनिवारी सकाळी ८.३० वाजता ग्रंथदिंडीचे आयोजन करण्यात आले असून उद्घाटनानंतर परिसंवाद, व्याख्याने व कविसंमेलनाचे कार्यक्रमही पार पडणार आहेत.

## संत तुकाराम बीज उत्सवानिमित्त एकनाथ गाथा पारायण सोहळा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर :** राहाता तालुक्यातील लोणी बुद्रुक येथे दि. २७ फेब्रुवारी ते ६ मार्च दरम्यान जगद्गुरु संत श्री तुकाराम बीज उत्सवानिमित्त श्रीमद् भागवत कथा व संत एकनाथ गाथा पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

जगद्गुरु संत तुकाराम महाराज सेवा ट्रस्ट व ग्रामस्थांच्या संयुक्त विद्यमाने हा सोहळा आयोजित करण्यात आला असून यंदा या उपक्रमाचे २६ वे वर्ष आहे.

वरदविनायक सेवाधामचे प्रमुख उद्धव महाराज मंडलिक यांच्या मार्गदर्शनाखाली व लोणी भूषण हभप भारत महाराज धावणे यांच्या नेतृत्वाखाली सोहळ्याचे नियोजन करण्यात आले आहे. दररोज सकाळी ७ ते ११ या वेळेत संत एकनाथ गाथा पारायण तर रात्री ८ ते ११ या वेळेत श्रीमद् भागवत कथा होणार आहे. माजलगाव (जि. बीड) येथील भागवताचार्य संगीताताई कोरडे यांच्या वाणीतील भागवत कथा भाविकांसाठी विशेष आकर्षण ठरणार आहे.

दि. ५ मार्च रोजी तुकाराम बीजनिमित्त हरिकीर्तन व मान्यवरांचा सत्कार होईल. तसेच दि. ६ मार्च रोजी काल्याचे कीर्तन पार पडणार असून 'लोकनेते डॉ. बाळासाहेब विखे पाटील स्मृती संत सेवा पुरस्कार' हभप गोपाळ महाराज उरळकर (उरळ, ता. बाळापूर, जि. अकोला) यांना प्रदान करण्यात येणार आहे.

## अयोध्येतील ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याला भास्करगिरी बाबांची भेट

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** प्रभू रामचंद्रांच्या अयोध्या नगरीत पालघर जिल्हयातील तुंगारेश्वर पर्वत येथील परशुराम कुंड देवस्थानचे महंत बालयोगी सदानंद महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळयाला श्री क्षेत्र देवगड संस्थानचे महंत राष्ट्रसंत भास्करगिरी बाबांनी भेट दिली.

संत श्री ज्ञानेश्वर महाराज सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जयंती वर्षानिमित्त अयोध्या नगरीत बालयोगी सदानंद महाराज ज्ञानेश्वरी पारायण महोत्सव समिती व अखिल वारकरी समाज महाराष्ट्र यांच्या वतीने ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे पारायण निमित्त पैठण येथील शांतीब्रम्ह संत एकनाथ महाराज यांचे १४ वे वंशज योगीराज महाराज गोसावी यांचे दुपारी ३ ते ५ यावेळेत भावार्थ रामायण कथा तर श्रीराम जन्मभूमी मंदिराचे कोषाध्यक्ष आचार्य स्वामी गोविंदगिरी महाराज यांची दुपारी सायंकाळी ५.३० ते ६.३० यावेळेत छत्रपती शिवाजी महाराज चरित्र कथा सुरू असून या सोहळ्याला गुरुवर्य भास्करगिरी महाराज यांच्या समवेत देवगड भक्त परिवारातील सेवेकऱ्यांनी भेट दिली.



यावेळी सोहळा समितीचे मार्गदर्शक बालयोगी सदानंद महाराज व श्रीराम जन्मभूमी मंदिराचे कोषाध्यक्ष आचार्य स्वामी श्री गोविंदगिरी महाराज,सचिव चंपतराय उपस्थित होते.

## संत एकनाथ महाराज षष्ठीनिमित्त पिचडगाव-पैठण पायी दिंडी सोहळा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** – शांतीब्रम्ह संत एकनाथ महाराजांच्या षष्ठीनिमित्त नेवासा तालुक्यातील पिचडगाव येथून श्री क्षेत्र पैठणपर्यंत पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. माऊली आश्रमाच्या वतीने आयोजित या दिंडीचे प्रस्थान शुक्रवार, दि. ६ मार्च रोजी सकाळी ९ वाजता होणार असल्याची माहिती आश्रमाचे प्रमुख ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज हजारे यांनी दिली.

माऊली आश्रम, पिचडगाव येथून निघणाऱ्या या दिंडी सोहळ्याचे यंदाचे दुसरे वर्ष आहे. हा सोहळा दि. ६ ते १० मार्च दरम्यान पार पडणार आहे.

पाच दिवस चालणाऱ्या दिंडीत त्रिवेणीश्वर देवस्थानचे महंत रमेशानंदगिरीजी महाराज, ह.भ.प. गणेश महाराज शेजुळ, लक्ष्मीनारायण महाराज जोंधळे, अनिकेत महाराज शिंदे, राहुल महाराज तिकोणे व मच्छिंद्र महाराज भोगे यांची कीर्तन व प्रवचन सेवा होणार आहे.

पंचक्रोशीतील ग्रामस्थ, भजनी मंडळे, भाविक व वारकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. सहभागासाठी सरपंच पोपटराव हजारे व कचरू हजारे यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

## नीरा भीमा कारखानाची सर्व बिले देण्यात आघाडी

### सर्व ऊस बिले अदा करून आर्थिक शिस्तीचा नवा मापदंड

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**इंदापूर :** सहकार क्षेत्रात शिस्तबद्ध आर्थिक व्यवस्थापनाचा आदर्श निर्माण करत शहाजीनगर (ता. इंदापूर) येथील नीरा भीमा सहकारी साखर कारखाना यांनी चालू २०२५-२६ च्या गळीत हंगामातील गाळप झालेल्या सर्व ऊसाचे पहिले हप्ते प्रती टन ३१०१ रुपये या दराने शेतकऱ्यांच्या बँक खात्यात शुक्रवारी (ता. २०) जमा केले. चालू हंगामातील संपूर्ण ऊसाची बिले वेळेत अदा करणारा हा राज्यातील बहुधा पहिलाच कारखाना ठरल्याची माहिती अध्यक्षा भाग्यश्री हर्षवर्धन पाटील यांनी दिली.

कारखान्याचे संस्थापक, राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष तथा माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या नेतृत्वाखाली २०२५-२६ चा गळीत हंगाम दि. ६ फेब्रुवारीअखेर यशस्वीरीत्या पूर्ण झाला. यंदा कारखान्याने ५ लाख २५ हजार ६५७ मेट्रिक टन ऊस गाळपाचा टप्पा पार केला.

गाळप झालेल्या सर्व ऊसाची बिलरक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग करण्यात आली असून, सहकार क्षेत्रात आर्थिक शिस्त व शेतकरी बांधिलकीचा नवा मापदंड कारखान्याने प्रस्थापित केल्याची प्रतिक्रिया ऊस उत्पादकांकडून व्यक्त होत आहे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांसह ऊस तोडणी व वाहतूक कंत्राटदारांची बिलेही नियमितपणे अदा करण्यात आल्याचे व्यवस्थापनाकडून सांगण्यात आले.

गळीत हंगाम यशस्वी पार पाडल्याबद्दल संस्थापक हर्षवर्धन पाटील, अध्यक्षा भाग्यश्री पाटील, उपाध्यक्ष दादासाहेब घोगरे यांनी संचालक मंडळ, ऊस उत्पादक शेतकरी, तोडणी-वाहतूक कंत्राटदार, अधिकारी, कर्मचारी व हितचिंतकांचे अभिनंदन केले. दरम्यान, आगामी २०२६-२७ च्या गळीत हंगामात विक्रमी गाळपाचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून संस्थापक हर्षवर्धन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संचालक मंडळाने आतापासूनच नियोजनास प्रारंभ केल्याची माहिती अध्यक्षा भाग्यश्री पाटील यांनी दिली.

## पूर्व आंबेगावात चोरट्यांचा उपद्रव वाढला

### चोरट्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**लोणी धामणी :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात भुरट्या चोरांच्या वाढत्या घटनांमुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या भागात यापूर्वीच दिवसा बिबट्यांचे दर्शन होत असल्याने नागरिकांमध्ये अस्वस्थता होती. त्यातच आता दिवसाढवळ्या घरफोड्या होऊ लागल्याने नागरिक चिंतेत सापडले आहेत.

गेल्या दोन दिवसांत पोंदेवाडी येथील पोखरकर वस्तीवर विजय नरवडे यांच्या घरावर चोरट्यांनी दिवसाढवळ्या धाड टाकून सुमारे १ लाख ६३ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. या घटनेमुळे पोलिसांसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. तसेच वडगावपीर येथील पोखरकर मळा क्रमांक दोन परिसरात फकिरा टेमगिरे यांच्या घराच्या दरवाज्याचे कुलूप तोडून चोरीचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, घरात मौल्यवान वस्तू न मिळाल्याने चोरट्यांनी तेथून पळ काढला.

धामणी फाट्यावर अशोक जाधव यांच्या ऊस रसाच्या दुकानाचे कुलूप तोडून सुमारे महिनाभरापूर्वी रात्रीच्या वेळी ऊस रस यंत्र, फ्रिज व इतर साहित्य असा अंदाजे २४ ते ५० हजार रुपयांचा माल चोरट्यांनी लंपास केला होता.

## नागापुर येथे बिबट्यांचा बछडा पिंजऱ्यात जेरबंद

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**वळती :** नागापूर ( ता . आंबेगाव ) येथे बुधवार (दि. २५) पहाटे बिबटयाचा बछडा जेरबंद करण्यात वनविभागाला यश आले.

मागील दोन महिन्यांपासून परिसरात बिबट्याचा वावर वाढल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण होते. अखेर वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यात बिबट बछडा अडकल्याने नागरिकांनी सुटकेचा निश्वास टाकला आहे. याच ठिकाणी दहा दिवसांपूर्वी बिबट्याची मादी पिंजऱ्यात जेरबंद झाली होती



नागापूर गावातील पश्चिमेला पवार मळा येथील शेतकरी रघुनाथ रामहरी पवार यांच्या शेतात वनविभागाने पिंजरा लावला होता. नागापूर परिसरात बिबट्याचे वारंवार दर्शन होत असल्याने वनविभागाने एकूण तीन ठिकाणी पिंजरे बसवले होते. त्यापैकी पवार मळ्यातील पिंजऱ्यात बुधवारी बिबटयाचा बछडा अडकला.

शेतकरी रघुनाथ पवार हे सकाळी शेतात गेले असता त्यांना पिंजऱ्यात बिबटयाचा बछडा जेरबंद झाल्याचे दिसले. त्यांनी तात्काळ ही माहिती गावातील उपसरपंच सुनील शिंदे यांना दिली. सरपंचांनी तत्काळ वनविभागाशी संपर्क साधून घटनेची माहिती कळवली.

मंचर वन विभागाचे वनपरिक्षेत्राधिकारी विकास भोसले, वन परिमंडल अधिकारी आर. एम. फुलमाळी यांच्या सूचनेनुसार वनरक्षक बालाजी पोतरे यांच्यासह कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी आवश्यक खबरदारी घेत बिबट बछडा सुरक्षित ताब्यात घेतला.

वनविभागाने दिलेल्या माहितीनुसार, पकडलेल्या बिबट मादीची वैद्यकीय तपासणी करून तिला जुन्नर तालुक्यातील माणिकडोह बिबट निवारा केंद्रात हलविण्यात येणार आहे.

ग्रामस्थांनी रात्रीच्या वेळी एकटे शेतात न जाणे, लहान मुलांवर लक्ष ठेवणे तसेच जनावरांची सुरक्षित व्यवस्था करावी, असे आवाहन मंचर वन विभागाचे वनपरिक्षेत्राधिकारी विकास भोसले यांनी केले आहे.

## माजी आ. संजय जगताप यांची भाजप पश्चिम महाराष्ट्र चिटणीसपदी नियुक्ती

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नाझरे सुपे :** भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी जाहीर केलेल्या नव्या प्रदेश कार्यकारिणीत मा.आ. संजय जगताप यांची पश्चिम महाराष्ट्र विभागीय चिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीमुळे पश्चिम महाराष्ट्रातील पक्ष संघटनाला नवे बळ मिळणार असल्याचे मानले जात आहे.

प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत नव्या पदाधिकाऱ्यांची घोषणा करण्यात आली. त्यानंतर मा. आ. संजय जगताप यांनी प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांची भेट घेऊन आभार व्यक्त केले. पक्षाने सोपवलेली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडत संघटन अधिक सक्षम करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या भेटीवेळी सरचिटणीस निरंजन डावखरे, राजेश पांडे, आमदार परिणय फुके, मुख्यालय प्रभारी रविंद्र अनासपुरे, आमदार सुनील राणे, महिला मोर्चा अध्यक्षा चित्रा वाघ तसेच माजी आमदार कुणाल पाटील आदी उपस्थित होते.

प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी सांगितले की, लागोपाठ लागलेल्या निवडणुकांमुळे कार्यकारिणीची घोषणा उशिरा करण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच राष्ट्रीय नेतृत्वाशी चर्चा करून नव्या कार्यकारिणीची रचना करण्यात आली आहे. नव्या पदाधिकाऱ्यांच्या माध्यमातून भाजपची विचारधारा तळागाळात अधिक प्रभावीपणे पोहोचवण्याचा उद्देश असल्याचे त्यांनी नमूद केले.


### जाहीर नोटीस

तमाम सर्व लोकांस, वित्त संस्थांस, बँकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्ट-अ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे विदयमान मालक श्री. धनंजय शिवाजीराव टाकळे व सौ. निरूपमा धनंजय टाकळे हे आहेत. खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मौजे निरगुडे येथील गट नं. २६६ व २६८ मधील मिळकतीबाबत राधिका गोपाळ डेंगळे, ताराबाई सदाशिव कुंभार आणि मनिषा अशोक वणवे यांचेमध्ये दि.१८/१०/२००६ रोजी नोंदविण्यात आलेले खरेदीखत दस्त नं.६०८८/२००६ व त्यासोबत असलेली मूळ नोंदणी पावती व सूची-२ ही कागदपत्रे गहाळ झालेली आहेत.

तसेच खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मौजे निरगुडे येथील गट नं. २६८ मधील मिळकतीबाबत तानुबाई विठ्ठल डेंगळे आणि पुष्पा माऊली वणवे यांचेमध्ये दि. १८/१०/२००६ रोजी नोंदविण्यात आलेले खरेदीखत दस्त नं.६०८६/२००६ व त्यासोबत असलेली मूळ नोंदणी पावती व सूची-२ ही कागदपत्रे गहाळ झालेली आहेत.

तसेच खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मौजे निरगुडे येथील गट नं. २६८ मधील मिळकतीबाबत तानुबाई विठ्ठल डेंगळे, राधिका गोपाळ डेंगळे आणि श्री. गणेश मारूती वणवे यांचेमध्ये दि. १८/१०/२००६ रोजी नोंदविण्यात आलेले खरेदीखत दस्त नं.६०८७/२००६ व त्यासोबत असलेली मूळ नोंदणी पावती व सूची-२ ही कागदपत्रे गहाळ झालेली आहेत.

तसेच खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मौजे निरगुडे येथील गट नं. २६६ व २६८ मधील मिळकतीबाबत मनिषा अशोक वणवे आणि माऊली विठ्ठल वणवे यांचेमध्ये दि.२५/०६/२००८ रोजी नोंदविण्यात आलेले खरेदीखत दस्त नं.५२७३/२००८ व त्यासोबत असलेली मूळ नोंदणी पावती व सूची-२ ही कागदपत्रे गहाळ झालेली आहेत.

तसेच खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मौजे निरगुडे येथील गट नं. २५५ मधील मिळकतीबाबत तानुबाई विठ्ठल डेंगळे, राधिका गोपाळ डेंगळे, रूक्मिणी बालाजी डेंगळे आणि पुष्पा मारूती वणवे व गणेश मारूती वणवे यांचेमध्ये दि.२७/१०/२००६ रोजी नोंदविण्यात आलेले खरेदीखत दस्त नं.६१९५/२००६ व त्यासोबत असलेली मूळ नोंदणी पावती व सूची-२ ही कागदपत्रे गहाळ झालेली आहेत.

तसेच खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मौजे निरगुडे येथील गट नं. २५५ मधील मिळकतीबाबत रंजना सुंदरलाल काजळे आणि माऊली विठ्ठल वणवे आणि मारूती विठ्ठल वणवे यांचेमध्ये दि.०७/०३/२००७ रोजी नोंदविण्यात आलेले खरेदीखत दस्त नं. १५५९/२००७ व त्यासोबत असलेली मूळ नोंदणी पावती व सूची-२ ही कागदपत्रे गहाळ झालेली आहेत. त्याबाबत श्री. धनंजय शिवाजीराव टाकळे यांनी बारामती शहर पोलीस स्टेशन येथे तक्रार नोंदवलेली आहे.

या जाहीर नोटीसव्दारे कळविणेत येते की, सदर मिळकतीबाबत नोंदविलेल्या मूळ खरेदीखत दस्त नं.६०८६/२००६, ६०८७/२००६, ६०८८/२००६ दि.१८/१०/२००६, दस्त क्र.५२७३/२००८ दि.२५/०६/२००८, ६१९५/२००६ दि.२७/१०/२००६ आणि १५५९/२००७ दि.०७/०३/२००७ व त्या सोबत असलेली मुळ नोंदणी पावत्या व सूची-२ ही कागदपत्रे कोणत्याही बँकेत अथवा वित्तीय संस्थेत गहाण ठेवून कर्ज घेतलेले असल्यास अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधीतांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोष्टाने योग्य त्या कागदपत्रांच्या नकलांसह कार्यालयात येवून आमची खात्री करून दयावी. मुदतीत कोणाचीही, कोणतीही हरकत न आल्यास, ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत, ते त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत, असे समजण्यात येईल मग कोणाच्याही कर्ज बोजाची अथवा इतर कुठल्याही हक्क हितसंबंधाची कसलीही तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट- मिळकतीचे वर्णन

अ) तुकडी पुणे, पोट तुकडी, ता. बारामती, जि. पुणे मे. दुय्यम निबंधक सो. बारामती यांचे हद्दीतील, विदयमान मालक श्री. धनंजय शिवाजीराव टाकळे व सौ. निरूपमा धनंजय टाकळे यांच्या मालकीचे गांव मौजे निरगुडे, ता.इंदापूर, जि.पुणे येथील गट नं. २६६ क्षेत्र ०१हे.-०३.०० आर चौ.मी.+ पो.ख.००हे -. ५३.०० आर चौ.मी. एकूण ०१हे.-५६.०० आर चौ. मी. त्यामधील सर्व तदंगभूत वस्तूसह व सर्व इजमेंटचे हक्कासह मिळकत.

ब) तुकडी पुणे, पोट तुकडी, ता. बारामती, जि. पुणे मे. दुय्यम निबंधक सो. बारामती यांचे हद्दीतील, विदयमान मालक श्री. धनंजय शिवाजीराव टाकळे व सौ. निरूपमा धनंजय टाकळे यांच्या मालकीचे गांव मौजे निरगुडे, ता. इंदापूर, जि.पुणे येथील गट नं. २६८ क्षेत्र ०५हे.-७९.०० आर चौ.मी. त्यामधील सर्व तदंगभूत वस्तूसह व सर्व इजमेंटचे हक्कासह मिळकत.

क) तुकडी पुणे, पोट तुकडी, ता. बारामती, जि.पुणे मे. दुय्यम निबंधक सो, बारामती यांचे हद्दीतील, विद्यमान मालक श्री.धनंजय शिवाजीराव टाकळे व सौ. निरूपमा धनंजय टाकळे यांच्या मालकीचे गांव मौजे निरगुडे, ता. इंदापूर, जि.पुणे येथील गट नं. २५५ क्षेत्र ०३हे.-७१.०० आर चौ.मी. + पो.ख. ००हे.-७८.०० आर चौ.मी. एकूण ०४हे.-४९.०० आर चौ.मी. यापैकी ०२हे.-००.०० आर चौ.मी. त्यामधील सर्व तदंगभूत वस्तूसह व सर्व इजमेंटचे हक्कासह मिळकत.

**ॲड. नवनाथ तुकाराम भोसले**
**माळेगांव बु., ता. बारामती,**
**जि.पुणे मो.नं.८८०५७७११११**

## द•ख•ल

### मेंगाळवाडीच्या राजश्री गांडाळ 'सफायर आयडॉल'

**संगमनेर :** लायन्स क्लब ऑफ संगमनेर आयोजित राज्यस्तरीय 'सॅफ्रॉन सफायर सोलो सिंगिंग' स्पर्धेत तालुक्यातील मेंगाळवाडी येथील आदिवासी कन्या राजश्री भाऊसाहेब गांडाळ हिने 'सफायर आयडॉल' हा किताब पटकावला. तिच्या या यशामुळे गावासह तालुक्याचे नाव उज्ज्वल झाल्याची भावना आदिवासी ठाकर ठाकूर समाज उन्नती मंडळाचे तालुका अध्यक्ष बाळकृष्ण गांडाळ यांनी व्यक्त केली. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळावे यासाठी लायन्स क्लबतर्फे विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते. त्याचाच भाग म्हणून झालेल्या या स्पर्धेत राजश्रीने आपल्या सुरेल आवाजाच्या जोरावर प्रथम क्रमांक मिळविला. या यशानिमित्त तिचा सत्कार करण्यात आला. जयहिंद आदिवासी आश्रमशाळा, कोळवाडेचे मुख्याध्यापक दशरथ वर्पे यांच्या हस्ते सत्कार सोहळा पार पडला. यावेळी तिच्या आई-वडिलांचाही गौरव करण्यात आला.

### हर्षदा नजन नेट परीक्षा उत्तीर्ण



**भेंडा :** येथील उद्योजक बापूसाहेब नजन यांची कन्या हर्षदा नजन ही राष्ट्रीय चाचणी संस्थेने घेतलेल्या राष्ट्रीय पात्रता परीक्षेत (नेट) उत्तीर्ण झाली आहे.नेट परीक्षा ही भारतातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये 'सहाय्यक प्राध्यापक' पदासाठी आणि 'ज्युनिअर रिसर्च फेलोशिप' मिळवण्यासाठी अनिवार्य असलेली राष्ट्रीय स्तरावरील पात्रता परीक्षा आहे. ही परीक्षा एन टी ए द्वारे वर्षभरात दोनदा घेतली जाते. हर्षदा नजन हिने पुणे विद्यापीठ येथे एम.एसस्सी पदव्युत्तर पदवी शिक्षण पूर्ण केलेले आहे.ती लाईफ सायन्स विषय घेऊन नेट परीक्षा उत्तीर्ण झाली आहे. तिच्या या यशाबद्दल तिचे भेंडा परिसरातून अभिनंदन होत आहे.

### मक्तापुर येथे शिवजयंती साजरी



**नेवासा :** तालुक्यातील मक्तापूर येथील श्री.छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती मराठा सुकाणू समिती व मक्तापूर ग्रामस्थांच्या वतीने अत्यंत आनंदमय वातावरणामध्ये साजरी करण्यात आली.

शिवजयंती निमित्ताने छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून पूजन करण्यात आले. यावेळी पोलीस निरीक्षक महेश पाटील,मक्तापुर गावाचे तंटामुक्त अध्यक्ष दत्तात्रय कांगुणे, मराठा सुकाणू समितीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष गणेश झगरे,प्रिन्स दरबारचे प्रमुख पत्रकार बादल परदेशी,शिवसेना शिंदे गटाचे युवा शिवसैनिक मनोज झगरे यांच्या प्रमुख उपस्थितीत मानवंदना करण्यात आली. यावेळी वेदिका लक्ष्मण बर्डे,दिव्या गणेश झगरे, गायत्री जामदार या चिमुकल्या मुलींनी श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनचरित्रपर आपल्या भाषणातून भावना व्यक्त केल्या.

### महाराष्ट्र भूषणने राजेंद्र घोडके सन्मानित



**श्रीगोंदा :** तालुक्यातील मांडवगणचे सुपुत्र, ज्येष्ठ पत्रकार व समाजसेवक राजेंद्र घोडके यांना शिवजयंतीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराज महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला.

त्यांनी सामाजिक, पत्रकारितेच्या व सार्वजनिक क्षेत्रातील कार्यातून आधीच आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. राज्यस्तरीय ते आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनेक सन्मानांनी त्यांना गौरविण्यात आले असून त्यात 'महाराष्ट्र भूषण'ने सन्मानाला नवी उंची मिळाली आहे प्रत्येक वेळी त्यांनी कार्यातूनच त्या पुरस्काराची उंची वाढवली आहे.

### ढवळगाव येथे २८ फेब्रुवारीला विराट हिंदू संमेलन

**लिंपणगाव :** श्रीगोंदा तालुक्यातील ढवळगाव येथे हिंदू समाजात एकता व संघटन दृढ करण्यासाठी 'विराट हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले असून हे संमेलन शनिवार, दि. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी उत्साहात पार पडणार आहे. हिंदू धर्म, परंपरा, संस्कृती व मूल्यांचे संरक्षण आणि संवर्धन करून राष्ट्रीयत्व व देशभक्तीची भावना अधिक बळकट करणे हा या संमेलनामागील प्रमुख उद्देश असल्याची माहिती आयोजकांनी दिली. जात, पंथ व भाषा भेद विसरून सर्वांनी एकत्र येण्याचा संदेश या संमेलनातून दिला जाणार आहे. श्रीगोंदा तालुक्यात प्रथमच इतक्या मोठ्या प्रमाणावर हिंदू संमेलन आयोजित करण्यात येत असल्याने या कार्यक्रमाकडे विशेष लक्ष लागले आहे.

कार्यक्रमाचे ठिकाण ढवळगाव येथील गुरुकृपा मंगल कार्यालय निश्चित करण्यात आले आहे. तालुक्यातील विविध गावांमधून नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असून आयोजनासाठी ढवळगाव मंडळासह देवदैठण, येवती, आरणगाव दुमाला, कोंडेगव्हाण, रायगव्हाण, माठ, हिंगणी दुमाला, राजापूर, मेंगलवाडी व दाणेवाडी येथील कार्यकर्ते आणि ग्रामस्थ सक्रियपणे सहभागी झाले आहेत.

## शेतकऱ्यांच्या कांद्याला कवडीमोल भाव

# कांदा उत्पादकांमध्ये संतापाचे वातावरण



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री


**लिंपणगाव :** श्रीगोंदा तालुक्यासह नगर जिल्हा तसेच पश्चिम महाराष्ट्रातील पुणे व नाशिक जिल्ह्यांमध्ये यंदा मोठ्या प्रमाणात रब्बी कांद्याचे उत्पादन झाले आहे. मात्र बाजारभाव कोसळल्याने कांदा उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. सध्या रब्बी कांद्याला काही ठिकाणी चक्क एक रुपया किलो दर मिळत असल्याची धक्कादायक स्थिती निर्माण झाली आहे.

बाजारात एक नंबर व दोन नंबर कांद्याला साधारण नऊ रुपये किलो, चिंगळी कांद्याला दोन रुपये किलो तर भुगी कांद्याला केवळ एक रुपया किलो दर मिळत असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. लागवड, खत, औषधे, फवारण्या, पाणी व्यवस्थापन आणि काढणी यासाठी मोठा खर्च करूनही उत्पन्नातून तो खर्चही निघत नसल्याची खंत व्यक्त होत आहे.

शेतकऱ्यांच्या मते, एका एकरासाठी सुमारे ७० ते ८० हजार रुपये खर्च येतो; मात्र सध्याच्या दरामुळे निम्माही खर्च वसूल होत नाही.

खराब हवामान, वाढलेले इनपुट खर्च आणि घसरलेले बाजारभाव यामुळे कांदा उत्पादकांचे आर्थिक गणित पूर्णपणे बिघडले आहे. या पार्श्वभूमीवर सरकारने तातडीने हमीभाव, बाजार हस्तक्षेप योजना किंवा खरेदी केंद्र सुरू करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. योग्य वेळी उपाययोजना न झाल्यास शेतकरी रस्त्यावर उतरतील, असा इशाराही देण्यात येत आहे.

## संत गाडगेबाबा उद्यानाची दुरावस्था



**श्रीरामपूर :** जुने तहसील कार्यालय आणि पंचायत समिती समोरील उद्यानाची देखभाल दुरुस्ती अभावी मोठी दुरवस्था झाली आहे. तुटलेल्या खेळण्यांमुळे लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.तुटलेले खेळाचे साहित्य आणि दुरुस्ती देखभालीचा अभाव यामुळे ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांना उद्यानाचा वापर करणे कठीण झाले आहे. यावर उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

जुन्या तहसील कार्यालयाशेजारी पालिकेचे संत गाडगेबाबा उद्यान आहे. ज्येष्ठ नागरिकांच्या विरंगुळ्यासाठी तसेच लहान मुलांना खेळण्यासाठी हे उद्यान तयार करण्यात आले आहे. उद्यानात येणाऱ्या नागरिकांच्या सोयीसाठी बसण्यासाठी बाकडे, लहान मुलांसाठी घसरगुंडी, झोपाळे, सीसॉ असे खेळण्याचे साहित्य बसविण्यात आले आहे. संपूर्ण वार्ड नंबर दोन, सुभेदार वस्ती, फातिमा हाऊसिंग सोसायटी, मील्लत नगर, संजय नगर, झिरंगे मळा, संतुलुक हॉस्पिटल या भागातील रहिवासी या उद्यानात सकाळ संध्याकाळ येत असतात. लहान मुलांसाठी बसवण्यात आलेली घसरगुंडी, झोपाळे आणि इतर खेळणी तुटलेल्या अवस्थेत आहेत. लोखंडी साहित्याला गंज चढला आहे.

उद्यानातील साहित्य मोडकळीस आल्यामुळे नागरिकांचा उद्यानातील वावर गेल्या काही काळात कमी झाला आहे. उद्यानातील कारंजा सध्या बंद आहे. त्यामुळे लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिक हिरमुसले आहेत. रात्रीच्या वेळी पुरेसा प्रकाश नसल्याने महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना या ठिकाणी फिरणे कठीण झाले असल्याचे स्थानिक रहिवाशी सांगतात. उद्यानाची झालेली दुरवस्था पाहता पालिका प्रशासनाने या उद्यानांची तातडीने डागडुजी करावी, तुटलेली खेळणी दुरुस्त करावीत आणि सुरक्षारक्षकाची नेमणूक करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. तत्कालीन आमदार स्वर्गीय जयंत ससाणे आणि काँग्रेसच्या पक्षप्रतोद नगराध्यक्ष राजश्री ससाणे यांच्या दूरदृष्टी तून या भागात हे उद्यान उभारण्यात आले होते. अभिनेता सुनील शेट्टी यांच्या हस्ते त्याचा शुभारंभ करण्यात आला होता.

लहान मुले ज्येष्ठ नागरिक आणि महिलांसाठी हे उद्यान अतिशय सुंदर आहे.

## प्रशासनाच्या आश्वासनानंतर उपोषण मागे

# प्रलंबित कामांना अखेर मुहूर्त



**प्रशासनाने शब्द पाळावा नाही तर आत्मदहन करणार : उबाळे**

गावकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी आणि सोयीसाठी हे काम होणे गरजेचे होते. प्रशासनाने आता दिलेला शब्द पाळावा आणि काम वेळेत पूर्ण करावे, हीच आमची अपेक्षा आहे. नाहीतर पुन्हा आत्मदहन आंदोलन करणार असल्याचे सरपंच उबाळे यांनी बोलताना सांगितले आहे.

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८ डी वरील रस्ते विकास कामांच्या दिरंगाईविरोधात आढळगाव येथे सुरू असलेले उपोषण अखेर प्रशासकीय आश्वासनानंतर मागे घेण्यात आले आहे. सार्वजनिक बांधकाम (राष्ट्रीय महामार्ग) विभागाच्या उपविभागीय अभियंत्यांनी लेखी आश्वासन देत काम चालू केले आहे त्यामुळे उपोषण स्थगित करण्यात आले आहे मात्र कामात दिरंगाई झाल्यास पुन्हा उपोषण नाही तर आत्मदहन करणार असल्याचे सरपंच उबाळे यांनी सांगितले आहे दिल्याने ग्रामस्थांनी हा निर्णय घेतला आहे .

तालुक्यातील आढळगाव परिसरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाचे काम दीर्घकाळापासून रखडलेले होते. विशेषतः रस्ता दुभाजक आणि विद्युत खांब हलविण्याचे काम प्रलंबित असल्याने ग्रामस्थांची मोठी गैरसोय होत होती. या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी सरपंच श्री. शिवप्रसाद भाऊसाहेब उबाळे व ग्रामस्थांनी २३ फेब्रुवारीपासून आमरण उपोषण सुरू केले होते.

आज उपोषणाचा तिसरा दिवस असल्यामुळे सरपंच श्री. शिवप्रसाद भाऊसाहेब उबाळे यांनी तब्बेत खालावली होती तरीही ते उपोषण सोडत नसल्यामुळे प्रशासनाची चांगलीच धावपळ उडाली होती खासदार निलेश लंके आणि शेवटी अधिकारी यांनी काम तात्काळ चालू करत उपोषणकर्ते यांची मनधरणी करत लेखी आश्वासन दिल्यावर उपोषण मागे घेण्यात आले आहे त्या ठिकाणी ग्रामस्थांचा रोष आणि उपोषणाची तीव्रता पाहून प्रशासनाने तातडीने पावले उचलली. उपविभागीय अभियंता, राष्ट्रीय महामार्ग उपविभाग (अहिल्यानगर) यांनी लेखी पत्राद्वारे कळवले आहे की संबंधित कंत्राटदाराने २६ फेब्रुवारी २०२६ पासून रस्ता दुभाजक आणि पोल शिफ्टिंगचे काम तात्काळ सुरू करण्याचे आश्वासन दिले आहे.इतर उर्वरित प्रलंबित कामे देखील प्राधान्याने आणि लवकरात लवकर पूर्ण करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.प्रशासनाने दिलेल्या या आश्वासनानंतर, गावकऱ्यांच्या हिताचा विचार करून उपोषण मागे घेण्यात आले. यावेळी दत्तात्रय चव्हाण, रघुनाथ सूर्यवंशी, तुकाराम वाकडे, माजी सभापती विलासराव भैलुमे, हरिदास शिर्के, अमोल डाळिंबे,अंबादास चव्हाण,सागर वाकडे,श्याम भालेराव,अण्णा जगधने,शुभम गव्हाणे,हनुमंत डोके,अल्फा शिंदे,सिद्धार्थ कांबळे, पिनू भैलुमे यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

## राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांच्या हस्ते

# वैद्य रामदास आव्हाड यांना 'आयुर्वेद गौरव' पुरस्कार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**कोपरगाव :** आयुर्वेद क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल वैद्य रामदास आव्हाड यांना 'आयुर्वेद गौरव' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. राष्ट्रपती द्रोपदी मुर्मु यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. शेगाव येथे आयोजित राष्ट्रीय आरोग्य मेळावा २०२६ च्या उद्घाटन सत्रात हा सन्मान सोहळा पार पडला.

हा मेळावा मिनिस्ट्री ऑफ आयुष्य, भारत सरकार तसेच अखिल भारतीय आयुर्वेदा महासंमेलन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला आहे. चार दिवसीय या आरोग्य मेळाव्यास देशभरातील हजारो वैद्य, तज्ज्ञ, विद्यार्थी आणि आयुर्वेदप्रेमी उपस्थित राहणार असून लाखो सामान्य नागरिकही मेळाव्यास भेट देणार आहेत.

उद्घाटन सोहळ्यास आचार्य देवव्रत (महाराष्ट्राचे राज्यपाल), प्रतापराव जाधव (राज्यमंत्री, आयुष स्वतंत्र प्रभार), आयुष सचिव पद्मश्री वैद्य राजेश कोटेचा, तसेच अखिल भारतीय आयुर्वेद महासंमेलनाचे अध्यक्ष पद्मश्री पद्मभूषण वैद्य देवेन्द्रजी त्रिगुणा यांसह विविध क्षेत्रांतील मान्यवर, शासकीय अधिकारी, वैद्यगण व सहा हजारांहून अधिक विद्यार्थी उपस्थित होते.

वैद्य रामदास आव्हाड यांनी आयुर्वेद उपचार पद्धतीचा प्रसार, संशोधन व जनजागृतीसाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला.

राष्ट्रपतींच्या हस्ते मिळालेला हा सन्मान आयुर्वेद क्षेत्रातील त्यांच्या दीर्घकालीन कार्याची पोचपावती असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

भारताच्या प्रथम नागरिकांच्या हस्ते हा सर्वोच्च सन्मान मिळणे ही माझ्यासाठी आयुष्यभराची प्रेरणा आहे. आयुर्वेदाच्या माध्यमातून समाजसेवा अधिक व्यापक करण्याचा संकल्प यामुळे दृढ झाला आहे, अशी प्रतिक्रिया पुरस्कारार्थी वैद्य रामदास आव्हाड यांनी व्यक्त केली.

या सन्मानामुळे कोपरगाव परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# बीपीएलचा बहाणा करून चौकशीपासून पळ?

## क्रीडा संकुल गैरव्यवहार प्रकरणात उपसंचालकांवर आरोप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**नागपूर :** हिंगणा तालुका क्रीडा संकुलाच्या प्रशासकीय चौकशीसंबंधी माहिती अधिकारांतर्गत मागवलेल्या माहितीपासून लक्ष विचलित करण्यासाठी उपसंचालक क्रीडा, नागपूर यांनी अर्जदाराला बीपीएल व राहण्याचा अनावश्यक पुरावा मागून छळ सुरू केल्याचा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्ते सतीश भालेराव यांनी केला आहे.

भालेराव यांनी स्पष्ट केले की ते दोन हजार तीन पासून बीपीएलधारक असून संबंधित प्रमाणपत्र व रेशनकार्ड विभागाला यापूर्वीच सादर केलेले आहे. तसेच मागील १५ वर्षांपासून माहिती अधिकारातील सर्व पत्रव्यवहार हिंगणा येथील त्याच पत्त्यावर होत आहे. तरीही अचानक रामटेकचे रहिवासी असून हिंगण्यात राहता का? असा प्रश्न उपस्थित करून कागदपत्र मागणे हे केवळ चौकशी टाळण्यासाठीचे बहाणेबाजीचे धोरण असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

२०२२ रोजी माननीय जिल्हाधिकारी नागपूर यांनी हिंगणा तालुका क्रीडा संकुल समितीच्या प्रशासकीय चौकशीचे आदेश उपसंचालक क्रीडा कार्यालयाला दिले होते. मात्र चार वर्ष उलटूनही चौकशी अहवाल न देणे आणि त्याऐवजी अर्जदारालाच संशयाच्या भोवऱ्यात ओढण्याचा प्रयत्न करणे हे गंभीर शासकीय निष्काळजीपणाचे लक्षण असल्याचे भालेराव यांनी म्हटले आहे.

सदर चौकशी झाल्यास क्रीडा संकुल समितीत मोठ्या आर्थिक गैरव्यवहाराचे तथ्य समोर येण्याची शक्यता असून, त्याची माहिती सार्वजनिक होऊ नये व न्यायालयीन कारवाई होऊ नये या भीतीतूनच संबंधित अधिकारी अर्जदाराला नाहक त्रास देत असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. या प्रकरणात चौकशी अहवाल तातडीने जाहीर करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अन्यथा न्यायालयीन लढा उभारण्याचा इशारा भालेराव यांनी दिला आहे.

## शिर्डीत जुगार अड्ड्यावर पोलीसांचा छापा

**शिर्डी :** शहरातील दत्तनगर परिसरात सुरू असलेल्या अवैध 'सोरट' जुगार अड्ड्यावर शिर्डी पोलिसांनी नियोजनबद्ध छापा टाकत चौघांना रंगेहाथ पकडले. या कारवाईत रोख रक्कम व जुगार साहित्य जप्त करण्यात आले असून संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि. २३ फेब्रुवारी रोजी पोहेका राहुल राजेंद्र द्वारके, पोसई दीपक मेढे व पोना राहुल कचरू डोके हे शिर्डी पोलीस स्टेशन हद्दीत अवैध धंद्यांविरोधात पेट्रोलिंग करत असताना गोपनीय खबऱ्या मार्फत माहिती मिळाली की, अखिल भारतच्या पाठीमागे दत्तनगरजवळील पत्र्याच्या शेडमध्ये काही इसम 'सोरट' नावाचा हारजीतीचा जुगार खेळत आहेत असल्याचे माहिती वरून सायंकाळी ६ वा. सुमारास अचानक छापा

टाकला असता चार इसम खाली बसून 'सोरट' जुगार खेळताना दिसून आले. यामधेआकाश कैलास राजपूत,किरण सुनील कडू , अविनाश कारभारी बाणेदार चौकशी दरम्यान आकाश राजपूत हा सदर जुगार अड्डा स्वतः चालवत असल्याचे सांगितले. यात रोख रक्कम व साहित्य जप्त करून अंगझडती घेतली असता आरोपींकडून एकूण २,९८० रोख रक्कम (विविध दराच्या नोटा) तसेच 'सोरट' खेळण्यासाठी लागणारे साहित्य मिळून आले.

# बिबट्या खरा की ए आय?

## वन अधिकाऱ्यांच्या दाव्याने नागरिक गोंधळात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी :** शहरात बिबट्याच्या वाढत्या वावरामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असताना प्रशासनाच्या भूमिकेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. सोमवारी (दि. २३) मध्यरात्रीनंतर भरवस्तीतून फिरणारा बिबट्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात स्पष्टपणे कैद झाल्याचा दावा करण्यात आला आहे. मात्र प्रत्यक्ष शोधमोहीम राबवण्याऐवजी चित्रफीत कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे तयार असू शकते किंवा अहवालाची प्रतीक्षा आहे अशी कारणे देत कारवाई लांबवली जात असल्याची नागरिकांची तक्रार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पहाटेच्या सुमारास श्रावण हॉटेल परिसरातून बिबट्या बाबूजी आव्हाड महाविद्यालयालगतच्या गायछाप रस्त्याच्या दिशेने जाताना दिसला. चित्रफितीनुसार त्याचा मार्ग वनदेव परिसरातून शिक्षक कॉलनीमार्गे आनंदनगरकडे गेल्याचे सांगितले जाते. शहरालगतच्या टेकड्यांमुळे तारकेश्वर नगरी, आनंदनगर, माळी बाभळगाव ग्रामीण हद्द, शंकरनगर, फुलेनगर, शिवशक्ती नगर व इंदिरानगर परिसरात भीतीचे सावट पसरले आहे.

स्थानिक नागरिकांनी तातडीने पिंजरा लावून शोधमोहीम सुरू करण्याची मागणी केली आहे. मात्र संबंधित अधिकाऱ्यांकडून तांत्रिक पडताळणीचे कारण पुढे केले जात असल्याने संताप व्यक्त होत आहे. गंभीर दुर्घटना टाळण्यासाठी महाराष्ट्र फॉरेस्ट डेव्हलपमेंट यांनी त्वरित ठोस उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी होत आहे.

**तांत्रिक पडताळणी की तातडीची कारवाई?**

प्रत्यक्ष धोका समोर असताना पथके न पाठवता तांत्रिक तपासणीला प्राधान्य दिले जात असल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे. जीवितहानीची वाट पाहिली जात आहे का? असा संतप्त सवालही काहींनी उपस्थित केला आहे.



दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

गुरुवार, दि.२६ फेब्रुवारी २०२६ । अहिल्यानगर । पान नं. ८




## एसटी कर्मचाऱ्यांचा वेतन वाढीचा थकीत हप्ता बँक खात्यात जमा

**मुंबई :** राज्याच्या कानाकोपऱ्यात धावणाऱ्या 'लालपरी'ला आपल्या घामाने आणि कष्टाने जिवंत ठेवणाऱ्या सुमारे ८६ हजार एसटी कर्मचाऱ्यांच्या चेहऱ्यावर अखेर समाधानाची झळाळी उमटली आहे. वेतनवाढीचा थकीत हप्ता त्यांच्या बँक खात्यात जमा होताच, दिलेला शब्द पाळणाऱ्या परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या नेतृत्वावर पुन्हा एकदा विश्वासाची मोहर उमटली.एसटी महामंडळाकडे निधीअभावी थकीत वेतन देणे कठीण झाले असताना शासनाने तातडीने १०० कोटी रुपयांची तरतूद केली. परिणामी, फेब्रुवारी महिन्याच्या थकीत वेतनवाढीचा हप्ता कर्मचाऱ्यांच्या खात्यात जमा झाला. हा केवळ आर्थिक दिलासा नसून, तो शासनाच्या संवेदनशीलतेचा आणि बांधिलकीचा प्रत्यय आहे. असे प्रतिपादन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले आहे.

# खंडाळा येथे कालव्यावर पाणीमापक यंत्रे बसणार

### शेतकऱ्यांच्या संघर्षाला यश : न्याय्य व समान पाणी वाटपाच्या आशा पल्लवीत



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** श्रीरामपूर तालुक्यातील शेतकरी गेल्या अनेक वर्षांपासून भंडारदरा धरणातील पाण्याच्या योग्य वाटपासाठी संघर्ष करत आहेत. धरणातील पाणी चोरी होत असल्याने आणि पाणीमापक यंत्रे (एसडब्ल्यूएफ) नादुरुस्त असल्याने शेतकऱ्यांना पुरेसे पाणी मिळत नव्हते. आता उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर जलसंपदा विभागाने शपथपत्र दाखल केले असून, पाणीमापक यंत्रे बसवण्याच्या कामाला सुरुवात झाली आहे. त्यासाठीची निविदा काढण्यात आली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना आता त्यांच्या हक्काचे पाणी मिळण्याची आशा पल्लवीत झाली आहे.

> या याचिकेत पाण्याचे आवर्तन, नियोजन, गैरवापर, बोगस संस्था आणि पाणी चोरी यावर भर आहे. शेतकऱ्यांना न्याय मिळावा यासाठी आम्ही लढत आहोत. हा निर्णय शेतकऱ्यांसाठी आशेची किरण आहे. धरणातील पाणी योग्य रीतीने वाटले गेले तर शेती फुलेल आणि शेतकऱ्यांचे जीवन सुधारेल.
> **– ॲड. अजित काळे**

भंडारदरा धरण १९१८ ते १९२६ दरम्यान बांधले गेले. त्याची क्षमता ११ टीएमसी आहे आणि ते दरवर्षी भरते. या धरणाच्या कालव्यांमुळे सुमारे ५७ हजार हेक्टर जमीन ओलिताखाली येते. पण गेल्या १०० वर्षांत पिण्याच्या पाण्याचा वापर वाढला, शहर वाढले आणि शेतीचे क्षेत्र कमी झाले. याशिवाय, बंद पडलेल्या कारखान्यांना आणि राजकीय लोकांच्या बोगस सोसायट्यांना पाणी परवाने दिले जातात. यामुळे पाण्याची मोठी चोरी होते आणि शेतकऱ्यांचे नुकसान होते.

शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अनिल औताडे आणि युवराज जगताप यांनी ड. अजित काळे यांच्यामार्फत छत्रपती संभाजीनगर उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. त्यात धरणातील पाण्याचे ऑडिट करा, बंद संस्थांचे परवाने रद्द करा, महाराष्ट्र शासनाच्या ४/८/१९८९ च्या जीआरनुसार पाणी वाटपाचे नियोजन करा आणि प्रत्येक तालुक्यात एसडब्ल्यूएफ पाणीमापक यंत्रे बसवा. ही यंत्रे नादुरुस्त का झाली आणि त्यांची दुरुस्ती का झाली नाही, याचीही चौकशी व्हावी, या मागण्या होत्या.

न्यायालयाने जलसंपदा विभागाला शपथपत्र दाखल करण्याचे आदेश दिले. प्रथम शपथपत्र अपुरे असल्याने न्यायालयाने नवे शपथपत्र मागितले. आता विभागाने सांगितले की, कालवा दुरुस्ती आणि खंडाळ्यात एसडब्ल्यूएफ यंत्र बसवण्यासाठी निविदा काढल्या आहेत. काम सुरू झाले आहे. यामुळे श्रीरामपूर तालुक्यातील शेतकऱ्यांना पाण्याचे योग्य वाटप होईल आणि चोरी थांबेल. आता न्यायालयाच्या पुढील सुनावणीची वाट पाहत शेतकरी उत्सुक आहेत.

### पी.एम. किसान व नमो शेतकरी निधी
## योजनेचे निकष बदलण्यासाठी केंद्राकडे पाठपुरावा : कृषीमंत्री भरणे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** प्रधानमंत्री किसान सन्मान निधी तसेच राज्याच्या नमो शेतकरी महासन्माननिधी योजना योजनेतील पात्रतेचे निकष बदलण्यासाठी राज्य शासनाकडून केंद्र सरकारकडे पाठपुरावा सुरू असल्याची माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

विधानसभेत आमदार समाधान अवताडे यांनी दि. १ फेब्रुवारी २०१९ ही लाभार्थी पात्रतेसाठी निश्चित केलेली कट-ऑफ तारीख बदलण्याबाबत प्रश्न उपस्थित केला होता. केंद्र शासनाच्या दि. २१ जून २०१९ च्या सुधारित मार्गदर्शक सूचनांनुसार ही अंतिम तारीख ठरविण्यात आली आहे. त्यामुळे १ फेब्रुवारी २०१९ नंतर जमीन खरेदी करणारे किंवा जमीन हस्तांतरण झालेल्या शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळत नाही. तसेच जमीन विक्री केलेल्या मूळ मालकालाही लाभासाठी अपात्र ठरविले जाते. मंत्री भरणे यांनी सांगितले की, पी.एम. किसान ही केंद्र पुरस्कृत योजना असून पात्र शेतकरी कुटुंबांना वर्षातून तीन हप्त्यांत प्रत्येकी दोन हजार रुपये, असे एकूण सहा हजार रुपये थेट डीबीटी पद्धतीने दिले जातात. सोलापूर जिल्ह्यातील ६.९९ लाख अर्जदारांपैकी ६.८२ लाख पात्र लाभार्थ्यांना आतापर्यंत २,१८५.६४ कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत. राज्यातील ९०.७४ लाख शेतकरी कुटुंबांना नुकत्याच वितरित झालेल्या २१ व्या हप्त्यात १,८१४.७४ कोटी रुपये जमा झाले असून, नमो शेतकरी महासन्मान निधी अंतर्गतही सोलापूर जिल्ह्यातील सुमारे पाच लाख लाभार्थ्यांना ७ हप्त्यांत ७,०५५.४९ कोटी रुपये देण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. पात्रतेसंदर्भातील अंतिम निर्णय केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसारच घेतले जात असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## बंद घराचे कुलूप तोडून सोन्याचे दागिने व रोकड लंपास

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** अज्ञात भामट्याने वयोवृद्ध पती पत्नीचे बंद घराचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला आणि घरातील कपाटात ठेवलेले सोन्याचे दागीने व हजारो रुपयांची रोकड घेऊन भामटे पसार झाल्याची घटना दि. २३ फेब्रुवारी रोजी रात्रीच्या सुमारास उघडकीस आली.

रखमाजी शंकर शेजवळ, वय ७४ वर्षे, व त्यांची पत्नी राहुरी तालुक्यातील वांबोरी येथे राहत आहेत. त्यांचे तीन मुले, सुना व नातवंडे हे त्यांचे कुटुंबासह शेजारीच राहण्यास आहेत. दि. २३ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री ८.३० वाजेच्या सुमारास रखमाजी शेजवळ व त्यांची पत्नी शांताबाई हे दोघे जेवन झाले नंतर त्यांच्या राहत्या घराला कुलुप लावुन शेजारी राहणाऱ्या मुलाच्या घरी गप्पा मारण्यासाठी गेले होते. त्यानंतर ते दोघे पती पत्नी रात्री १०.१५ वाजे दरम्यान परत त्यांच्या घरी गेले असता त्यांना त्यांच्या घराच्या दरवाजाचा कडी कोयंडा व कुलुप तोडलेले दिसले. या दरम्यान अज्ञात भामट्यांनी रखमाजी शेजवळ यांच्या घरात प्रवेश करून घरातील सामानाची उचकापाचक केली. घरात असलेल्या कपाटातील सर्व कपडे व सामान काढून फेकले. आणि कपाटातील पावने तीन तोळे वजनाचे सोन्याचे गंठण व ३२ हजार रुपये रोख रक्कम असा लाखों रुपयांचा मुद्देमाल घेऊन भामटे पसार झाले. घटनेची माहिती मिळताच पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने घटनास्थळी धाव घेऊन घटनेची माहिती घेतली.

रखमाजी शंकर शेजवळ यांच्या फिर्यादीवरून अज्ञात आरोपी विरोधात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला. पुढिल तपास पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

# बालसंगोपन योजनेस ६० कोटी

### रखडलेले अनुदान लवकरच जमा होणार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजना अंतर्गत वर्षभरापासून प्रलंबित असलेले अनुदान अदा करण्यासाठी महिला व बालविकास विभागाला अखेर ६० कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे. राज्यातील शून्य ते अठरा वर्षे वयोगटातील सुमारे दीड लाख बालके या योजनेचे पात्र लाभार्थी आहेत.

समितीचे राज्य समन्वयक व मिशन वात्सल्य शासकीय समितीचे सदस्य मिलिंदकुमार साळवे यांनी यासाठी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ना. राधाकृष्ण विखे आदिती ठाकरे यांच्यासह संबंधित लोकप्रतिनिधी व मंत्रालय स्तरावर निवेदने सादर केली होती.



पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांनीही मुख्यमंत्री तथा अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर योजनेतील अडचणी मांडून तातडीने निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. तसेच मुख्यमंत्री सचिवालयाचे सचिव अश्विनी भिडे व श्रीकर परदेशी यांची भेट घेऊन प्रलंबित अनुदानाबाबत पाठपुरावा करण्यात आला.

या प्रयत्नांना यश येत वित्त विभागाने महिला व बालविकास विभागास ६० कोटी रुपयांचा निधी मंजूर करून वितरित केला आहे. हा निधी लाभार्थ्यांच्या बँक खात्यात थेट डीबीटी प्रणालीद्वारे जमा करण्यात येणार असल्याची माहिती साळवे यांनी दिली.

## घरात घुसून हातपाय तोडण्याची धमकी देत ५० हजार लंपास

**राहुरी :** संभा साळवे याचे नादी लागू नको, नाहीतर हातपाय तोडून जीवे ठार मारून टाकू. अशी धमकी देऊन आरोपींनी घरात घुसून ५० हजार रुपये रोख रक्कम घेऊन गेल्याची घटना दि. २१ फेब्रुवारी रोजी सायंकाळच्या दरम्यान घडली.

या घटने संदर्भात प्रिती अजय भोसले, वय २२ वर्षे, रा. चिंचोली फाटा, ता. राहुरी, या विवाहित तरुणीने राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे कि, दि. २१ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रिती भोसले हिचा पती अजय व दीर यश यांचे संभा साळवे यांचेशी वाद झाले होते. सायंकाळी ७.३० वाजे दरम्यान प्रिती भोसले व घरातील इतर लोक घरी असताना तेथे आरोपी आले. आणि म्हणाले कि, अजय व यश हे कुठे गेले आहेत.

तेव्हा प्रिती भोसले त्यांना म्हणाली कि, पती व दीर दोघेही घरी नाहीत तुम्ही नंतर या. असे म्हणाल्याचा त्यांना राग आल्याने त्यांनी शिविगाळ केली. तसेच यश याला समजून सांगा की संभा साळवे याचे नादी लागू नको, नाहीतर त्याचे हातपाय तोडून त्याला जीवे ठार मारून टाकू व पोलीस स्टेशनला तक्रार दिली तर तुमच्या घरच्यांना सगळ्यांना मारून टाकू, अशी धमकी दिली.

त्यानंतर आरोपींनी घराचे दरवाजावर लाथ मारून घरात घुसले. दमदाटी करुन बळजबरीने घरातील कपाटातील ५० हजार रुपये रोख रक्कम घेऊन निघून गेले.

प्रिती अजय भोसले हिच्या फिर्यादीवरून आरोपी रूपेश बर्डे व काळू भांड, दोन्ही रा. राहुरी, या दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे हे करीत आहेत.

## वाळू तस्करी करणाऱ्या दोन बैलगाड्या पोलिसांकडून जप्त



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** तालुक्यातील देसवंडी परिसरात देव नदीच्या पात्रातून बेकायदेशीरपणे वाळूची चोरी करणाऱ्या दोन आरोपींना राहुरी पोलिसांनी रंगेहाथ पकडले. या कारवाईत दोन बैलगाड्या आणि वाळू असा एकूण २४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तर आरोपीं विरुद्ध पर्यावरण संरक्षण अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

राहुरी तालुक्यातील देसवंडी गावच्या शिवारात असलेल्या देव नदी पात्रातून मोठ्या प्रमाणावर वाळूची चोरी होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे दि. २२ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री ९.३० वाजेच्या सुमारास पोलिसांनी नदी पात्रात सापळा रचला.

यावेळी आरोपी अरुण अशोक कोकाटे आणि राहुल अशोक कोकाटे, दोन्ही रा. देसवंडी, ता. राहुरी, हे दोन बैलगाड्यांच्या सहाय्याने चोरून वाळू वाहतूक करताना मिळून आले. प्रत्येकी ११ हजार रुपये किंमतीच्या दोन बैलगाड्या आणि साधारण २ हजार रुपये किमतीची वाळू असा एकूण २४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तलाठी सचिन भागचंद कदम यांच्या फिर्यादीवरून राहुरी पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला. सदर कारवाई राहुरी येथील पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार संभाजी बडे आदि पोलिस पथकाने केली.

## सादतपूर शिवारात बहीण-भावावर दरोडेखोरांचा हल्ला

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी :** संगमनेर तालुक्यातील सादतपूर शिवारात महाविद्यालयातून घरी परतणाऱ्या बहीण-भावाकडून मोटरसायकलस्वार तिघा चोरट्यांनी मोबाईल फोन हिसकावून नेल्याची घटना शुक्रवारी दुपारी घडली. या वेळी चोरट्यांनी तरुणीच्या कानातील सोन्याच्या दागिन्यांवरही हात घालण्याचा प्रयत्न केला. मात्र, तरुणीने प्रसंगावधान राखत आरडाओरडा केल्याने चोरटे पळून गेले. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. २० फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी सुमारे ४ वाजता एक महाविद्यालयीन तरुणी व तिचा मावसभाऊ कॉलेज सुटल्यानंतर औरंगपूरगोगलगाव मार्गे राहाता येथे जात होते. सादतपूर शिवारात मागून आलेल्या दुचाकीवरील तिघांनी त्यांना अडवून बळजबरीने ५० हजार रुपये किंमतीचे दोन मोबाईल फोन हिसकावले. त्यानंतर तरुणीच्या कानातील सोन्याच्या बाळ्या ओढण्याचाही प्रयत्न करण्यात आला. मात्र, तरुणीने मोठ्याने आरडाओरडा केल्याने आसपास कोणी येण्याची शक्यता ओळखून चोरट्यांनी दुचाकीवरून पलायन केले. घटनेनंतर पीडित तरुणीने लोणी पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल केली. त्यानुसार गुन्हा नोंदविण्यात आला. पुढील तपासादरम्यान व तांत्रिक स्थळ पाहणीत ही घटना आश्वी पोलीस स्टेशन हद्दीत घडल्याचे निष्पन्न झाल्याने सीसीटीएनएस प्रणालीद्वारे गुन्हा पुढील कारवाईसाठी आश्वी पोलिसांकडे वर्ग करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास सहायक पोलीस निरीक्षक सुदाम शिरसाट यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार राजेंद्र पारधी करीत आहेत. दरम्यान, औरंगपूर, गोगलगाव व सादतपूरसारख्या तुलनेने निर्जन भागातून प्रवास करताना नागरिकांनी विशेष दक्षता घ्यावी तसेच संशयास्पद हालचाली आढळल्यास त्वरित पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिस प्रशासनाने केले आहे.

# पुढील हंगामात १५ लाख टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट्य : शंकरराव गडाख

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई :** या हंगामात ११५ दिवसात ९ लाख ३० हजार टन ऊसाचे गाळप केले. एवढेच गाळप करायला पूर्वी जून महिना लागायचा, पण आता कारखान्याच्या मशिनरीचे आधुनिकीकरण केल्याने रोज १० हजार टन गाळप करण्याची क्षमता सिद्ध झाली. त्यामुळे पुढच्या वर्षी पाऊस चांगला झाला तर १५ लाख टनापर्यंत ऊस गाळपाचं उद्दिष्ट राहील असे प्रतिपादन माजी मंत्री शंकरराव गडाख यांनी केले.

ते नेवासा तालुक्यातील सोनई येथील मुळा कारखान्याच्या ४८ व्या गळीत हंगाम सांगता प्रसंगी गडाख बोलत होते. गडाख पुढे म्हणाले की, गेली तीन वर्षे निसर्गाच्या लहरीपणाचा मोठा फटका बसला. ऊसाचे क्षेत्र घटले, कारखान्याचे ऊस उत्पादन कमी झाले, त्यामुळे उत्पादन खर्च वाढला, पण या प्रतिकूल परिस्थितीवरही मात करून खर्चात काटकसर करून इथेनॉल प्रकल्प आणि मशिनरीच्या आधुनिकीकरणा साठी घेतलेल्या कर्जाच्या हप्त्यांची नियमित परतफेड केली. हंगामातल्या ऊस गळीताचे काटेकोर नियोजन केले.

रोज साडेबारा हजार टन ऊस तुटेल एवढी यंत्रणा भरली. कारखाना कार्यक्षमतेने चालवला, आणि २५ फेब्रुवारी पर्यंतच सर्व ऊसाचे गाळप पूर्ण केले, असे सांगून कारखान्याचे कार्यकारी संचालक शरद बेल्हेकर व त्यांच्या टीममधील अधिकारी तसेच इंजिनिअरिंग, रसायन आणि शेतकी खात्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे त्यांनी जाहीर अभिनंदन केले. इतर कारखान्यांना ऊस देणाऱ्या शेतकऱ्यांबद्दल ते म्हणाले की, पुढच्या वर्षी ऊस जादा होणार आहे.

इतर कारखाने ऊस नेतील का ? काही कारखान्यांनी वेळेवर पैसे दिले नाहीत म्हणून शेतकरी अजून त्यांच्या दारात हेलपाटे मारत आहेत.

गेल्या ३०-४० वर्षात आपण परिसरात मोठ्या प्रमाणात योजना राबवल्या, त्यामुळे ऊसाचं क्षेत्र वाढलं. ती बांधीलकी लक्षात घेऊन मुळा कारखान्यालाच ऊस द्यावा, आणि जास्तीत जास्त लागवडी वाढवाव्यात. आता कोणत्याही महिन्यात लागवड केली तरी चालेल. कितीही ऊस झाला तरी चालेल. त्याचे वेळेत गळीत करण्यात येईल याची ग्वाही त्यांनी दिली.




सुरुवातीला कारखान्याचे अध्यक्ष नानासाहेब तुवर, संचालिका ताराबाई पंडीत व सुखदेव पंडीत, चिफ इंजिनियर दीपक नवले, व शेतकी अधिकारी विजय फाटके यांनी सपत्नीक पूजाविधी केल्यावर शंकरराव गडाख यांच्या हस्ते गव्हाणीत ऊसाची शेवटची मोळी टाकून ४८ व्या गळीत हंगामाची सांगता करण्यात आली.

कारखान्याचे कार्यकारी संचालक शरद बेल्हेकर यांनी उपस्थितांचे स्वागत करून गळीत हंगामाबद्दल माहिती दिली.

कारखान्याचे अध्यक्ष नानासाहेब तुवर तसेच सर्वश्री बाळासाहेब सोनवणे, आश्रू सानप, जालिंदर पाटील येळवंडे व अरुण सावंत यांनी मनोगत व्यक्त केले.

गळीत हंगाम यशस्वी पार पाडल्याबद्दल कारखान्याचे कार्यकारी संचालक शरद बल्हेकर, वर्क्स मॅनेजर एस.डी.पवार, प्रोडक्शन मॅनेजर एस,डी,गाडे, चिफ इंजिनिअर डी.बी.नवले, चिफ केमिस्ट एस.डी.देशमुख, शेतकी अधिकारी विजय फाटके, उप शेतकी अधिकारी एस.बी. चावरे, डिस्टीलरी मॅनेजर बाळासाहेब दरंदले यांचा सन्मान करण्यात आला.

विक्रमी ऊसतोड वाहतूक करणाऱ्या मुकादम व वाहन मालकांचा सन्मान करण्यात आला. त्यात दिलीप पोटे, दादा धनगर, शिवाजी राठोड, माणिक हाके, भिमराव चव्हाण, आदिनाथ दहिफळे, तुकाराम भणगे, रावसाहेब खाडे, बंडू राठोड, प्रकाश चव्हाण, संजय भांगरे, गणेश चव्हाण यांचा समावेश आहे.

कार्यक्रमाला सर्वश्री संजय सुखदान, ॲड काकासाहेब गायके, बाबासाहेब मोरे, मच्छिंद्र कडू, संभाजी धोत्रे, जालिंदर गवळी, स्वप्नील मापारी, असिफ पठाण, राजेंद्र काळे, अनिल शिंदे, फैजाण शेख, नानासाहेब रेपाळे, दिलीपराव लोखंडे, अशोक येळवंडे, सचिन चोरडिया, ह.भ.प. बाळकृष्ण महाराज सुडके, मदनराव डोळे, महादेव दराडे, दत्तात्रय बेल्हेकर, आप्पासाहेब शिंदे, रामदास चांगुलपाई, प्रदीप चव्हाण, कैलास जाधव, विनायक पुंड, कर्णासाहेब पवार, कर्णासाहेब सुकाळकर,कर्णासाहेब जाधव,भिकाभाऊ जगताप, गोवर्धन आयनर, दिलीपराव मोटे, सखाराम कर्डिले, संजय आहेर, तुकाराम शेंडे मामा , एकनाथ धानापुणे, साहेबराव चिंधे , बापूसाहेब चिंधे , त्रिंबक सुकाळकर, राधाकिसन वाघ, अण्णासाहेब केदार, माणिकराव होंडे, कैलास झगरे, संतोषशेठ फिरोदिया, भीमाशंकर वरखडे, तुकाराम भणगे, कल्याणराव उभेदळ, बाबासाहेब घुले, संतोष म्हस्के, चंद्रकांत मुंगसे, प्रियंक बेल्हेकर, अशोक हारदे, श्रीरंग हारदे, ज्ञानेश्वर बोरुडे, शिवाजी सोनवणे, सिताराम झिने, सोमनाथ कराळे, रमेश कराळे, विजय कुऱ्हे, संभाजी फाटके, नंदुभाई शेख, भाऊसाहेब लांडे, रावसाहेब लांडे, भाऊसाहेब निमसे, सिताराम रोडे, रत्नाकर बोर्डे, माणिकराव भागवत, ऋषिकेश काळे, नूरमहम्मद सय्यद, रावसाहेब कांगुणे, पांडुरंग ताके, गणेश माटे, डॉ. राम नाथ बडे, पांडुरंग अनारसे, भाऊ दाने, दिलीप जाधव तसेच जन संपर्क अधिकारी शंकरराव दरंदले, टी.आर.राऊत, योगेश घावटे, संजय टेमक तसेच मोठ्या प्रमाणावर सभासद, ऊस उत्पादक, मुकादम व कारखान्याचे कर्मचारी उपस्थित होते. कारखान्याचे व्यवस्थापक व्ही. के.भोर यांनी कार्यक्रमाचा समारोप केला. सचिव रितेश टेमक यांनी सूत्रसंचालन केले.